Mrgabharti_75000

मे २०२५/पाने ६०/किंमत ₹१०

# लोकराज्य



WAVES
WORLD AUDIO VISUAL &
ENTERTAINMENT SUMMIT
*Connecting Creators, Connecting Countries.*

## सृजनातून समृद्धीकडे!

Mrgabharti_75000

## उद्घाटन कार्यक्रम

१ मे २०२५ सकाळी १०:३० ते १२:०० जास्मिन हॉल

वेव्हज्चे (जागतिक दृक्‌श्राव्य मनोरंजन शिखर परिषद) उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत होईल. वेव्हज् हे भारताचे एक महत्त्वपूर्ण आणि जागतिक ख्यातीचे व्यासपीठ असून ते सर्व प्रसारमाध्यमे आणि मनोरंजन (M&E) क्षेत्राला एकत्र जोडते. या उद्घाटन कार्यक्रमात भारतीय संस्कृती, परंपरा; तसेच प्रसारमाध्यमे आणि मनोरंजन क्षेत्रातील भारताच्या प्रगतीचे दर्शन घडणार आहे.

## भारत पॅव्हेलियन

१ ते ४ मे २०२५ सकाळी ९:३० पासून सायं. ५:३० पर्यंत दालन क्रमांक-३

भारत पॅव्हेलियनमध्ये देशातील समृद्ध साहित्य व संस्कृतीच्या प्राचीन वारशाचे प्रतिबिंब दिसणार असून जगभरातील प्रेक्षकांना भारताच्या प्रसारमाध्यमांच्या आणि मनोरंजनाच्या प्रगतीसंबंधी सखोल माहिती मिळविण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

## प्रदर्शन दालन

१ ते ४ मे २०२५ सकाळी ९:३० पासून सायं. ५:३० पर्यंत दालन क्रमांक १,२ आणि ३.

कल्पकता आणि नवनवीन उपक्रमांच्या संगमाचे हे एक अनोखे प्रदर्शन असणार आहे.
वर्तमान अत्याधुनिक तंत्रज्ञानापासून भविष्यातील प्रवाहापर्यंत प्रसारमाध्यमे आणि मनोरंजन क्षेत्रातील भारताचे आणि जागतिक पातळीवरील प्रगतीचे दर्शन या ठिकाणी घडणार आहे.

## क्रीडा दालन

१ ते ४ मे २०२५ सकाळी ९:३० पासून सायं. ५:३० पर्यंत दालन क्रमांक १

'इमर्सिव्ह गेमप्ले'च्या थरारक आणि चित्ताकर्षक अनुभवासाठी या दालनाची उभारणी करण्यात आली आहे.

## वेव्हज् बाजार

१ ते ३ मे २०२५, १०५ ए आणि बी, १०४ अ, १०३ क्यूब आणि स्टुडिओ

वेव्हज् बाजार ही 'क्रिएटर इकॉनॉमी'साठी एक जागतिक बाजारपेठ असून बीटूबी आणि बीटूजी सहकार्याची सुविधा उपलब्ध असणार आहे. त्याचप्रमाणे ग्राहक आणि विक्रेता यांच्यात बैठका, सहनिर्मिती संबंधी करार; तसेच संहिता आणि संगीतापासून ते ॲनिमेशन आणि कॉमिक्स (विनोदी चित्रकथा) पर्यंत वेगवेगळ्या स्वरूपातील आशयाची देवाणघेवाण करण्याची सुविधा उपलब्ध असेल.

Mrgabharti_75000

## ६ माध्यम-मनोरंजन क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेची क्रांती!

माध्यम आणि मनोरंजन क्षेत्र एका नव्या युगाच्या उंबरठ्यावर उभे आहे. 'वेव्हज् २०२५' सारखे कार्यक्रम या स्थित्यंतराच्या काळात सहयोग आणि नवनवीन कल्पनांना चालना देण्यासाठी अत्यावश्यक आहेत. AI च्या आव्हानांकडे दुर्लक्ष न करता त्याचा सकारात्मक स्वीकार केल्यास माध्यम आणि मनोरंजन क्षेत्र जगभरातील प्रेक्षकांना आकर्षित करत; तसेच उत्कृष्ट आशय निर्माण करत विकसित होत राहील. 'वेव्हज् २०२५' निःसंशयपणे या भविष्याला आकार देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल.

**- ब्रिजेश सिंह, (भा.पो.से.)**

## ३९ विकासाची पर्वणी सिंहस्थ कुंभमेळा

मंत्रभूमी, तपोभूमी, देवभूमी, यंत्रभूमी अशी ओळख असणारा नाशिक जिल्हा आध्यात्मिक आणि सांस्कृतिक पर्यटनाचे केंद्र बनला आहे. प्रभू रामचंद्रांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या भूमीत दर १२ वर्षांनी होणारा सिंहस्थ कुंभमेळा हा अध्यात्माचा भव्य दिव्य सोहळा असतो.

## ४७ अन्नसुरक्षेसाठी जनजागृती!

आजच्या गतिमान जीवनात प्रत्येक नागरिकाला सुरक्षित, पौष्टिक व गुणवत्तापूर्ण अन्न प्राप्त होणे अत्यावश्यक आहे. अन्न हे केवळ शारीरिक अस्तित्वासाठीच नव्हे, तर उत्तम आरोग्यासाठी आणि पर्यायाने, समाजाच्या प्रगतीसाठी मूलभूत घटक आहे. या महत्त्वपूर्ण गरजेची जाणीव ठेवून भारत सरकारने 'अन्नसुरक्षा व मानके कायदा २००६' (Food Safety and Standards Act 2006) अधिनियमित केला आहे.

## ५५ रयतेच्या राजाला ऐतिहासिक मानवंदना!

छत्रपती शिवाजी महाराज म्हणजे दृढनिश्चय, समर्पण, त्याग... छत्रपती शिवाजी महाराज म्हणजे शौर्य, स्वाभिमान आणि स्वातंत्र्याची शाश्वत इच्छा... हिंदवी स्वराज्याचे सुवर्ण सिंहासन जिथे स्थापन झाले होते, त्या ऐतिहासिक रायगड किल्ल्याला भेट देणे ही खूप भाग्याची गोष्ट असून, त्या भावना शब्दांत वर्णन करता येऊ शकत नाहीत.


नव्या युगाचा वेव्हज् बाजार!
किशोर गांगुर्डे — ९

भारताची नवी ओळख कंटेंट सुपरपॉवर!
वर्षा फडके-आंधळे — ११

माध्यम-मनोरंजन क्षेत्राचा अनोखा 'लगान' क्षण!
आमिर खान, अभिनेता आणि निर्माता — १३

मनोरंजन क्षेत्राची उज्ज्वल भवितव्याकडे आगेकूच!
अनिल कपूर, अभिनेता — १५

खादी : एक शाश्वत फॅशन!
धनलक्ष्मी पी. — १७

कम्युनिटी रेडिओतून जनप्रबोधनाच्या लहरी!
डॉ. बृजेंद्रसिंह पनवर — १९

समृद्ध परंपरेशी तंत्रज्ञानाची सांगड!
अतनु घोष — २२

स्मरणरंजन घडवणारी चित्रपटांची पोस्टर्स!
डॉ. मिलिंद दामले — २५

भारतीय चित्रपटसृष्टीची एक दृश्यात्मक वाटचाल
सुबोध गुरुजी — २८

प्रशासनाची टेक वारी !
संध्या गरवारे — ३२

कामगार हिताचे संरक्षण
ॲड. आकाश फुंडकर, कामगार मंत्री — ३४

सागर किनाऱ्याच्या सुरक्षेसाठी चौथा डोळा!
हेमंतकुमार चव्हाण — ३५

सकारात्मक परिवर्तनाची बस!
गजानन जाधव — ३७

शबरी नॅचरल्स: आदिवासी संस्कृतीचा ई-प्रवास
लीना बनसोड (भा.प्र.से.) — ४१

'बाईक टॅक्सी' धोरणातून परिवहन सेवेत सुलभता
निलेश तायडे — ४३

पारदर्शक कारभार, युवकांना सुरक्षित रोजगार
मंगल प्रभात लोढा, रोजगार मंत्री — ४५

तृतीयपंथीयांच्या कल्याणासाठी मंडळाची पुनर्रचना
शैलजा देशमुख — ४६

जलसाक्षरतेतून जलव्यवस्थापनाकडे!
एकनाथ पोवार — ५३

Mrgabharti_75000

वर्ष ७६ वे | अंक ४ | मे २०२५

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- व्यवस्थापकीय संपादक — हेमराज बागुल
- संपादक — केशव करंदीकर
- सहसंपादक — अर्चना देशमुख, अश्विनी पुजारी
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — भाग्यश्री पेठकर
- मुद्रण — मे. प्रिंटरेड इश्युज (इंडिया) प्रा.लि., १७, प्रगती इंडस्ट्रियल इस्टेट, एन.एम.जोशी मार्ग, मुंबई - ४०००११.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालयासमोर,
मुंबई-४०० ०३२.
E-mail : lokrajya2011@gmail.com

ई - लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमत असेलच असे नाही.



# 'वेव्हज्'च्या निमित्ताने...

मुंबईत १ ते ४ मे दरम्यान 'वेव्हज्' अर्थात वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल अँड एंटरटेन्मेंट समिट या माध्यम आणि मनोरंजन उद्योगविषयक जागतिक परिषदेचे आयोजन करण्यात येत आहे. या अत्यंत महत्त्वपूर्ण परिषदेच्या आयोजनाचा सन्मान महाराष्ट्राला मिळणे, ही आपल्या सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे!

जगातील माध्यम आणि मनोरंजन उद्योग प्रचंड गतीने विकसित होत आहे. माध्यम आणि मनोरंजन उद्योगावर आधारित अर्थव्यवस्थाही मोठ्या प्रमाणावर विस्तारत आहे. या नव्या क्रिएटिव्ह इकॉनॉमीत भारत अग्रेसर असावा, हा आदरणीय प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजी यांचा निर्धार आहे. त्यांच्या पुढाकारातूनच वेव्हज् परिषद होत आहे. या परिषदेत शंभरहून अधिक देशांचे पाच हजार प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. या निमित्ताने देशातील सृजनशीलता जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडली जाण्यास मोठी मदत होणार आहे.

आदरणीय प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजी यांच्या द्रष्ट्या धोरणांमुळे भारत महासत्ता होण्याकडे वेगाने वाटचाल करत आहे. ओटीटी, ॲनिमेशन, गेमिंग, व्हीएफएक्स, संगीत आणि डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये देशाने विक्रमी प्रगती केली आहे.

या क्षेत्रात रोजगार निर्मितीची मोठी क्षमता आहे. देशातील तरुणाई या नव्या व्यवस्थेची केवळ लाभधारकच असू नये, तर तिचे जागतिक नेतृत्व भारताकडे यावे, ही आमची महत्त्वाकांक्षा आहे. त्या निमित्ताने महाराष्ट्र आणि देशभरातील माध्यम आणि मनोरंजन क्षेत्राला एक ग्लोबल प्लॅटफॉर्म प्राप्त होण्यासोबतच मुंबई जागतिक माध्यम मनोरंजन उद्योगाची राजधानी म्हणून विकसित व्हावी, असा आमचा निर्धार आहे.

या 'वेव्हज्' अर्थात वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल अँड एंटरटेन्मेंट समिटच्या यशस्वीतेसाठी सर्वांनी आपले योगदान द्यावे, या आवाहनासह या परिषदेच्या संयोजनास मनःपूर्वक शुभेच्छा!

**- देवेंद्र फडणवीस**
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.

Mrgabbharti_75000

# संस्कृती, सृजन आणि समृद्धी!

विविध क्षेत्रांना अधिक बळकटी देणारी धोरणे दमदारपणे राबवत 'महाराष्ट्र आता थांबणार नाही, विकास आता लांबणार नाही' ही ग्वाही राज्य शासनाने महाराष्ट्रातील जनतेला दिली आहेच. या पार्श्वभूमीवर देशाची आर्थिक राजधानी आणि माध्यम-मनोरंजन नगरीही असणाऱ्या मुंबईत १ ते ४ मे दरम्यान वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेन्मेंट समिट अर्थात 'वेव्हज' (WAVES 2025) या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. माध्यम आणि मनोरंजन उद्योगांचे देशाच्या सांस्कृतिक जडणघडणीतच नव्हे, तर आर्थिक प्रगतीतही असलेले मोठे योगदान ओळखून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून 'वेव्हज्' या ग्लोबल प्लॅटफॉर्मची निर्मिती झाली आहे. केंद्र सरकारचे माहिती आणि प्रसारण मंत्रालय व महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने ही परिषद आयोजित करण्यात आली आहे. माध्यम आणि मनोरंजन उद्योगाची भविष्यातील दिशा आणि या क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वाढत्या प्रभावासंदर्भात या परिषदेत सखोल विचारमंथन होईल.

या परिषदेच्या निमित्ताने संपूर्ण माध्यम आणि मनोरंजन उद्योगांचे अग्रणी एकाच व्यासपीठावर येत आहेत. भारताच्या माध्यम आणि मनोरंजन उद्योगाला जागतिक बाजारपेठेशी जोडण्याबरोबरच आंतरराष्ट्रीय स्तरावरील या उद्योगाला भारतात निर्मितीची संधी देऊन परस्परांच्या विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणे, हे या परिषदेचे उद्दिष्ट आहे. आशयसंपन्न निर्मिती, बौद्धिक संपदा आणि तांत्रिक सृजनाचे केंद्र म्हणून भारताचे स्थान बळकट करून भारताच्या सृजनशीलतेला बळ देण्यासाठी हे व्यासपीठ सज्ज झाले आहे. जागतिक नेते, धोरणकर्ते, माध्यम व्यावसायिक आणि कलाकारांना एकत्र आणून आंतरराष्ट्रीय सहकार्य, तंत्रज्ञान, सृजन आणि नीतिमत्ता जपण्यावर भर देत दृक्श्राव्य आणि मनोरंजन क्षेत्राच्या भवितव्याला आकार देण्यासाठी विधायक आणि प्रगतिशील संवाद घडवून आणणे, हा या परिषदेच्या आयोजनाचा उद्देश आहे.

आज माध्यम आणि मनोरंजन उद्योग गतीने पुढे जात आहे. 'कृत्रिम बुद्धिमत्ते'च्या साहाय्याने आशय निर्मितीपासून ग्राहकांपर्यंत पोहोचण्याच्या प्रत्येक पैलूला नव्याने आकार दिला जात आहे. या माध्यमातून केवळ कार्यक्षमता वाढवणारी प्रणाली निर्माण करणे अपेक्षित नसून सृजनशीलतेच्या कक्षा रुंदावणारे एक शक्तिशाली व्यासपीठ निर्माण करणे अपेक्षित आहे. 'वेव्हज् २०२५' सारखे मंच या तांत्रिक प्रगतीचा आणि त्याच्या परिणामांचा सखोल विचार करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरतील.

मराठी चित्रपट उद्योग आता ऑडिओ-व्हिज्युअल गेमिंग, कॉमिक्स यांसारख्या क्षेत्रांकडे वळत आहे. चित्रपटसृष्टीतील कलाकार व तंत्रज्ञ यांना विशेष प्रशिक्षण देऊन जागतिक पातळीवर मराठी चित्रपटसृष्टीचे स्थान अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल टाकण्यात आले आहे.

या अंकात प्रसिद्ध अभिनेते आमिर खान व अनिल कपूर यांनी देशातील विस्तारणाऱ्या माध्यम व मनोरंजन क्षेत्राच्या नवनवीन क्षितिजांचा मागोवा घेतला आहे. माध्यम व मनोरंजन उद्योगाच्या भविष्यातील वाटचालीसंदर्भात जागतिक कंटेंट हबची भारताला संधी, जनप्रबोधनासाठी कम्युनिटी रेडिओ, परंपरा जपत बदलणारे तंत्रज्ञान तसेच चित्रपट पोस्टर्सचा 'नॉस्टेल्जिया' यासारख्या विषयांचा धांडोळाही या विशेष अंकात घेण्यात आला आहे.

याबरोबरच या अंकात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने गडचिरोली जिल्ह्यातील अतिदुर्गम भागात सुरू झालेल्या राज्य परिवहन महामंडळाच्या बसचा प्रवास, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३४५ व्या स्मृतिदिनानिमित्त किल्ले रायगडावर झालेला विशेष सोहळा याचाही वृत्तांत आहे.

महाराष्ट्र खासगी पदयोजन संस्था विधेयकाबाबत माहिती देणारा कौशल्य, रोजगार उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या लेखाचा समावेश या अंकात आहे.

कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी शासनाने कामगार हितासाठी घेण्यात आलेले निर्णय याबद्दल माहिती देताना कामगारांचे हित जपत धोरणात्मक सुधारणांवर अधिक भर देण्यात येत असल्याची ग्वाही दिली आहे.

राज्यातील प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी यांच्या कौशल्य विकासासाठी प्रशिक्षण संस्कृती निर्माण करण्याच्या उद्देशाने टेक वारी: महाराष्ट्र टेक लर्निंग विक याबाबत अपर मुख्य सचिव व्ही. राधा यांनी सविस्तर माहिती दिली आहे. याबरोबरच सागरी किनाऱ्यांच्या सुरक्षेसाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजना, सिंहस्थ कुंभमेळा, शबरी नॅचरल्स, बाईक टॅक्सी, अन्नसुरक्षा व जलसाक्षरतेतून जलव्यवस्थापन या विषयांचाही मागोवा घेण्यात आला आहे. वेव्हज् जागतिक परिषद आणि इतर माहितीपूर्ण लेखांचा समावेश असणारा 'लोकराज्य'चा अंक वाचकांच्या पसंतीस उतरेल, अशी आशा आहे.

**ब्रिजेश सिंह**
(मुख्य संपादक)

Mrgabharti 75000

**माध्यम आणि मनोरंजन क्षेत्र एका नव्या युगाच्या उंबरठ्यावर उभे आहे. 'वेव्हज् २०२५' सारखे कार्यक्रम या स्थित्यंतराच्या काळात सहयोग आणि नवनवीन कल्पनांना चालना देण्यासाठी अत्यावश्यक आहेत. AI च्या आव्हानांकडे दुर्लक्ष न करता त्याचा सकारात्मक स्वीकार केल्यास माध्यम आणि मनोरंजन क्षेत्र जगभरातील प्रेक्षकांना आकर्षित करत; तसेच उत्कृष्ट आशय निर्माण करत विकसित होत राहील. 'वेव्हज् २०२५' निःसंशयपणे या भविष्याला आकार देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल. प्रधानमंत्री, केंद्रीय मंत्री आणि मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत सुरू होणारी ही परिषद भारताच्या उज्ज्वल भविष्याची नांदी ठरेल, अशी आशा आहे.**

# माध्यम-मनोरंजन क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेची क्रांती!

**ब्रिजेश सिंह,** (भा.पो.से.)



आज भारताच्या माध्यम आणि मनोरंजन (M&E) क्षेत्रासाठी एक ऐतिहासिक क्षण आहे. देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मुंबईतील प्रतिष्ठित जिओ वर्ल्ड सेंटर येथे येत्या १ मे रोजी 'वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल अँड एंटरटेनमेंट समिट' (WAVES) २०२५ चे भव्य उद्घाटन होत आहे. या महत्त्वपूर्ण प्रसंगी केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती असेल. १ ते ४ मे दरम्यान चालणारी ही परिषद केंद्र सरकारचे माहिती आणि प्रसारण मंत्रालय व महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली असून, ती माध्यम आणि मनोरंजन उद्योगातील भविष्यातील दिशा आणि विशेषतः कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (Artificial Intelligence - AI) वाढत्या प्रभावावर प्रकाश टाकणारी आहे.

## महाराष्ट्राला ग्लोबल क्रिएटर इकॉनॉमी बनविण्याचे उद्दिष्ट


मुंबई आणि महाराष्ट्र हे देशातील करमणूक क्षेत्राचे प्रमुख मध्यवर्ती केंद्र आहे. बॉलीवूडसह टीव्ही इंडस्ट्री, ओटीटी इंडस्ट्रीचे केंद्र मुंबईत असून, ही महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद बाब आहे. आता मुंबई आणि महाराष्ट्राला ग्लोबल क्रिएटर हब आणि इकॉनॉमी बनवण्याचे उद्दिष्ट असून त्याचाच भाग म्हणून या पहिल्या आंतरराष्ट्रीय WAVES परिषदेचे आयोजन मुंबईत करण्यात आले आहे. ऑस्कर, कान्स महोत्सव, दावोस परिषद यांसारख्या आंतरराष्ट्रीय परिषदांच्या धर्तीवर WAVES चे आयोजन करण्यात येत आहे. जगभरातील शंभराहून अधिक देशातील प्रतिनिधी या परिषदेमध्ये सहभागी होणार आहेत.

## कृत्रिम बुद्धिमत्ता : मनोरंजन विश्वाचा कायापालट करणारी शक्ती

माध्यम आणि मनोरंजन उद्योग आज एका मोठ्या स्थित्यंतरातून जात आहे आणि या बदलाच्या केंद्रस्थानी आहे 'कृत्रिम बुद्धिमत्ता'. आशय निर्मितीपासून ते प्रेक्षकांपर्यंत पोहोचणे आणि त्यांच्या अनुभवाला अधिक व्यक्तिगत करण्यापर्यंत AI या उद्योगाच्या प्रत्येक पैलूला नव्याने आकार देत आहे. ही केवळ कार्यक्षमता वाढवणारी प्रणाली नाही, तर सर्जनशीलतेच्या नव्या कक्षा रुंदावणारे एक शक्तिशाली साधन आहे. 'वेव्हज् २०२५' सारखे मंच या तांत्रिक प्रगतीचा आणि त्याच्या परिणामांचा सखोल विचार करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरतात.



Mrigabharti_75000



## आशय निर्मिती आणि विकासातील 'एआय'चा चमत्कार

कथा कशी लिहावी, संगीत कसे तयार करावे किंवा दृश्यकला कशी साकार करावी? या सर्व सर्जनशील प्रक्रियांमध्ये AI आता लेखकांना, संगीतकारांना आणि कलाकारांना मदत करत आहे.

**पटकथा आणि कथा निर्मिती :** AI आधारित साधने आता कथानकाचे संभाव्य मार्ग, पात्रांचे विकासक्रम आणि संवादांसाठी सूचना देऊ शकतात. ज्यामुळे लेखकांना नवीन कल्पना मिळण्यास मदत होते.

**संगीत रचना :** विशिष्ट मूड किंवा शैलीनुसार मूळ संगीत तयार करणारे अल्गोरिदम्स आता उपलब्ध आहेत. ज्यामुळे पार्श्वसंगीताची निर्मिती सोपी झाली आहे.

**दृश्यकला आणि डिझाईन :** संकल्पना चित्रे (Concept Art), पात्रांची रचना (Character Design) आणि आभासी वातावरण (Virtual Environments) तयार करून AI प्री-प्रॉडक्शनचा वेग वाढवत आहे.

**स्वयंचलित पत्रकारिता :** डेटा फिड्सच्या आधारावर मूलभूत बातम्यांचे मसुदे आणि सारांश तयार करून AI पत्रकारितेतही आपले स्थान निर्माण करत आहे.

## निर्मिती आणि निर्मिती-पश्चात (Post - Production) प्रक्रियेत AI चा हातभार

चित्रपट किंवा कोणत्याही दृक्श्राव्य माध्यमाच्या निर्मिती आणि संपादन प्रक्रियेत AI मुळे मोठे बदल घडत आहेत.

**व्हिज्युअल इफेक्ट्स (VFX) :** रोटोस्कोपिंग आणि ऑब्जेक्ट रिमूव्हलसारख्या किचकट प्रक्रिया AI मुळे अधिक वेगाने आणि अचूकपणे करता येतात.

**स्वयंचलित संपादन :** AI हे फुटेजचे विश्लेषण करून प्राथमिक कट (Rough Cut) तयार करू शकते आणि सर्वोत्तम शॉट्स निवडण्यास मदत करते.

**डबिंग आणि सबटायटलिंग :** जलद आणि अचूक भाषांतरामुळे विविध भाषांमधील प्रेक्षकांपर्यंत आशय पोहोचवणे सोपे झाले आहे. ज्यामुळे जागतिक स्तरावर प्रवेश सुलभ होतो.

**कलर ग्रेडिंग आणि ऑडिओ मास्टरिंग :** अंतिम उत्पादनाची गुणवत्ता उत्कृष्ट राखण्यासाठी AI रंगसंगती आणि ध्वनी संपादनातही मदत करते.

## आशय वितरण आणि शोध (Content Distribution Discovery)

नेटफ्लिक्स आणि यु-ट्यूबसारखे प्लॅटफॉर्म AI चा वापर करून प्रेक्षकांच्या आवडीनिवडी ओळखतात आणि त्यांना त्यांच्या आवडीनुसार शिफारसी (Recommendations) देतात.

**कंटेंट टॅगिंग आणि मेटाडेटा :** AI आशयाला योग्य टॅग्स आणि मेटाडेटा जोडून तो शोधणे (Searchability) सोपे करते.

**ऑप्टिमाइज्ड डिलिव्हरी :** स्ट्रिमिंगचा अनुभव विनाअडथळा आणि उच्च दर्जाचा राहावा, यासाठी वितरण नेटवर्कला अनुकूलित करते.

**पायरसी डिटेक्शन :** बौद्धिक संपदेचे संरक्षण करण्यासाठी अनधिकृत वितरणावर लक्ष ठेवण्यास AI मदत करते.

## प्रेक्षक प्रतिबद्धता आणि वैयक्तिकरण (Audience Engagement Personalization)

AI प्रेक्षकांच्या अनुभवाला अधिक वैयक्तिक बनवते.

**लक्ष्यित जाहिराती :** प्रेक्षकांच्या आवडीनुसार डायनॅमिक पद्धतीने जाहिराती दाखवल्या जातात.

**भावना विश्लेषण (Sentiment Analysis) :** सोशल मीडिया आणि पुनरावलोकनांचे विश्लेषण करून प्रेक्षकांच्या प्रतिक्रिया समजून घेण्यास मदत करते.

**चॅटबॉट्स आणि व्हर्च्युअल असिस्टंट :** त्वरित प्रतिसाद आणि माहिती देऊन वापरकर्त्यांशी संवाद सुधारतात.

## कमाई आणि विश्लेषण (Monetization Analytics)

**भविष्यवेधी विश्लेषण (Predictive Analytics) :** कोणता आशय यशस्वी होईल, याचा अंदाज लावून धोरणात्मक निर्णय घेण्यास मदत करते.

Mrgabharti_75000

**हक्क व्यवस्थापन (Rights Management) :** आशयाच्या वापराचे नियम आणि योग्य मोबदला सुनिश्चित करण्यासाठी AI प्रक्रिया सुलभ करते.

## माध्यम-मनोरंजनाच्या भविष्याला आकार

मुंबईत १ ते ४ मे दरम्यान जिओ वर्ल्ड सेंटर येथे होणारी 'वेव्हज २०२५' शिखर परिषद माध्यम आणि मनोरंजन उद्योगासाठी एक मैलाचा दगड ठरणार आहे. भारताचा समृद्ध सांस्कृतिक वारसा आणि प्रतिभेचा उपयोग करून देशाला आशय निर्मिती आणि गुंतवणुकीसाठी एक प्रमुख जागतिक केंद्र म्हणून स्थापित करणे, हा या परिषदेचा मुख्य उद्देश आहे.

जगभरातील उद्योगातील नेते, भागधारक आणि नवोन्मेषक येथे एकत्र येऊन चर्चा, सहयोग आणि नवीन कल्पनांवर विचारविनिमय करतील.

## 'वेव्हज् बाजार': खरेदीदार आणि विक्रेत्यांना जोडणारा पूल

'वेव्हज् बाजार' हा या परिषदेचा एक महत्त्वाचा भाग आहे. ही एक सहयोगी व्यावसायिक परिसंस्था (Ecosystem) आहे, जिथे खरेदीदार नवीन प्रकल्प शोधू शकतात, त्यात स्वारस्य दाखवू शकतात आणि विक्रेत्यांशी संपर्क साधू शकतात. त्याच वेळी विक्रेते त्यांचे प्रकल्प प्रदर्शित करू शकतात आणि व्यवसायाच्या नवीन संधी शोधू शकतात. श्रेणी-आधारित शोध (Category-based search) आणि सुरक्षित संदेश प्रणाली (Secure Messaging) यांसारख्या वैशिष्ट्यांमुळे उद्योगात संपर्क साधणे आणि सहयोग करणे सोपे होते.

## 'वेव्हज २०२५' मधील प्रमुख आकर्षणे

या परिषदेत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे -

**परिषद सत्रे :** जागतिक विचारवंत आणि उद्योगतज्ज्ञांच्या नेतृत्वाखाली विविध विषयांवर सत्रे आयोजित केली जातील.

**मीडिया मार्केटप्लेस :** भारताच्या माध्यम आणि मनोरंजन क्षेत्राची क्षमता आणि विविधता दर्शवणारा एक विशेष विभाग.

**प्रदर्शन :** अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि सर्जनशील कामांचे प्रदर्शन.

**सांस्कृतिक कार्यक्रम :** भारताच्या समृद्ध कला आणि संस्कृतीची झलक दाखवणारे कार्यक्रम उपस्थितांना मंत्रमुग्ध करतील.

## ताज्या बातम्या आणि अपडेट्स

'वेव्हज् २०२५' माध्यम आणि मनोरंजन उद्योगातील नवीनतम ट्रेंड्स आणि घडामोडींचा सर्वांगीण आढावा घेईल. AI आणि इतर तंत्रज्ञान कसे नवनवीन शोध आणि विकासाला चालना देत आहेत,




यावर विशेष लक्ष केंद्रित करून हे क्षेत्र भविष्यात कसे विकसित होईल, याची अंतर्दृष्टी देईल.

## आव्हाने आणि विचार करण्यासारखे मुद्दे

AI मुळे मिळणारे फायदे प्रचंड असले तरी काही आव्हाने आणि नैतिक प्रश्नही आहेत, ज्यांचा विचार करणे आवश्यक आहे.

**नोकऱ्यांवर परिणाम :** ऑटोमेशनमुळे काही पारंपरिक नोकऱ्या कमी होण्याची भीती आहे.

**नैतिक चिंता :** डीपफेकसारख्या तंत्रज्ञानाचा गैरवापर होण्याची शक्यता आहे.

**डेटा गोपनीयता :** वापरकर्त्यांच्या डेटाची सुरक्षा आणि गोपनीयता जपणे महत्त्वाचे आहे.

**सर्जनशीलतेतील मानवी घटक :** तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे मूळ मानवी सर्जनशीलता आणि भावनांचा स्पर्श कमी होण्याची चिंता.

या आव्हानांना सामोरे जाताना उद्योगाला काळजीपूर्वक संतुलन साधावे लागेल. AI हे मानवी प्रतिभेला पूरक ठरावे, तिची जागा घेणारे नको, याची खात्री करावी लागेल. सर्जनशील उद्योगांमध्ये मानवी स्पर्श नेहमीच महत्त्वाचा राहील.

माध्यम आणि मनोरंजन क्षेत्र एका नव्या युगाच्या उंबरठ्यावर उभे आहे. 'वेव्हज् २०२५' सारखे कार्यक्रम या स्थित्यंतराच्या काळात सहयोग आणि नवनवीन कल्पनांना चालना देण्यासाठी अत्यावश्यक आहेत. AI चा करमणूक उद्योगातील समावेश हा केवळ एक ट्रेंड नसून एक मूलभूत बदल आहे, जो अधिक कार्यक्षमता, वैयक्तिकरण आणि सर्जनशील शक्यतांची खात्री देतो. AI च्या आव्हानांकडे दुर्लक्ष न करता त्याचा सकारात्मक स्वीकार केल्यास माध्यम आणि मनोरंजन क्षेत्र जगभरातील प्रेक्षकांना आकर्षित करत; तसेच उत्कृष्ट आशय निर्माण करत विकसित होत राहील. 'वेव्हज् २०२५' निः संशयपणे या भविष्याला आकार देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल. भागधारकांना एकत्र येऊन नवनवीन शोध लावून उद्योगाला सर्जनशीलता आणि तांत्रिक प्रगतीच्या एका नव्या युगात नेण्यासाठी एक मजबूत व्यासपीठ प्रदान करेल. प्रधानमंत्री, केंद्रीय मंत्री आणि मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत सुरू होणारी ही परिषद भारताच्या उज्ज्वल भविष्याची नांदी ठरेल, अशी आशा आहे.

(लेखक माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक आहेत. त्यांचे 'द क्लाऊड चॅरियट' हे पुस्तक प्रसिद्ध आहे.)

Mrgabharti 75000

**माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रासाठी एक मैलाचा दगड ठरणारे पहिले जागतिक दृक्श्राव्य आणि मनोरंजन शिखर संमेलन अर्थात वेव्हज्चे (World Audio & Visual Entertainment Summit) मुंबईत आयोजन करण्यात आले आहे. उद्योग व्यावसायिक, गुंतवणुकदार, निर्माते आणि सृजनातून नवनिर्मिती करणाऱ्यांसाठी हे शिखर संमेलन महत्त्वाची पर्वणी ठरणार आहे.**

# नव्या युगाचा वेव्हज् बाजार!

**किशोर गांगुर्डे**

१ ते ४ मे २०२५ या कालावधीत मुंबईच्या वांद्रे-कुर्ला संकुलातील जिओ वर्ल्ड सेंटरमध्ये आयोजित या परिषदेतील 'वेव्हज् बाजार' हा वेव्हज् शिखर परिषदेतील एक महत्त्वाचा भाग असून ते माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रासाठी एक उत्कृष्ट व्यावसायिक संधी देणारे व्यासपीठ तर ठरणारच आहे, शिवाय जागतिक मनोरंजन देवाणघेवाणीसाठी एक महत्त्वाचे केंद्र बनण्यासदेखील मदत होणार आहे.

भारतात माध्यम आणि मनोरंजन क्षेत्राचा झपाट्याने विकास होत आहे, या क्षेत्रात लक्षणीय बदल होत असून, डिजिटल मीडियाने एका नव्या पर्वाची सुरुवात केली आहे. सन २०२४ मध्ये भारतातील माध्यम आणि मनोरंजन उद्योग क्षेत्रात वाढ दर्शवली असली, तरी तुलनेने ती माफक म्हणजे ३.३ टक्के होती. या क्षेत्राचा भारताच्या सकल राष्ट्रीय उत्पादनात ०.७३ टक्के वाटा आहे. २०२५ मध्ये या उद्योगातील वाढ ७.२ टक्क्यांवर जाईल, असा अंदाज आहे. भारतातील माध्यम आणि मनोरंजन उद्योगाच्या क्षेत्रात डिजिटल मीडिया हा सर्वात मोठा घटक ठरला असून, ज्याने या क्षेत्रातील महसुलात ३२ टक्के इतके योगदान दिले आहे, असे 'फिक्की - ई ॲण्ड वाय' च्या मार्च २०२५ च्या 'Shape the future: Indian media and entertainment is scripting a new story' या अहवालात नमूद केले आहे.

देशात माध्यम आणि मनोरंजन क्षेत्राचा विकास होत आहे, त्याचवेळी या उद्योगातील व्यावसायिकांना एक हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी 'वेव्हज् बाजार' ही एक ऑनलाइन बाजारपेठ सुरू झाली आहे, जागतिक मनोरंजन उद्योगातील व्यावसायिकांना, व्यवसायांना आणि निर्मात्यांना जोडणारी एक नावीन्यपूर्ण ऑनलाइन बाजारपेठ असलेल्या वेव्हज् बाजारचे जानेवारी महिन्यात औपचारिक उद्घाटन झाले.

भारताची सर्जनशील क्षमता वाढवण्यासाठी आणि सामग्री निर्मिती, बौद्धिक संपदा आणि तांत्रिक नवकल्पनांचे केंद्र म्हणून वेव्हज् बाजार सज्ज झाले आहे. यात प्रसारमाध्यमे, प्रिंट माध्यमे, दूरचित्रवाणी, रेडिओ, चित्रपट, ॲनिमेशन, व्हीएफएक्स, गेमिंग, कॉमिक्स, ध्वनी आणि संगीत, जाहिरात, डिजिटल माध्यमे, सोशल मीडिया प्लॅटफॉर्म, जनरेटिव्ह एआय, ऑगमेंटेड रिॲलिटी (एआर), व्हर्च्युअल रिॲलिटी (व्हीआर) आणि एक्सटेंडेड रिॲलिटी (एक्सआर) यांसारख्या उद्योग आणि क्षेत्रांवर लक्ष केंद्रित केले जाईल.

'वेव्हज् बाजार' ही केवळ एक पारंपरिक बाजारपेठ नाही, तर जिथे वस्तूंची थेट विक्री होते. अशी ही एक विशेषज्ञाधारित बाजारपेठ आहे, जी खास करून मनोरंजन आणि माध्यम क्षेत्रातील व्यावसायिक गरजा पूर्ण करण्यासाठी तयार करण्यात आली आहे. यामध्ये चित्रपट, दृक्श्राव्य, गेमिंग, ॲनिमेशन आणि व्हिज्युअल इफेक्ट्स यांसारख्या उदयोन्मुख आणि महत्त्वाच्या उद्योगांचा समावेश आहे. दुहेरी स्वरूप असलेली ही एक जागतिक स्तरावरील ऑनलाइन बाजारपेठ असून, जिथे या क्षेत्रातील व्यावसायिक वर्षभर एकमेकांशी संपर्क साधू शकतात, आपल्या सेवा आणि उत्पादनांचे प्रदर्शन करू शकतात आणि नवीन व्यावसायिक संधी शोधू शकतात. दुसरीकडे, 'वेव्हज् बाजार' एका मोठ्या कार्यक्रमाचा भाग म्हणून प्रत्यक्ष स्वरूपातदेखील आयोजित केला जातो.

### वेव्हज् बाजारातील घटक

वेव्हज् बाजारामध्ये माध्यम आणि मनोरंजनाच्या विविध क्षेत्रांचा अथवा घटकांचा समावेश होतो आणि या क्षेत्रातील उद्योग व्यावसायिकांसाठी या बाजारात



Mrgabharti_75000

एकाच ठिकाणी विविध पर्याय उपलब्ध करून दिले आहेत.

**चित्रपट आणि टीव्ही/वेबसिरीज -** जागतिक वितरक, ओटीटी प्लॅटफॉर्म्स आणि विविध फेस्टिव्हल्सचे आयोजक इथे जोडले जाणार आहेत.

**एव्हीजीसी (AVGC - ॲनिमेशन, VFX, गेमिंग, कॉमिक्स) -** गुंतवणूकदार, खरेदीदार आणि प्रकाशन प्लॅटफॉर्म्सना त्यांच्या निर्मिती साहित्याचे प्रदर्शन करता येणार आहे.

**रेडिओ आणि पॉडकास्ट -** ऑडिओ प्रकारातील साहित्य निर्मात्यांसाठी एक समर्पित ठिकाण, जिथे त्यांच्या निर्मिती साहित्याबरोबरच प्रायोजकत्व मिळण्यास देखील मदत होणार आहे.




**संगीत आणि ध्वनी -** संगीत निर्माते आणि साऊंड डिझाइनर्सना परवाना संधी आणि सहयोग मिळणार आहे.

**लाईव्ह इव्हेंट्स आणि इन्फ्लुएंसर मार्केटिंग -** प्रायोजकत्व, ब्रँड भागीदारी आणि प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्याची संधी.

वेव्हज् बाजारच्या माध्यमातून चित्रपट निर्माते, वितरक, गेम डेव्हलपर्स, Animation स्टुडिओ आणि VFX कंपन्यांना व्यावसायिक संधी, मनोरंजन आणि माध्यम सामग्रीच्या खरेदी-विक्रीत सुलभता, कामाचे प्रदर्शन, ज्ञान आणि अनुभवांचे आदानप्रदान, गुंतवणूकदारांना आकर्षित करण्याची संधी मिळण्याबरोबरच तयार होणारे नेटवर्किंग भविष्यकाळासाठी महत्त्वाचे ठरतील.

माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रातील खरेदीदार आणि विक्रेत्यांना जोडण्यात वेव्हज् बाजार महत्त्वाचा ठरणार आहे, या ठिकाणी विक्रेते त्यांचे चित्रपट, ॲनिमेशन, गेम्स, पॉडकास्ट आणि संबंधित सेवा जागतिक स्तरावर दर्शवू शकतात. ज्यामुळे त्यांना गुंतवणूकदार, वितरक आणि खरेदीदारांपर्यंत थेट पोहोचता येणार आहे. मनोरंजन क्षेत्रातील खरेदीदारांना उच्च-गुणवत्तेची सामग्री घेता येणार आहे, अत्याधुनिक प्रकल्पाची माहिती मिळवण्याबरोबरच त्यांच्या गरजेनुसार व्यावसायिक सहयोगी शोधता येणार आहे. गुंतवणूकदारांना विविध आकर्षक प्रकल्प, सह-उत्पादन संधी आणि उद्योगातील माहिती मिळण्यास मदत होणार आहे.

वेव्हज् बाजारमध्ये योग्य प्रेक्षकांपर्यंत निवडक सामग्री पोहोचवण्यासाठी अत्याधुनिक कक्ष आणि मार्केट स्क्रिनिंगची सुविधा उपलब्ध केली आहे. या अत्याधुनिक कक्षाद्वारे खरेदीदारांना अधिग्रहण किंवा भागीदारीचा निर्णय घेण्यापूर्वी चित्रपट, ॲनिमेशन आणि गेमिंग आयपीचे अवलोकन करण्यासाठी एक सुरक्षित डिजिटल प्लेस मिळणार आहे. मार्केट स्क्रिनिंगमध्ये उच्च-क्षमता असलेल्या प्रकल्पांवर प्रकाश टाकण्यासाठी तयार केलेल्या विशेष प्रत्यक्ष आणि आभासी स्क्रिनिंगचा समावेश असेल जे गुंतवणूकदार आणि वितरकांना आकर्षित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रातील व्यवसाय नेटवर्किंगचे भविष्य पुन्हा परिभाषित करण्यासाठी वेव्हज् बाजार हे एक आधुनिक व्यासपीठ ठरणार आहे. अत्याधुनिक डिजिटल पर्यायांसह पारंपरिक उद्योग प्लॅटफॉर्मचे विलीनीकरण करून, जागतिक सहकार्य, समन्वयाला चालना देणार आहे. उद्योग उत्क्रांतीला चालना मिळण्याबरोबरच निर्माता, खरेदीदार, गुंतवणूकदार किंवा वितरक यांना वेव्हज बाजाराच्या माध्यमातून मनोरंजनाच्या स्पर्धात्मक जगात यशस्वी होण्यासाठी आवश्यक साधने आणि संधी उपलब्ध होणार आहे.

कंटेंट क्रिएटर असो किंवा सुयोग्य व्यासपीठाच्या शोधातील व्यावसायिक असो, गुंतवणूकदारांच्या शोधात असलेला विकासक किंवा जागतिक पातळीवरच्या प्रेक्षकांसमोर सादरीकरणाच्या प्रतीक्षेत असलेला कलाकार असो या प्रत्येकाला वेव्हज् बाजारमुळे एक संधी उपलब्ध होणार आहे. आपल्या व्यवसायाचे जाळे सहयोगातून वाढवण्यासाठी हे एक उत्तम व्यासपीठ आहे.

वेव्हज् बाजार संकल्पनेने जागतिक स्तरावरील माध्यम आणि मनोरंजन उद्योगात क्रांतीची मुहूर्तमेढ रोवली असून व्यावसायिक; तसेच निर्मात्यांना जोडण्यासाठी, सहयोग करण्यासाठी आणि सहकार्य वाढवण्यासाठी एक गतिमान डिजिटल बाजारपेठ उपलब्ध झाली आहे. चित्रपट आणि गेमिंगपासून संगीत आणि जाहिरातींपर्यंतच्या विविध क्षेत्रांमधील संधींसह ते अखंड नेटवर्किंग आणि व्यवहार सक्षमतेबरोबरच खरेदीदार आणि विक्रेते दोघांनाही सेवा देत आहे. वेव्हज् बाजार हा वेव्हज् शिखर परिषदेचा एक महत्त्वाचा भाग असून माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रासाठी समर्पित असलेले हे व्यासपीठ जागतिक मनोरंजन देवाणघेवाणीसाठी एक महत्त्वाचे केंद्र बनेल, हे निश्चित!

अधिक माहितीसाठी
www.wavesbazaar.com
या संकेतस्थळाला भेट द्या.

**(संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय)**

Mrgabharti 75000

**जागतिक ऑडिओ-व्हिज्युअल आणि मनोरंजन क्षेत्रातील महत्त्वपूर्ण पर्व ठरणारी 'वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल ॲण्ड एंटरटेनमेंट समिट (WAVES) २०२५' अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. १ ते ४ मे २०२५ दरम्यान मुंबई येथील जिओ कन्व्हेंशन सेंटर, बी.के.सी. येथे होणारी ही भव्य समिट, भारताला जागतिक पातळीवर 'कंटेंट सुपरपॉवर' म्हणून ओळख मिळवून देण्यासाठी एक सुवर्णसंधी ठरणार आहे.**

# भारताची नवी ओळख कंटेंट सुपरपॉवर!

**वर्षा फडके-आंधळे**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या धोरणात्मक दूरदृष्टीमुळे भारत क्रिएटिव्ह इकॉनॉमीमध्ये आघाडी घेत असून नेहमीप्रमाणे मुंबई ही देशाची माध्यम-मनोरंजनाची नगरी, क्रिएटिव्ह इकॉनॉमीचे नेतृत्व करायला सज्ज आहे. WAVES २०२५ ही केवळ एक शिखर परिषद नाही, तर भारताच्या सर्जनशील शक्तीला, जागतिक गुंतवणुकीला आणि धोरणात्मक बदलांना चालना देणारा तो परिवर्तनशील क्षण आहे. भारताने याचा उपयोग करून जागतिक कंटेंट क्षेत्रावर आपला ठसा उमटवावा, अशी सर्व क्षेत्रातील तज्ज्ञांची अपेक्षा आहे.

भारतामध्ये माध्यम आणि मनोरंजन (Media & Entertainment) उद्योग हा वेगाने प्रगत होत असलेला आणि रोजगारनिर्मितीच्या दृष्टीने महत्त्वाचा घटक आहे. ओटीटी, ॲनिमेशन, गेमिंग, व्हीएफएक्स, चित्रपट, संगीत आणि डिजिटल मीडिया क्षेत्रात भारताने गेल्या दशकापासून विक्रमी प्रगती करत आहे. FICCI-EY रिपोर्टनुसार, २०२४ मध्ये भारतीय M&E उद्योगाची किंमत २८ अब्जच्या पुढे गेली असून, २०२५ पर्यंत तो ३४ अब्ज गाठेल असा अंदाज आहे.

याच पार्श्वभूमीवर WAVES २०२५ ही परिषद केवळ चर्चासत्रांचे व्यासपीठ नसून,



Mrgabharti 75000

भारतातील सर्जनशील उद्योगक्षेत्राला जगभरातील गुंतवणूक, सहकार्य आणि नवकल्पनांशी जोडणारा सेतू ठरणार आहे.

## भारत सर्जनशील महासत्तेच्या वाटेवर

भारतात सध्या दरवर्षी २,००० पेक्षा अधिक चित्रपट तयार होत असून त्यामध्ये २० पेक्षा अधिक प्रादेशिक भाषांचा समावेश आहे. ओटीटी प्लॅटफॉर्मवर भारतीय कंटेंटची मागणी केवळ देशातच नव्हे, तर अमेरिका, युरोप, मिडल ईस्ट आणि दक्षिण आशियाई देशांमध्येही वाढत आहे. या मागणीचा फायदा घेत, भारताने 'कंटेंट एक्स्पोर्ट हब' होण्यासाठी पावले उचलणे ही काळाची गरज बनली आहे. WAVES २०२५ या दिशेने एक निर्णायक टप्पा ठरेल. ही परिषद केवळ संवादाचा नव्हे, तर कृतिशील धोरणनिर्मितीचा केंद्रबिंदू ठरेल, ज्यामुळे भारताची मिडिया अॅण्ड इंटरटेन्मेंटची भविष्यातील दिशा ठरवली जाईल.

## दरवर्षी 'वेव्हज्'चे आयोजन

वेव्हज् ही परिषद केंद्र आणि राज्य शासनाच्या सहकार्याने होत आहे. वेव्हज्ला कायमस्वरूपी एक सचिवालय स्वरूपात पुढे नेण्यात येणार आहे. ज्याप्रमाणे ऑस्कर, कान्स किंवा दाओस येथील वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम यासारख्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या वेव्हज् परिषदेचे आयोजनही दरवर्षी करण्यात येणार आहे. त्यासाठी एक समर्पित टीम वर्षभर काम करणार आहे.

## वेव्हज्मध्ये १०० पेक्षा जास्त देश

सध्या तंत्रज्ञानाच्या युगात सातत्याने नवीन बदल घडत आहेत. या नवीन बदलत्या तंत्रज्ञानाचे नेतृत्व महाराष्ट्राने करावे, यावर जोर देण्यात येत आहे. दृक्‌श्राव्य तसेच मनोरंजन क्षेत्रात क्रिएटिव्ह इकॉनॉमीला एक प्लॅटफॉर्म मिळणार आहे. मुंबई येथे होणाऱ्या या वेव्हज् परिषदेत १०० पेक्षा जास्त देश सहभागी होणार असून यापूर्वी झालेल्या जी-२० पेक्षा खूप मोठी परिषद असणार आहे.

## WAVES समिटची वैशिष्ट्ये

***'Create in India' वर भर :*** 'Make in India' पाठोपाठ आता 'Create in India' ही नवी संकल्पना WAVES समिटद्वारे आंतरराष्ट्रीय पातळीवर पुढे नेली जाईल.



***सर्जनशील प्रतिभेला व्यासपीठ :*** भारताच्या वैविध्यपूर्ण प्रादेशिक भाषांतील कंटेंट, अॅनिमेशन आणि गेमिंग क्षेत्रांमधील नवोदित निर्माते आणि कलाकारांना जागतिक प्लॅटफॉर्मवर आपली कला सादर करण्याची संधी प्राप्त होणार आहे.

***जागतिक सहयोग आणि भागीदारी :*** नेटफ्लिक्स, अॅमेझॉन, डिस्ने प्लस, सोनी पिक्चर्स यांसारख्या आंतरराष्ट्रीय कंपन्यांसोबत भागीदारीसाठी मार्ग मोकळे होतील.

***तंत्रज्ञान आणि नवोन्मेष यांचा संगम :*** एआय, व्हर्च्युअल प्रोडक्शन, आणि इंटरॅक्टिव्ह कंटेंटसारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानावर सखोल चर्चा.

***धोरणात्मक चर्चासत्रे :*** धोरणकर्ते, गुंतवणूकदार, कलाकार, तंत्रज्ञ आणि उद्योगपती यांच्यात थेट संवादाची संधी.

***क्रिएट इन इंडिया चॅलेंज :*** जगभरातील नवोदित निर्मात्यांच्या प्रतिभेचा आविष्कार साजरा करणारा एक अभूतपूर्व उपक्रम, अर्थात मुंबईत होणाऱ्या वेव्हज् २०२५ मध्ये आपल्या प्रतिभेची झलक दाखवण्यासाठी 'वेव्हज्' हे एक आघाडीचे व्यासपीठ म्हणून सज्ज आहे.

***वेव्हेक्स २०२५ :*** हा उपक्रम एक मैलाचा दगड ठरणार असून या माध्यमातून मीडिया-टेक स्टार्टअप्स त्यांच्या नवकल्पना आघाडीच्या उद्योजकांसमोर आणि सेलिब्रिटी एंजल गुंतवणूकदारांसमोर सादर करतील. ज्यामुळे भारताच्या माध्यम आणि मनोरंजन परिसंस्थेच्या भविष्याला नवीन दिशा मिळेल.

***वेव्हज बाजार :*** चित्रपट, गेमिंग, संगीत, जाहिरात आणि एक्सआर, निर्माते, गुंतवणूकदार आणि इतर व्यवसायांना जोडणारी एक अद्वितीय जागतिक बाजारपेठ. यातूनच उद्योग व्यावसायिकांना उत्पन्नाचे नवीन स्रोत उघडण्याच्या संधीदेखील उपलब्ध होतील.

***मास्टर क्लासेस आणि परस्पर संवाद सत्रे :*** उद्योगातील दिग्गज आणि जागतिक नेत्यांकडून शिकण्याची; तसेच माध्यम, मनोरंजन आणि विकसित होणाऱ्या तंत्रज्ञानाच्या भविष्याबद्दल अंतर्दृष्टी मिळवण्याची एक दुर्मिळ संधी या परिषदेच्या माध्यमातून मिळणार आहे.

(उपसंचालक (वृत्त), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय)

Mrgabharti 75000

**मनोरंजन व्यवसायात योगदान देणाऱ्या विविध घटकांना एका मंचावर आणून त्यांना परस्पर सहकार्याची आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या देवाण-घेवाणीची संधी उपलब्ध करून देणाऱ्या वेव्हज् शिखर परिषद आणि वेव्हज् बाजाराविषयी..**

# माध्यम-मनोरंजन क्षेत्राचा अनोखा 'लगान' क्षण!

**आमिर खान,** अभिनेता आणि निर्माता

भारत हा मनोरंजन आणि माध्यम उद्योग जगतातला एक आघाडीचा आणि तितकाच महत्त्वाचा देश. भारतात या उद्योगक्षेत्राची प्रगतीही तितक्याच झपाट्याने होत आहे आणि त्यासोबतच या परिसंस्थेच्या अवकाशात सातत्याने होत असलेल्या बदलांसह हे क्षेत्रही तितक्याच सातत्यपूर्णतेने बहरत चालले आहे. आज या क्षेत्राकडे नीट पाहिले, तर विविध व्यासपीठांवरच्या आशयनिर्मितीनेही मोठी उसळी घेतल्याचे दिसते. यामागचे कारण म्हणजे देशातील वाढत्या डिजिटल प्रसारण सेवा, प्रादेशिक भाषांमधील आशय सामग्री निर्मिती आणि सातत्याने नव्या, खिळवून ठेवणाऱ्या, सर्वसमावेशकतेची जाणीव करून देणाऱ्या आशयाची वाढती मागणी करत असलेला देशातला तंत्रज्ञानस्नेही प्रेक्षक वर्ग. त्यामुळेच तर आता भारतासाठी हे क्षेत्र केवळ मनोरंजनाचे साधन म्हणून मर्यादित राहिलेले नसून, हे भारतासाठी सांस्कृतिक अभिव्यक्ती, आर्थिक विकास आणि जागतिक पटलावर आपला प्रभाव पाडण्याचे एक सामर्थ्यशाली माध्यम झाले आहे. लवकरच मुंबईत जागतिक दृक्‌श्राव्य मनोरंजन शिखर परिषद (World Audio Visual & Entertainment Summit - WAVES) होणार आहे. येत्या १ ते ४ मे २०२५ दरम्यान महाराष्ट्रात, मुंबई येथे ही शिखर परिषद होणार आहे. महत्त्वाचे म्हणजे भारत सरकारनेच या परिषदेचे आयोजन केले आहे. ही परिषद जागतिक पटलावर भारताच्या वाढत्या महत्त्वाचे प्रतिबिंब असलेला एक मंच ठरणार आहे आणि वेव्हज् बाजार हा या शिखर परिषदेंतर्गतचाच एक अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. खरे तर गेल्या अनेक दशकांपासून मी या क्षेत्रातच जगतो, वावरतो आहे. या इतक्या प्रदीर्घ काळातील माझ्या स्वतःच्या अनुभवांवरून मी एक गोष्ट खात्रीने सांगू शकतो ती म्हणजे कथात्मक मांडणीत लोकांना एकत्र आणण्याची, त्यांना प्रेरित करण्याची आणि एकूणच परिवर्तन घडवून आणण्याची मोठी




ताकद असते. याच पार्श्वभूमीवर वेव्हज् आणि वेव्हज् बाजाराच्या माध्यमातून भारताने जागतिक मनोरंजन क्षेत्रासाठी एका व्यापक सहकार्यपूर्ण भागीदारीचे आणि सर्वसमावेशक भविष्य घडवण्याच्या दिशेने पाऊल टाकले आहे.

खरंतर वेव्हज् बाजार ही ऑनलाइन बाजारपेठेसाठी आखली गेलेली एक क्रांतिकारक संकल्पना आहे. ही ऑनलाइन बाजारपेठ म्हणजे जागतिक मनोरंजन परिसंस्थेंतर्गतचे व्यावसायिक तज्ज्ञ, उद्योग - व्यवसाय आणि कलाकारांना परस्परांसोबत जोडून देणारे माध्यम ठरणार आहे. या बाजारपेठेंतर्गत या क्षेत्रातील परस्पर सहकार्य सुलभ करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवले गेले आहे. याद्वारे या क्षेत्रातील व्यावसायिक तज्ज्ञांना नव्या संधी शोधण्याची आणि सहकार्यपूर्ण भागीदारी स्थापित करण्याची संधी मिळणार आहे. या बाजारपेठेला माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रातील एक अभिनव व्यवसाय केंद्र म्हणून स्थान मिळवून देण्याचाच सरकारचा प्रयत्न आहे. भारताचे माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी २७ जानेवारी २०२५ रोजी या अभिनव बाजारपेठेचे औपचारिक उद्घाटन केले होते. आर्थिक क्षेत्रात दावोस शिखर परिषदेचे स्थान आहे. तेच मनोरंजन क्षेत्रात वेव्हज् शिखर परिषदेला मिळवून देण्याचा दृष्टिकोन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मांडला होता. त्या दृष्टीने वेव्हज् बाजार महत्त्वाचे साधन ठरणार आहे.

वेव्हज् बाजाराच्या अधिकृत संकेतस्थळावर आतापर्यंत, माध्यम आणि मनोरंजन क्षेत्राशी संबंधित विविध क्षेत्रांमधील सुमारे पाच हजार ५०० खरेदीदार, दोन हजारांपेक्षा जास्त विक्रेते आणि जवळपास एक हजार प्रकल्पांसाठी नोंदणी केली गेली आहे. भविष्यात या संकेतस्थळाला माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रासाठीच्या आशय सामग्रीची एक सर्वसमावेशक बाजारपेठ आणि परस्पर संपर्काच्या केंद्राचे स्वरूप प्राप्त करून देणे हा सरकारचा मानस आहे. त्या दृष्टीनेच संकेतस्थळाला कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित प्रोफाइलिंग म्हणजेच त्या-त्या व्यक्तींची व्यावसायिक ओळख करून देण्याची; तसेच मागणीनुसार जुळवणी करून देण्याच्या तंत्रज्ञानाचीही जोड दिली गेली आहे. या माध्यमातून ऑनलाइन संकल्पना मांडण्याचे सत्र, ऑनलाइन बीटूबी बैठका (विविध व्यावसायिक प्रतिनिधींच्या बैठका), वेबिनार या आणि अशाच प्रकारच्या इतर महत्त्वाच्या सत्रांचेही आयोजन केले जाणार आहे.

ही बाजारपेठ म्हणजे माध्यम आणि मनोरंजन क्षेत्राच्या अवकाशातील चित्रपट, दूरचित्रवाणी, ॲनिमेशन, गेमिंग, जाहिरात,

Mrgabharti_75000

वर्धित वास्तव (एक्स्टेंडेड रिॲलिटी), संगीत, ध्वनी संयोजन, नभोवाणी या आणि अशा विविध क्षेत्रांमधील भागधारकांना एकत्र आणणारे एक महत्त्वाचे व्यासपीठ ठरणार आहे. हे व्यासपीठ विक्रेते आणि खरेदीदारांतील दुवा ठरेल आणि त्याद्वारे व्यावसायिकांना आपली कौशल्ये सुलभतेने सादर करण्याची, त्यांच्या संभाव्य ग्राहकांसोबत थेट संपर्क साधण्याची आणि उपयुक्त सहकार्यपूर्ण भागीदारीची संधी उपलब्ध करून देत राहील.

एखादा चित्रपट दिग्दर्शक आपल्या चित्रपटासाठी निर्मिती भागीदाराच्या शोधात असेल, एखादा जाहिरातदार योग्य व्यासपीठाच्या शोधात असेल, एखादा गेम डेव्हलपर गुंतवणूकदाराच्या शोधात असेल किंवा एखादा कलाकार आपल्या कलाकृतींना जागतिक स्तरावरील प्रेक्षकांसमोर सादर करू इच्छित असेल, तर अशा सर्वांसाठी वेव्हज् बाजारपेठेचा हा मंच म्हणजे परस्पर संपर्क, सहकार्य आणि व्यवसायवृद्धीचे बहुआयामी व्यासपीठ उपलब्ध करून देणारी मोठी जागा किंवा बाजारपेठ असणार आहे.

एका अर्थाने वेव्हज् बाजार ही एक प्रकारची समन्वित बीटूबी बैठकांची अभिनव बाजारपेठ आहे. जिने जागतिक मनोरंजन क्षेत्रातील परस्पर संपर्क व सहकार्यपूर्ण भागीदारी व्यवस्था आणि विकासाचा संपूर्ण चेहरामोहरा अगदी क्रांतिकारकरीत्या बदलला आहे. या बाजारपेठेने चित्रपट, दूरचित्रवाणी, संगीत, गेमिंग, ॲनिमेशन, जाहिरात; तसेच वर्धित वास्तव, आभासी वास्तव (व्हर्च्युअल रिॲलिटी) यांसारख्या जिवंत अनुभूती देणाऱ्या तंत्रज्ञानाशी संबंधित तज्ज्ञ व्यावसायिकांना एकत्र आणणारा मंच उपलब्ध करून दिला आहे आणि याद्वारे विविध सर्जनशील क्षेत्रांसाठीच्या आशय सामग्रीचे सूचीकरण, त्याचा शोध आणि संबंधित व्यवहारांसाठीचाही एक व्यापक मंच उपलब्ध झाला आहे. चित्रपट वितरणासाठी मंचाच्या शोधात असलेले निर्माते, नव्या संकल्पना मांडू पाहणारे गेम डेव्हलपर किंवा लायसन्सिंग संधींच्या शोधात असलेले साऊंड डिझायनर अशा सगळ्यांसाठी वर्गवारीनुसार सूचीकरण, सुरक्षितपणे सादरीकरणे पाहण्याची दालने आणि संपर्क व्यवस्था उपलब्ध करून देण्यासोबतच ही संपूर्ण प्रक्रिया सुलभ करणारी बाजारपेठ म्हणून वेव्हज् बाजार उदयाला येणार आहे.

या बाजारपेठेच्या माध्यमातून भौगोलिक मर्यादांच्या पलीकडे जात विक्रेते आणि खरेदीदारांना त्यांच्यासाठीचा योग्य भागीदार आणि संधी शोधण्याच्या दृष्टीने सक्षम करणाऱ्या सुविधांचा अंतर्भाव केला आहे. चित्रपट स्टुडिओ, ॲनिमेशन हाऊस, पॉडकास्ट निर्माते, मार्केटिंग यंत्रणा



यांसारख्या विक्रेत्यांना आपल्या सेवा आणि त्यांच्याकडील आशय सामग्री जागतिक गुंतवणूकदार, वितरक आणि भागीदारांसमोर सादर करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. दुसरीकडे खरेदीदारांसाठीदेखील उच्च गुणवत्तेचे, आधुनिक काळाशी सुसंगत प्रकल्प या बाजारपेठेमुळे उपलब्ध होऊ लागले आहेत. त्याच वेळी गुंतवणूकदारांनादेखील सहनिर्मितीच्या करारांची आणि व्यापक व्यावसायिक संधींची द्वारे खुली झाली आहेत. येथे आवर्जून उल्लेख करायला हवा, अशी गोष्ट म्हणजे या व्यासपीठाला या उद्योग क्षेत्राशी संबंधित विशिष्ट उपक्रम, सादरीकरणे पाहण्याची दालने, गुंतवणूकदारांबरोबरच्या बैठका, चर्चा आणि कलाकृतींच्या थेट प्रक्षेपण या सत्रांप्रमाणे लाइव्ह स्क्रीनिंगसारख्या उपक्रमांशी जोडले गेले आहे. यामुळे या व्यासपीठाच्या माध्यमातून केवळ आभासी संवादाच्या पलीकडे जात खऱ्या अर्थाने उपयुक्त असलेले करार आणि व्यवहार प्रत्यक्षात साकारले जातील याचीच सुनिश्चिती झाली आहे.

सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे येत्या १ ते ४ मे २०२५ दरम्यान मुंबईत वांद्रे-कुर्ला संकुलात वेव्हज् शिखर परिषद होणार असून त्यावेळी हा वेव्हज् बाजारही साकारला जाणार आहे. यानिमित्ताने उपलब्ध करून दिलेल्या डिजिटल बाजारपेठेवर नोंदणी केलेल्या काही निवडक प्रतिनिधींना या बाजारपेठेत आपल्या संकल्पना मांडण्याची, या उद्योग क्षेत्रातील विविध घटकांसोबत संपर्क प्रस्थापित करण्याची, आघाडीच्या भागधारकांसोबत प्रत्यक्ष करार आणि व्यवहार पूर्णत्वाला नेण्याची मोठी संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे. अभिनव दृष्टिकोनामुळे वेव्हज् बाजार केवळ एक व्यासपीठ म्हणून मर्यादित राहिलेला नाही, तर तो अधिक स्मार्ट, परस्परांशी अधिक जोडलेला आणि जागतिक पातळीवरील सर्वसमावेशक मनोरंजन क्षेत्राच्या दिशेने सुरू झालेली चळवळच ठरला आहे.

एक कलाकार म्हणून, आम्ही कायमच आव्हानात्मक, प्रेरणादायी आणि चौकटीपलीकडे जाऊन विचार करायला लावणाऱ्या अवकाशाच्या शोधात असतो. वेव्हज् हा अशाच प्रकारच्या अवकाश निर्मितीचा प्रयत्न आहे. दूरदृष्टीने सुरू केलेल्या या वाटचालीचा आपणही एक भाग असल्याचा मला खरोखरच अभिमान वाटतो. ही परिषद आपल्या परस्परांशी संपर्क, कलाकृती निर्मिती आणि मांडणीच्या पद्धतींमध्ये क्रांतिकारक बदल घडवून आणेल. हा बदल केवळ भारतापुरता मर्यादित नसेल, तर त्याचा प्रभाव अवघ्या जगात दिसेल. ही परिषद म्हणजे भारतासाठीचा 'लगान' क्षण आहे. जगभरातील माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रासाठी एकतेचा, धैर्याचा आणि एका अशा दृष्टिकोनाचा क्षण आहे, ज्याचा प्रतिध्वनी आपल्या सीमांच्याही पलीकडे ऐकू येत राहील.

**(सौजन्य : पीआयबी, मुंबई.)**

Mrgabharti 75000

**गेल्या अनेक वर्षांपासून आपल्या देशात अविश्वसनीय प्रतिभा असलेले सर्जनशील कलाकार आहेतच; पण आपल्याकडे एका गोष्टीची कमतरता मात्र होतीच, ती म्हणजे त्यांच्या कल्पकतेला मोठी व्यासपीठे मिळवून देणाऱ्या दुव्यांचा अभाव आणि आता याच परिस्थितीला बदलण्याच्या उद्देशाने वेव्हज् शिखर परिषद स्वतः हा दुवा बनवण्यासाठी पुढे आली आहे. महत्त्वाची बाब अशी की, माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रासाठी होत असलेली ही परिवर्तनकारी शिखर परिषद खुद्द प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीतून आकाराला आली आहे.**

# मनोरंजन क्षेत्राची उज्ज्वल भवितव्याकडे आगेकूच!

**अनिल कपूर,** अभिनेता

माझा नेहमीच असा विश्वास आहे की, भारत ही अमर्याद सर्जनशीलता, अविचल आवड आणि अतुलनीय कल्पकतेची भूमी आहे. खरेतर पूर्वीचा काळ आठवला तर त्यावेळी आपल्या माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रात फार काही गुंतवणूक येत नव्हती. इतकंच काय तेव्हा तर आतासारखे फॅन्सी स्टुडिओदेखील अस्तित्वात नव्हते; पण अशा काळातही आपल्याकडच्या लोकांनी कठोर परिश्रम आणि अभिनव कल्पकता दाखवत, ज्याला मी जुगाड म्हणतो, असे करत हे चित्रपटांचे विश्व उभे केले होते. या अशा परिस्थितीतच तर ‘मिस्टर इंडिया’सारखे जगावेगळे कल्पक सिनेमे प्रत्यक्षात बनले आहेत, हे आपण सगळ्यांनीच समजून घ्यायला हवे. माझा मित्र शेखर कपूर तुम्हाला तो चित्रपट प्रत्यक्षात येण्यासाठी अवलंबलेल्या छोट्या-छोट्या गोष्टी आणि अगदी चतुराईने दाखवलेल्या कल्पकतेबद्दलच्या फारच रंजक गोष्टी सांगू शकतो. महत्त्वाचे म्हणजे हे काही पैशांतून घडले नव्हते, तर या सगळ्या गोष्टी म्हणजे हृदयातल्या कल्पनांना बुद्धिमत्तेची मिळालेली अनोखी साथ होती.

पण आता काळ बदलला आहे आणि काळाप्रमाणेच प्रेक्षक आणि त्यांची अभिरुचीही बदलली आहे. आजच्या काळात मनोरंजनाचे जग केवळ चित्रपटगृहे किंवा दूरचित्रवाणीच्या पडद्यापुरते मर्यादित राहिलेले नाही, तर त्याही पलीकडे ते जिथे कृत्रिम बुद्धिमत्तेवर (एआय) आधारलेले अवतार असलेल्या उच्च दर्जाच्या दृक्श्राव्य परिणामांची अनुभूती घेता येते आणि जिथे आपले थेट अस्तित्वच नाही, तिथेही आपण प्रत्यक्षात अस्तित्वात आहोत, उपस्थित आहोत, अशी जिवंतपणाची अनुभूती येते, अशा एका आभासी विश्वापर्यंत विस्तारले आहे. आता अशा काळात जर आपल्या पुढच्या ‘मिस्टर इंडिया’ने केवळ देशालाच नव्हे, तर अवघ्या जगाला मंत्रमुग्ध करावे, त्याने जगभरात आपली छाप सोडावी अशी भारताची इच्छा असेल, तर त्यासाठी आपण आपल्या सर्जनशील कलाकारांना निव्वळ कल्पनांच्या पलीकडे जात अधिकच्या सुविधा प्रत्यक्ष उपलब्ध करून द्यायला हव्यात. आपण त्यांना चित्रपट निर्मितीसाठी आवश्यक अत्याधुनिक संसाधने, योग्य दिशा, तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि एक भक्कम व्यासपीठ उपलब्ध करून द्यायला हवे.

या सगळ्या गोष्टींच्या पार्श्वभूमीवर विचार केला तर केंद्र सरकार आयोजित जागतिक दृक्श्राव्य मनोरंजन शिखर परिषद (World Audio Visual Entertainment Summit - WAVES) अर्थात वेव्हज् शिखर परिषद किती महत्त्वाची आहे हे आपल्या लक्षात येऊ शकेल. वेव्हज् शिखर परिषद म्हणजे काही केवळ एखादा मनोरंजनपर कार्यक्रम नाही, तर संपूर्ण माध्यम आणि मनोरंजन क्षेत्राला अधिक सक्षम करण्यासाठी सुरू केलेली एक चळवळ आहे.

आजच्या काळात एखाद्या उत्कृष्ट चित्रपटाची, गेम्सची, आभासी अनुभवांची किंवा संगीताची निर्मिती करणे हे काही केवळ बॉलिवूडचे काम राहिलेले नाही, तर आता यासाठी एका सक्षम निर्मिती पश्चात अर्थात पोस्ट-प्रोडक्शन यंत्रणा, जागतिक दर्जाचे व्हीएफएक्स स्टुडिओ, सर्व व्यावसायिक व्यवहार सुरळीत होतील असे वातावरण, अत्याधुनिक ॲनिमेशन हाऊस आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे या सगळ्यांच्या जोडीला गुंतवणूकदार आणि



Mrgabharti 75000

मार्गदर्शकांच्या एका साहाय्यक परिसंस्थेची गरज आहे, हेदेखील आपल्याला समजून घ्यायला हवे. खरेतर गेल्या अनेक वर्षांपासून आपल्या देशात अविश्वसनीय प्रतिभा असलेले सर्जनशील कलाकार आहेतच; पण आपल्याकडे एका गोष्टीची कमतरता मात्र होतीच, ती म्हणजे त्यांच्या कल्पकतेला मोठी व्यासपीठे मिळवून देणाऱ्या दुव्यांचा अभाव आणि आता याच परिस्थितीला बदलण्याच्या उद्देशाने वेव्हज् शिखर परिषद स्वतः हा दुवा बनवण्यासाठी पुढे आली आहे. महत्त्वाची बाब अशी की, माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रासाठी होत असलेली ही परिवर्तनकारी शिखर परिषद खुद्द प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीतून आकाराला आली आहे. दुसरीकडे या क्षेत्रातील जवळपास सर्व प्रमुख उद्योग संघटनांनी (FICCI, IDGS, CII, ICA इत्यादी) या परिषदेमागे स्वतःचे भक्कम पाठबळ उभे केले आहे. इतकेच नाही तर चित्रपट आणि मनोरंजन जगतातील दिग्गजांचा समावेश असलेल्या एका सल्लागार मंडळाद्वारे या परिषदेची रचना आणि दिशा निश्चित केली जात आहे.तुम्हाला हे सांगायला मला अभिमान वाटतो की, मीदेखील त्यांच्यापैकीच एक सदस्य आहे!

वेव्हज् २०२५ शिखर परिषदेंतर्गतच्या सर्वाधिक अभिनव उपक्रमांपैकी एक महत्त्वाचा उपक्रम म्हणजे स्टार्टअप परिसंस्थेला गती देणारा (startup accelerator) वेव्हएक्स (WAVEX) हा उपक्रम. मनोरंजन आणि माध्यम जगतातील सर्वात धाडसी कल्पनांना प्रोत्साहन आणि पाठबळ मिळवून देण्याच्या उद्देशाने या उपक्रमाची आखणी केली आहे. त्या दृष्टीनेच वेव्हएक्स उपक्रमांतर्गत सर्जनशीलता, नवोन्मेष आणि गुंतवणुकीची अशी काही गुंफण बांधली गेली आहे की, त्यांना एकाच बहुआयामी व्यासपीठावर एकत्रित आणता येईल. या उपक्रमाच्या माध्यमातून युवा सर्जनशील कलाकारांना, तंत्रज्ञानविषयक उद्योजकांना आणि आपल्या कल्पनांना मूर्तरूप देण्याचे स्वप्न पाहत असलेल्यांना, आपल्या प्रकल्पांसाठी आघाडीच्या गुंतवणूकदारांकडून अर्थसाहाय्य मिळवण्याची संधी उपलब्ध होणार आहे. इतकेच नव्हे तर त्यांना या क्षेत्राशी संबंधित उद्योग जगतातील दिग्गजांचे मार्गदर्शन आणि त्यांच्यासोबत संपर्क स्थापित करण्याचीही मोठी संधी उपलब्ध होणार आहे.



वेव्हज् शिखर परिषद १ ते ४ मे दरम्यान मुंबईतील जिओ वर्ल्ड कन्व्हेंशन सेंटरमध्ये आयोजित केली जाणार आहे. या अंतर्गतच्या नियोजित उपक्रमांनुसार २ आणि ३ मे रोजी, स्टार्टअप्सला (startups) केंद्रस्थानी ठेवून आयोजित केलेले उपक्रम होणार आहेत. या उपक्रमांच्या माध्यमातून हे स्टार्टअप्स त्यांच्याकडील नवीन कल्पना या उद्योग क्षेत्रातील काही आघाडीच्या बुद्धिमान व्यक्तिमत्त्वांसमोर आणि गुंतवणूकदारांसमोर सादर करतील. या स्टार्टअप्समधून निवडलेल्या सर्वोत्कृष्ट स्टार्टअप्सना प्रतिष्ठित सोनी शार्क टँक इंडियामध्ये थेट सहभागी होण्याची मोठी संधीदेखील मिळणार आहे. 'आता माझ्या भाषेत व्यक्त व्हायचं, तर याला *डबल झक्कास असंच म्हणावं लागेल,* नाही का?'

माझा वैयक्तिक अनुभव मांडायचा झाला, तर या व्यासपीठाच्या माध्यमातून आपल्या समोर येत असलेल्या संकल्पना कमालीच्या रोमांचक आहेत! यापैकी आभासी वास्तव तंत्रज्ञानाच्या आधारे उभ्या केलेल्या काल्पनिक जगात (Virtual reality simulations) तर तुम्ही थेट एका डिजिटल युद्धभूमीवर जाऊ शकता आणि रंजक गोष्ट अशी की, तिथे तुम्ही मोगॅम्बोची क्षेपणास्त्रेही रोखू शकता. इतकेच नाही, तर लुकलुकणारे दिवे आणि रंगीत बटणे असलेली मंतरलेली वाटावीत अशी शैक्षणिक उपकरणे, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित अवतार जी माझ्या शैलीतही बोलू शकतात बरं का (होय, तशी कल्पना करून तर बघा), ड्रोनद्वारे चित्रित केलेले आभासी पर्यटनाचे अनुभव, प्रचंड ऊर्जेने भारलेल्या संगीत स्पर्धा, सत्यता पडताळणीची साधने, पायरसीला प्रतिबंध करू शकणारी साधने आणि अशा असंख्य कल्पक गोष्टी यानिमित्ताने आपल्यासमोर येणार आहेत. हे सर्व आणि बरेच काही वेव्हज् आणि वेव्हएक्स अंतर्गत प्रदर्शित केले जात आहे. ज्यामुळे भारताच्या मनोरंजन उद्योगात सर्जनशीलता आणि गुंतवणुकीसाठी नवीन सीमा उघडत आहेत.

या स्टार्टअप्सना शंतनू नारायण, सत्या नाडेला, अदार पूनावाला, किरण मजुमदार-शॉ सारख्या जागतिक नेत्यांशी आणि ओपनएआय, यु-ट्यूब, मायक्रोसॉफ्ट आणि गुगलमधील तज्ज्ञांशी थेट संवाद साधण्याची संधी मिळणे हे मला आणखी उत्साहित करते. अशा सर्वोत्तम व्यक्तिमत्त्वांकडून शिकल्यानेच सर्वोत्तम व्यक्ती घडतात.

वेव्हज् शिखर परिषद आणि वेव्हएक्ससारख्या उपक्रमांमुळे भारतातील निर्माते केवळ जगाचे मनोरंजनच करणार नाहीत, तर ते मनोरंजनाची व्याख्याच बदलून टाकतील, याबाबत माझ्या मनात तिळमात्रही शंका नाही. सर्व तेजस्वी मनांना आणि सर्जनशील व्यक्तींना मला सांगायचे आहे :

जर तुमचे स्वप्न असेल, तर हेच तुमचे व्यासपीठ आहे.

त्वरेने २१ मे पूर्वी wavex.wavesbazaar.com वर तुमच्या स्टार्टअपची नोंदणी करा.

भविष्य तुमची वाट पाहत आहे.

वन टू का फोर...

(सौजन्य : पीआयबी, मुंबई.)

Mrgabharti 75000

**'मेक द वर्ल्ड वेअर खादी' या आव्हानात्मक स्पर्धेला मिळालेला प्रतिसादही मोठा आहे. या स्पर्धेसाठी भारतासह जगभरातून सुमारे ७५० पेक्षा जास्त स्पर्धकांनी नोंदणी केली आहे. आता या स्पर्धेच्या माध्यमातून जागतिक पातळीवर भारतातील नवोन्मेषाच्या भावनांना अधोरेखित करणाऱ्या एका सर्जनशील स्पर्धेसाठी हा मंच सज्ज झाला आहे.**

# खादी : एक शाश्वत फॅशन!

**धनलक्ष्मी पी.**

कल्पना करा की तुम्ही असे कापड परिधान केले आहे जे केवळ स्टायलिशच नाही, तर स्वातंत्र्य, शाश्वतता आणि जागतिक प्रभावाची कहाणीदेखील सांगते. ते म्हणजे खादी, भारताचे प्रतिष्ठित कापड! आपण आता खादीबद्दल का बोलत आहोत? कडक उन्हाळा असल्यामुळे आणि या ऋतूत खादीशिवाय दुसरे कोणते कापड त्वचेला आणि आरोग्याला दिलासा देऊ शकते का? अर्थात, तेच आहे.

पण हा संवाद तुमच्यापर्यंत आणण्याचे आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे तुम्ही खादी परिधानासाठी जगाला सज्ज करण्याच्या, अर्थात *'मेक द वर्ल्ड वेअर खादी'* या आव्हानाबद्दल ऐकले असेल अशी आशा आहे. हे आहे १ ते ४ मे २०२५ दरम्यान मुंबईत होणाऱ्या पहिल्या वर्ल्ड ऑडिओ, व्हिज्युअल अँण्ड एंटरटेनमेंट समिट (वेव्हज्) चा भाग म्हणून आयोजित करण्यात येणाऱ्या ३२ क्रिएट इन इंडिया म्हणजेच भारतात निर्माण होऊ द्या, या चॅलेंजेसपैकी एक.

ही निव्वळ आणखी एक मोहीम नाही. हे आव्हान केवळ कृतीचे आवाहन करण्यापेक्षा अधिक काहीतरी आहे. हा एक उपक्रम आहे जिथे जगभरातील सर्जनशील विचार त्यांच्या डिजिटल कला, सोशल मीडिया कथाकथन किंवा जाहिरात संकल्पनांद्वारे खादीला पारंपरिक कापडातून जागतिक फॅशन आयकॉनमध्ये रूपांतरित करण्यासाठी स्पर्धा करतात. हा उपक्रम जगभरातील निर्मात्यांना एखाद्या पौराणिक गोष्टीवर त्यांचा सर्जनशील ठसा उमटवण्यास मदत करतो. क्रिएट इन इंडिया चॅलेंज आणि विशेषतः 'मेक द वर्ल्ड वेअर खादी' विभाग हे सर्जनशील व्यावसायिकांना, जग खादीकडे कसे पाहते? याला पुन्हा आकार देण्याची एक अविश्वसनीय संधी देत आहेत. सहभागी व्यक्ती भारताच्या सांस्कृतिक वारशाचे अत्याधुनिक सर्जनशीलतेशी मिश्रण करून खादीला आधुनिक मूल्यांनी प्रतिबिंबित करणारी जागतिक फॅशन शक्ती म्हणून स्थापित करण्यास मदत करू शकतात.

*'मेक द वर्ल्ड वेअर खादी'* या आव्हानात्मक स्पर्धेला मिळालेला प्रतिसादही मोठा आहे. या स्पर्धेसाठी भारतासह जगभरातून सुमारे ७५० पेक्षा जास्त स्पर्धकांनी नोंदणी केली आहे. आता या स्पर्धेच्या माध्यमातून जागतिक पातळीवर भारतातील नवोन्मेषाच्या भावनांना अधोरेखित करणाऱ्या एका सर्जनशील स्पर्धेसाठी हा मंच सज्ज झाला आहे. या स्पर्धेंतर्गत सहभागींना एक मुद्रित कलाकृती, एक मोकळ्या परिसरात लावल्या जाणाऱ्या फलकाची अर्थात आउटडोअर होर्डिंगची आणि एक डिजिटल/समाज माध्यमांसाठी कलाकृती तयार करण्याचे आव्हान दिले गेले होते. या स्पर्धेकरिता २७ जानेवारीला नोंदणी प्रक्रियेची सुरुवात झाली होती आणि त्यानंतर नियोजित टप्प्यांतर्गत मार्चमध्ये निवड प्रक्रिया पार पडली. यानंतरच निवड झालेल्या उमेदवारांची अंतिम यादी जाहीर करण्यात आली आहे. या निवडप्रक्रियेसाठी नियुक्त केलेल्या परीक्षक मंडळात जाहिरात आणि सर्जनशील उद्योगक्षेत्रातील दिग्गज व्यक्तिमत्त्वांचा समावेश होता. या परीक्षक मंडळाने दाखल झालेल्या कलाकृतींची अस्सलता, त्यातून प्रतित होणारे सांस्कृतिक महत्त्व, जगाचे लक्ष वेधून घेण्याचे त्यांचे वैशिष्ट्य आणि स्पर्धेच्या दृष्टिकोनानुसारची त्या कलाकृतींची सुसंगता या निकषांच्या आधारे मूल्यमापन केले आहे. या निवडलेल्या कलाकृतींचे वेगळेपण हे त्यांच्या धोरणात्मक दृष्टिकोनात, प्रभावी कथात्मक मांडणीत आहे. इतकेच नाही तर खादीविषयी जागतिक स्तरावर चर्चेला सुरुवात करण्याची क्षमताही या कलाकृतींमध्ये आहे.

अशा या कठोर प्रक्रियेनंतरच या स्पर्धेसाठी दाखल झालेल्या कलाकृतींमधून इमान सेनगुप्ता आणि सोहम घोष यांची हवस वर्ल्डवाइड इंडिया (Havas Worldwide India), कार्तिक शंकर आणि मधुमिता बसु यांची - २२ फुटी आदिवासी (22 feet Tribal), काजल






Mrigabharti 75000

तिरलोटकरची - इंटरॲक्टिव्ह व्हेन्यूज (Interactive venues), तन्मय राऊल आणि मंदार महाडिक यांची डीडीबी मुद्रा ग्रुप (DDB Mudra Group); तसेच आकाश मेजारी आणि काजल जेसवानी या जोडीच्या - डीडीबी मुद्रा ग्रुप (DDB Mudra Group) या कलाकृतींची निवड झाली आहे. आता यामधल्या अंतिम विजेत्यांची घोषणा मे २०२५ मध्ये होणाऱ्या वेव्हज शिखर परिषदेत केली जाणार आहे.

## शाश्वत फॅशनचा आल्हाददायक घटक

खादी ही जुनी पद्धत नाही; ती शाश्वत फॅशनचे भविष्य आहे. हाताने विणलेली, पर्यावरणपूरक आणि प्रेमाने बनवलेली खादी ही जनरेशन झेड आणि मिलेनियल्सना ज्या गोष्टींची काळजी वाटते. त्याची आणि प्रामाणिकता, शाश्वतता आणि नैतिक निवड यांचे प्रतिनिधित्व करते. शिवाय, ती कारागिरांच्या हातून बनली असल्याने स्थानिक समुदायांना सक्षम बनवून पर्यावरण रक्षणाचे काम करते.

तथापि खादी ही केवळ फॅशन ट्रेंडपेक्षा जास्त काहीतरी आहे, ती एक चळवळ आहे - भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात रुजलेली. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालील स्वातंत्र्य चळवळीदरम्यान खादी स्वावलंबन आणि सक्षमीकरणाचे प्रतीक बनली. आज हे एक असे शाश्वत, हस्तनिर्मित आणि पर्यावरणपूरक कापड आहे जे विशेषतः ग्रामीण भारतातील कारागिरांना सक्षम बनवत आहे. त्याचवेळी जलद फॅशनमध्ये वापरलेले अविघटनशील कापड पर्यावरणीय जोखमीत भर घालत आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी वर्षानुवर्षे शून्य दोष, शून्य परिणाम असलेल्या सामग्रीचे उत्पादन करण्याचे स्पष्ट आवाहन केले आहे. त्या आवाहनानुसार, खादी ही पर्यावरणपूरक प्रक्रिया आणि शाश्वत उत्पादनाशी पूर्णपणे सुसंगत आहे. पारंपरिकतेच्या दिशेने परिवर्तन करणाऱ्या जागतिक फॅशनमध्ये मजबूत भूमिका बजावण्यास सज्ज आहे. खादी उत्पादने आंतरराष्ट्रीय मानकांची पूर्तता करतात. यामध्ये सरकारच्या 'मेक इन इंडिया' उपक्रमाचीदेखील महत्त्वपूर्ण भूमिका आहे.

असे म्हटले जाते की, आपल्याला पृथ्वी आपल्या पूर्वजांकडून वारशाने मिळालेली नाही, तर आपण ती आपल्या मुलांकडून उधार घेतलेली आहे. ही भावना खादीच्या नीतिमत्तेशी पूर्णपणे सुसंगत आहे. हे एक शाश्वत, पर्यावरण-जागरूक वस्त्रप्रावरण आहे, जे आपल्याला आपल्या भूतकाळाशी जोडते आणि भविष्यातील पिढ्यांसाठी आपल्या ग्रहाचे रक्षण करते.

जग शाश्वत, पर्यावरण-जागरूक पद्धती स्वीकारत असताना, जागतिक व्यासपीठावरील खादीचे स्थान पूर्वीपेक्षा अधिक स्पष्ट होत आहे. हे वस्त्र केवळ भूतकाळाचे अवशेष नाही, तर भविष्यासाठी एक दिवा आहे. ग्रामीण कारागिरांच्या हस्त कलात्मकतेपासून ते त्याच्या कालातीत वस्त्राच्या जागतिक आकर्षणापर्यंत, खादी आजच्या जगात स्टायलिश आणि शाश्वत असण्याचा अर्थ काय होतो, हे पुन्हा परिभाषित करण्यास सज्ज आहे.

## 'खादी'ची समृद्ध परंपरा

खादी पुनरुत्थानाच्या केंद्रस्थानी खादी आणि ग्रामोद्योग आयोगाची (केव्हीआयसी) वचनबद्धता आहे. खादीच्या प्रसारासाठी नोडल एजन्सी म्हणून केव्हीआयसीद्वारे स्थानिक कारागिरांना कौशल्य प्रशिक्षण, आर्थिक साहाय्य आणि बाजारपेठेतील प्रवेश सुलभ करून त्यांच्या सक्षमीकरणाला पाठिंबा दिला जातो. सरकार-समर्थित उपक्रम आणि कार्यक्रमांद्वारे, केव्हीआयसीने सुनिश्चित केले आहे की, खादी केवळ तिची समृद्ध परंपरा टिकवून ठेवत नाही, तर आजच्या जागतिक फॅशन बाजाराच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी विकसित होत आहे.

वेव्हज् शिखर परिषद हा केवळ आणखी एक कार्यक्रम नाही; ते जणू जागतिक सर्जनशील क्षेत्र आहे. प्रसारण, गेमिंग, डिजिटल मीडिया आणि इतर क्षेत्रातील उद्योगांच्या नेत्यांसह कार्यशाळा, स्पर्धा आणि नेटवर्किंग संधींसह मीडिया आणि मनोरंजन जगताचे केंद्र म्हणून याचा विचार केला पाहिजे. 'मेक द वर्ल्ड वेअर खादी' म्हणजेच खादी परिधान करण्यासाठी जगाला सज्ज करा, हे आव्हान जगभरातील ताज्या, धाडसी कल्पना समोर आणण्यासाठी डिझाइन केले आहे. जे सर्जनशीलतेला प्रेरणा देते, जे जगाला खादी वापरण्यासाठी तयार करू शकते.

वेव्हज् २०२५ दरम्यान घोषित झालेले हे आव्हान खादीला आधुनिक, महत्त्वाकांक्षी आणि शाश्वत ब्रँड म्हणून स्थान देते. तसेच नवीन व सर्जनशील मार्ग उलगडण्याचे आश्वासन देऊन आगामी गोष्टींसाठी उत्साह निर्माण करते.

**(लेखिका पीआयबी, मुंबई येथे मीडिया आणि कम्युनिकेशन ऑफिसर आहेत.)**


Mrgabharti 75000

**आजचे डिजिटल जग हे हॅशटॅग, जीआयएफ आणि रिल्सच्या माध्यमातून संवाद साधणारे असून संवादाची व्याप्ती विविध माध्यमांपर्यंत पोहोचलेली आहे. आज भारताच्या बहुतांश भागांतील लोक इंटरनेटशिवाय आणि त्याच्या माध्यमातून मिळणाऱ्या जलद संवादाशिवाय जगाची कल्पनाही करू शकत नाहीत; पण हे लक्षात घेणे गरजेचे आहे की, केवळ एकतर्फी संवादच प्रभावी असतो, हा समज ठेवणे चुकीचे ठरेल. विशिष्ट लक्ष्यित लोकसमूह आणि त्यांच्या सांस्कृतिक संदर्भांचा अभ्यास केल्यास असे दिसते की, वेगवेगळ्या व्यक्ती आणि समुदायांनी त्यांच्या परिस्थितीनुसार त्यांना उपयुक्त ठरणारी, त्यांच्यासाठी सुरू केलेली आणि अवलंबलेली विविध संवाद माध्यमे वापरली आहेत.**

# कम्युनिटी रेडिओतून जनप्रबोधनाच्या लहरी!

**डॉ. बृजेंद्रसिंह पनवर**

सामुदायिक नभोवाणी अर्थात कम्युनिटी रेडिओ (Community Radio) हे असेच एक सर्जनशील माध्यम आहे, जे आज देशाच्या विविध भागांमधील शिक्षण संस्थांमध्ये; तसेच ग्रामीण भागांमध्येही प्रभावीपणे कार्यरत आहे. खरे तर रेडिओ संच हे तसे सहजपणे आणि स्वस्तातही उपलब्ध होणारे आणि सहजपणे हाताळता येणारे साधन असल्याने त्याचा वापरही सहजरीत्या करू शकतात. कम्युनिटी रेडिओ या संवाद माध्यमाच्या गाभ्याशी असलेली महत्त्वाची मूल्ये म्हणजे याची सामुदायिक नेतृत्वाच्या स्वरूपातील मालकी आणि या माध्यमातून साधल्या जाणाऱ्या संवादाला असलेला अस्सल तळागाळाच्या भावनांचा - अभिव्यक्तीचा स्पर्श. खरेतर हे एक अशा प्रकारचे व्यासपीठ आहे, जिथे त्या-त्या समुदायाला त्यांच्या स्वतःच्या भाषेत, स्वतःला व्यक्त करण्याची आणि त्यांच्या अस्तित्वाशी संबंधित प्रश्नांवर चर्चा करण्याची संधी मिळते. म्हणूनच अशी संवादमाध्यमे ही खऱ्या अर्थाने सहकार्यपूर्ण भागीदारी तर निर्माण करतात; पण त्या सोबतच ती, वापरकर्त्यांमधील संवाद आणि व्यवस्थापन कौशल्येही विकसित करून सामाजिक बदलांना चालना देणारीही ठरतात. त्यामुळेच तर सरकारने या माध्यमाच्या प्रभावी वापरातून स्थानिक पातळीवरच्या संवाद साधण्याच्या प्रयत्नांची संवेदनशीलतेने दखल घेऊन प्रोत्साहन देण्याची भूमिका घेतली आहे. त्यामुळे हे माध्यम एक सशक्त समाज घडवण्याच्या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावत आहे.




मुंबईत १ ते ४ मे २०२५ दरम्यान जागतिक दृक्श्राव्य मनोरंज शिखर परिषद (World Audio Visual and Entertainment Summit - WAVES) अर्थात वेव्हज् शिखर परिषद होणार आहे. या शिखर परिषदेच्या निमित्ताने मुंबईत ही कम्युनिटी रेडिओशी संबंधित एकदिवसीय परिषदेचे ३ मे रोजी आयोजन केले आहे. त्याद्वारे या परिषदेत कम्युनिटी रेडिओ खऱ्या अर्थाने रेडिओ लहरी अर्थात Radio Waves निर्माण करण्यासाठी सज्ज झाला आहे. भारताच्या माध्यम आणि मनोरंजन क्षेत्राला जागतिक बाजारपेठेशी जोडणे आणि या माध्यमातून विकास, परस्पर सहकार्यपूर्ण भागीदारी आणि नवोन्मेषाला चालना देण्याच्या उद्देशानेच वेव्हज् परिषदेचे आयोजन केले गेले आहे. यासोबतच वेव्हज् परिषदेमध्ये एका अर्थाने माध्यम आणि मनोरंजन उद्योग क्षेत्रात युवा प्रतिभेचे सक्षमीकरण करून सांस्कृतिक देवाण-घेवाणीला चालना मिळणार आहे. या परिषदेच्या निमित्ताने भारतातील सामुदायिक रेडिओंचे नोंदणीकृत आणि निवडप्रक्रियेतून स्थापन झालेल्या भारतीय कम्युनिटी रेडिओ संघटनेने (Community Radio Association of India - CRAI) भारत सरकारच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या सहकार्याने विविधांगी उपक्रमांचे आयोजन केले आहे. कम्युनिटी

Mrgabharti_75000

रेडिओ केंद्रांविषयी जागरूकता वाढवणे; तसेच या माध्यमाच्या विस्ताराला प्रोत्साहन देणे हाच या सर्व उपक्रमांमागचा उद्देश आहे.

वेव्हज् शिखर परिषदेंतर्गत राबवला जात असलेला सर्वात महत्त्वाचा उपक्रम म्हणजे क्रिएट इन इंडिया चॅलेंजेस (Create in India Challenges) हा विविध आव्हानात्मक स्पर्धांचा उपक्रम. या अंतर्गतच आयोजित केलेल्या ३२ आव्हानात्मक स्पर्धांपैकी एक महत्त्वाची स्पर्धा म्हणजे कम्युनिटी रेडिओ आशय निर्मिती स्पर्धा (Community Radio Content Challenge). क्रिएट इन इंडिया चॅलेंजेस या उपक्रमांतर्गत घेतल्या जात असलेल्या स्पर्धा या खऱ्या अर्थाने युवा वर्गाला त्यांच्या कौशल्ये कसोटीवर उतरवून ती चाचपडून पाहता येतील, या दृष्टीने तसेच त्यांना त्यांची प्रतिभा एका प्रतिष्ठित व्यासपीठावर सादर करण्यासाठी प्रेरणा देणाऱ्या असतील. अगदी अशा रितीनेच या सर्व ३२ स्पर्धांची आखणी केली गेली आहे. या अंतर्गत युवा वर्गाला ॲनिमेशन, गेमिंग, ई-स्पोर्ट्स, कॉमिक्स, चित्रपट निर्मिती या आणि अशा इतर अनेक क्षेत्रांशी संबंधित व्यासपीठांवर आपली प्रतिभा सादर करण्याची संधी मिळणार आहे. कम्युनिटी रेडिओ आशय निर्मिती ही स्पर्धादेखील, कम्युनिटी रेडिओ केंद्रांच्या विश्वातील विविध कौशल्यधारी आणि आगळ्या-वेगळ्या अभिव्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख करून देणे आणि त्यांना नवे स्वरूप, शैली; तसेच कथात्मक मांडणीतील प्रयोगशीलतेसाठी प्रोत्साहित करण्याच्या उद्देशानेच आयोजित केली आहे. या स्पर्धेमुळे कम्युनिटी रेडिओ केंद्रांना ज्ञानाची देवाणघेवाण करता येईल, परस्परांकडून शिकता येईल आणि परस्परांसोबत नाते जोडता येईल. या स्पर्धेंतर्गत समाजात खऱ्या अर्थाने काही सकारात्मक बदल घडवून आणणाऱ्या कार्यक्रमांची दखल तर घेतली जाईल; तसेच त्यांना गौरविण्यातही येईल. या आव्हानात्मक स्पर्धेसाठी ५ श्रेणींतर्गत स्पर्धकांचे अर्ज मागवले गेले होते. यात सार्वजनिक आरोग्य आणि सुरक्षितता, शिक्षण आणि साक्षरता, महिला आणि बालविकास, सामाजिक न्याय आणि ॲडव्होकसी, कृषी आणि ग्राम विकास; तसेच सांस्कृतिक संवर्धन अशा विषयाधारित श्रेणींचा अंतर्भाव आहे. भारतीय कम्युनिटी रेडिओ संघटनेचे (CRAI) प्रतिनिधी; तसेच माध्यम विश्वातील दिग्गज तज्ज्ञ व्यक्तिमत्त्वांचा समावेश असलेले परीक्षक मंडळ सर्व स्पर्धकांचे परीक्षण करतील. त्यातून अंतिम स्पर्धकांची निवड केली जाईल आणि अखेरच्या टप्प्यावर विजेत्यांची निवड करून त्यांना पुरस्काराने गौरवले जाणार आहे.



आणखी एक महत्त्वाची गोष्ट अशी की, रेडिओ कम्युनिटीशी संबंधित या स्पर्धांव्यतिरिक्त, वेव्हज् परिषदेतील क्रिएटोस्पेअर (CreatoSphere) या उपक्रमांतर्गत भारतीय कम्युनिटी रेडिओ संघटनेच्या वतीने एक विशेष कम्युनिटी कनेक्ट झोन (Community Connect Zone) अर्थात सामुदायिक संपर्क क्षेत्रही तयार केले जाणार आहे. कम्युनिटी रेडिओ केंद्रांच्या मूळ तत्त्वांचे आणि या व्यवस्थेने विविध समुदायांसाठी दिलेले महत्त्वाचे योगदान जगासमोर मांडण्याच्या उद्देशानेच या विशेष क्षेत्राची आखणी केली जाणार आहे. या क्षेत्रांतर्गत प्रामुख्याने कम्युनिटी रेडिओ केंद्र उपक्रमांचे संक्षिप्त विवरण असलेले फ्लिप बुक (Community Radio Stations Compendium Display Flip Book), कम्युनिटी रेडिओ इंडिया मॅप अथवा रेडिओ गार्डन अर्थात नभोवाणी उद्यान, थेट प्रसारणाची सोय असलेली एक नभोवाणी प्रसारण व्यवस्था अर्थात रेडिओ सेटअप आणि एक न्यूजलेटर अर्थात नियतकालिक यांचा अंतर्भाव असणार आहे.

कम्युनिटी रेडिओ केंद्र उपक्रमांचे संक्षिप्त विवरण असलेले फ्लिप बुक म्हणजे एक प्रकारचा अत्यंत आकर्षक आणि संवादात्मक स्वरूपातील डिजिटल

Mrgabharti_75000

दस्तऐवज असणार आहे. या फ्लिप बुकमध्ये देशभरातील कम्युनिटी रेडिओ केंद्रांद्वारे राबवल्या जात असलेल्या उपक्रमांविषयीची संग्रहित माहिती असणार आहे. भेट देणाऱ्या प्रत्येकाला या फ्लिप बुकच्या डिजिटल संग्रहातील माहितीच्या माध्यमातून कम्युनिटी रेडिओच्या आजवरच्या संपूर्ण प्रगतीमय वाटचालीबद्दल; तसेच या माध्यमाने स्थानिक आणि प्रादेशिक पातळीवर जनमानसाच्या विचारांना आकार देण्यात बजावलेल्या महत्त्वाच्या भूमिकांविषयीच्या यशोगाथा जाणून घेता येणार आहेत.

याच संकल्पनेंतर्गत नभोवाणी उद्यानांतर्गत एक मोठा संवादात्मक स्वरूपाचा भारताचा नकाशादेखील मांडला जाणार आहेत. या नकाशाचे वाचन करून भेट देणाऱ्या प्रत्येकाला देशभरात सध्या प्रत्यक्ष कार्यरत असलेल्या कम्युनिटी रेडिओ केंद्रांच्या ठिकाणांविषयी समजून घेता येईल. इतकेच नाही तर भेट देणारी प्रत्येक व्यक्ती विविध भागांतील कम्युनिटी रेडिओ केंद्रांचे थेट प्रसारण ऐकण्याची सोयदेखील येथे उपलब्ध करून दिली जाणार आहे. त्यामुळे अभ्यागतांना विविध मते - विचार आणि या केंद्रांच्या माध्यमातून हाताळले जाणारे वैविध्यपूर्ण विषय समजून घेता येणार आहेत.

या संकल्पनेंतर्गत एक महत्त्वाचा घटक असलेल्या न्यूजलेटर अर्थात नियतकालिकात 'कम्युनिटी रेडिओ कंटेंट चॅलेंज' या स्पर्धेंतर्गत अलीकडील ताज्या घडामोडी, राबवले गेलेले विविध उपक्रम, क्रिया प्रक्रिया याविषयीची माहिती मांडलेली असेल. या नियतकालिकात कम्युनिटी रेडिओ केंद्रांना त्यांच्या सर्जनशील वाटचालीत अनुभवास आलेल्या समस्या आणि त्यावर त्यांनी कशा रितीने मात केली, याचे अंतरंग उलगडून सांगणारी रंजक माहितीही यातून मांडली जाणार आहे. या नियतकालिकामुळे अभ्यागतांना नभोवाणी प्रसारण क्षेत्रातील नवे प्रवाह; तसेच समुदायांच्या नेतृत्वांतर्गत प्रसारित केलेल्या नावीन्यपूर्ण कार्यक्रमांविषयी अद्ययावत माहिती जाणून घेता येणार आहे.

कम्युनिटी रेडिओ केंद्रांना मिळालेल्या उल्लेखनीय पुरस्कारांबद्दलचे एक विशेष प्रदर्शनही मांडले जाणार आहे. या प्रदर्शनाच्या माध्यमातून या पुरस्कार विजेत्यांनी अशा केंद्रांसाठी दिलेले अपवादात्मक योगदान ठळकपणे जगासमोर आणले जाणार आहेत. याकरिता खास एक स्वतंत्र जागाही राखीव ठेवण्यात आली आहे. या प्रदर्शनामध्ये कम्युनिटी रेडिओ केंद्रांवरून प्रसारित होणाऱ्या कार्यक्रमांचे निर्माते आणि या केंद्रांसाठी योगदान देणारे स्वयंसेवक यांची ओळख करून देणारी तसेच समाजाला प्रभावित करणारी तपशीलवार माहिती अभ्यागतांना जाणून घेता येणार आहे. विशेष म्हणजे या प्रदर्शनाला चित्रमय दृश्य दर्शवणारे फलक अर्थात व्हिज्युअल डिस्प्ले आणि मल्टिमिडिया सादरीकरणाचीही जोड दिली जाणार आहे. या माध्यमातून या सगळ्यांच्या यशोगाथा परिणामकारकरीत्या मांडल्या जाणार आहेत. यातून शिक्षण, आरोग्य, सामाजिक न्याय, आदिवासी विकास, महिलांचे सक्षमीकरण, पर्यावरणीय शाश्वतता आणि अशा विविध क्षेत्रांत कम्युनिटी रेडिओ व्यवस्थेने दिलेले योगदान ठळकपणे जगासमोर मांडण्यात येणार आहे.

भेट देणाऱ्यांना कम्युनिटी रेडिओचा तत्काळ अनुभव घेण्याची संधी उपलब्ध करून देण्यासाठी येथे विशेष क्षेत्रात थेट प्रसारणाची सोय असलेली एक नभोवाणी प्रसारण व्यवस्था अर्थात रेडिओ सेटअपही उभारला जाणार आहे. या उभारलेल्या प्रसारण केंद्रात येथे भेट देणाऱ्यांना रेडिओ होस्ट्स अर्थात नभोवाणीवरील कार्यक्रमांचे निवेदक, सामुदायिक प्रसारक यांच्यासोबत संवाद साधता येणार आहे, या सोबतच ते येथील थेट प्रसारणाच्या माध्यमातून सुरू असलेल्या चर्चांमध्येदेखील सहभागी होऊ शकणार आहेत. या व्यवस्थेमुळे अभ्यागतांना थेट प्रसारणात सहभागी होण्याची, प्रश्न विचारण्याची, आपले अनुभव सामायिक करण्याची आणि कम्युनिटी रेडिओ व्यवस्थेबद्दलच्या तज्ज्ञांसोबत संवाद साधण्याची अनोखी संधी उपलब्ध होणार आहे.

महत्त्वाची गोष्ट अशी की, येथे एक खास 'मन की बात' या कार्यक्रमाला समर्पित विभागही असणार आहे. या विभागांतर्गत कम्युनिटी रेडिओ केंद्रांमार्फत प्रसारित झालेल्या 'मन की बात' या कार्यक्रमांचे भाग मांडलेले असणार आहेत. यामुळे येथे भेट देणाऱ्यांना या संग्रहातून 'मन की बात' या कार्यक्रमाचे विविध समुदायांशी संबंधित असलेले, महत्त्वाच्या समस्यांवर चर्चा केले गेलेले, राष्ट्रीय यशोगाथा आणि उपक्रमांच्या ऐतिहासिक टप्प्यांविषयीची चर्चा असलेले महत्त्वाचे भाग पुन्हा ऐकण्याची संधी मिळणार आहे. महत्त्वाचे म्हणजे अशा प्रकारच्या प्रसारणाने मोठ्या जनसमुदायांना कशा रितीने परस्परांशी जोडले आणि स्थानिक समुदायांचे कशा रितीने सक्षमीकरण घडवून आणले, यावर या विभागात भर दिला जाणार आहे.

या सगळ्याच्या बरोबरीनेच वेव्हज् परिषदेंतर्गत १ ते ४ मे २०२५ दरम्यान होणाऱ्या विविध चर्चासत्रांमध्ये देशभरातील ५३० पेक्षा जास्त कम्युनिटी रेडिओ केंद्र सहभागी होणार आहेत.

खरे तर महानगरे किंवा अगदी पहिल्या श्रेणीतील शहरांच्या बाहेर वसलेल्या समुदायांमध्येही अपार प्रतिभा आणि उत्साह भरलेला असून याची या समुदायांमध्ये कसलीच वानवा वा कमतरता नाही, ही बाब कम्युनिटी रेडिओसोबतच्या सातत्यपूर्ण संपर्कातून वेळोवेळी सिद्ध झालीच आहे. त्यामुळेच अशा सर्व प्रयत्नांच्या माध्यमातून होत असलेल्या प्रयत्नांशी जोडलेल्या कौशल्य, प्रतिभांना माध्यम आणि मनोरंजन क्षेत्राच्या परिसंस्थेत आणून त्यांना जागतिक व्यासपीठ उपलब्ध करून देणे हाच वेव्हज् या परिषदेचा दूरदर्शी उद्देश आहे. एका अर्थाने ही रेडिओ केंद्रे ज्या समुदायांचे प्रतिनिधित्व करत आहेत, ते समुदायच अशा उपक्रमांचे अंतिम लाभार्थी असणार आहेत, असे निश्चितच म्हणता येईल.

(लेखक हे वरिष्ठ पत्रकार आहेत. ते सध्या हिमाचल प्रदेशातील सोलन इथल्या एम.एस. पनवर इन्स्टिट्यूट ऑफ कम्युनिकेशन ॲण्ड मॅनेजमेंटचे संचालक म्हणून कार्यरत आहेत. गेल्या १६ वर्षांपासून कार्यरत असलेल्या हमारा एमएसपीआयसीएम कम्युनिटी रेडिओ, सोलनचे ते केंद्र संचालक आहेत.)

Mrgabharti 75000

**येत्या १ ते ४ मे या कालावधीत मुंबईत वेव्हज् ही माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रविषयक पहिली जागतिक शिखर परिषद होत आहे. या दोन्ही क्षेत्रातील सर्जनशील आशय ते तंत्रज्ञान अशा सर्वांगांना स्पर्श करणाऱ्या या जागतिक शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर भारतीय चित्रपटसृष्टीतील बदलत्या तंत्रज्ञानाचा हा घेतलेला आढावा..**

# समृद्ध परंपरेशी तंत्रज्ञानाची सांगड!

**अतनु घोष**



१९३० च्या दशकापूर्वी, भारतीय चित्रपट कलाकार चित्रीकरणादरम्यान स्वतः 'लाइव्ह' गाणे गात असत आणि एका ट्रॉलीवर ठेवलेल्या तबला, सितार, एकॉर्डियन आणि इतर वाद्यांच्या वादनाने संगीतकार त्यांना साथ देत असत. प्रगत ध्वनिमुद्रण प्रक्रियेमुळे ही अतिशय गुंतागुंतीची प्रक्रिया कालबाह्य झाली. १९३५ मध्ये कलकत्ता येथील न्यू थिएटर्सच्या मुकुल बोस यांनी 'भाग्य चक्र' या चित्रपटासाठी पार्श्वगायनाचा पाया रचला. गाण्याचे स्वतंत्र ध्वनिमुद्रण करून चित्रीकरणादरम्यान चित्रपट कलाकारांना केवळ ओठांची हालचाल अर्थात लिप-सिंक करण्याची पद्धत तिथून सुरू झाली. तीन वर्षांनंतर १९३८ मध्ये 'स्ट्रीट सिंगर'मधील 'बाबुल मोरा' या प्रसिद्ध गीतासाठी के. एल. सेहगल यांच्यासाठी प्लेबॅक अर्थात पार्श्वगायन तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे ठरले. मात्र के. एल. सैगल यांनी नवीन तंत्रज्ञानाला विरोध करत 'स्ट्रीट सिंगर' चित्रपटाच्या चित्रीकरणादरम्यान बाबुल मोरा गीत थेट गाण्याचा आग्रह धरल्याने दिग्दर्शक फणी मजुमदार यांना अखेरीस ध्वनिमुद्रण करण्याचा ध्यास सोडून द्यावा लागला आणि यानंतर जे घडले ते इतिहासात अमर झाले, कारण सेहगल यांनी हातात हार्मोनियम घेऊन रस्त्यावर प्रत्यक्ष गायलेले बाबुल मोरा गीत म्हणजे एक अविस्मरणीय लाईव्ह कलाकृती ठरली.

चित्रपटसृष्टीच्या संपूर्ण इतिहासात डोकावून पाहिले असता कलाकारांनी नेहमी नवीन तंत्रज्ञानाच्या आगमनाशी झुंज दिली आहे, कधी त्यांच्याकडे संशय, भीती किंवा प्रतिकाराच्या भावनेने पाहिले आहे. हा ताण केवळ आपण अप्रचलित होऊ शकतो या भीतीपोटीच नाही, तर कला आणि कलात्मकतेशी असलेल्या दृढ संबंधातूनदेखील उद्भवतो. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), आभासी वास्तव (व्हीआर), वर्धित वास्तव (एआर) आणि विस्तारित वास्तव (एक्सआर) हे सर्व घटक म्हणजे सिनेमॅटिक लँडस्केप्सच्या परिवर्तनातील अत्याधुनिक प्रगती आहे. चित्रपटनिर्मितीमधील उत्कट तंत्रज्ञानाची ही नवीन साधने केवळ कथाकथनाच्या पद्धतीत बदल करण्यासाठी नाहीत तर चित्रपट निर्मितीची पद्धतदेखील बदलण्यासाठी आहेत. एखादी मोठी निर्मिती संस्था असो किंवा स्वतंत्र चित्रपटनिर्माता, कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर त्यांना वेळेची कार्यक्षमता प्रदान करून विविध पैलूंमध्ये बदल करण्यासाठी सज्ज करते आणि येथेच सुरुवात होते आहे एका नवीन अध्यायाला. चित्रपटक्षेत्रातील तज्ज्ञ आणि उद्योग जगतातील व्यावसायिक, वेव्हजच्या (जागतिक दृक्श्राव्य आणि मनोरंजन शिखर परिषद) माध्यमातून प्रस्थापित चित्रपटनिर्माते आणि उदयोन्मुख प्रतिभेला मार्गदर्शन करण्यासाठी आणि पाठिंबा देण्यासाठी सज्ज आहेत. नवोन्मेष आणि सहकार्याला चालना देऊन सर्जनशीलता आणि तंत्रज्ञान यांच्यातील दरी भरून काढणे हे वेव्हज्चे उद्दिष्ट आहे. यामुळे सहभागींना मनोरंजन उद्योगाच्या बदलत्या मागण्यांशी जुळवून घेण्यासाठी सक्षम बनवले जाईल, अशी आशा आहे.

गेल्या दशकभरात दृश्य स्वरूपातील कथाकथनासाठी आवश्यक जागतिक मानकांची पूर्तता करण्यात भारतीय चित्रपट



Mrgabharti 75000

निर्माते पुरते गुंतले होते. कृत्रिम बुद्धिमत्ता भारतीय चित्रपटसृष्टीत क्रांती घडवत असताना त्यातील सर्वात महत्त्वाच्या क्षेत्रांपैकी एक म्हणजे संगणक-निर्मित प्रतिमा (सीजीआय) आणि दृश्य प्रभाव (व्हीएफएक्स) हे क्षेत्र होय. पारंपरिक व्हीएफएक्स तंत्र हे श्रमप्रधान आणि खूप वेळ घेणारे होते आणि ते परिणाम साधण्यासाठी कलाकारांच्या टीमला अनेक दिवस हाताने काम करावे लागत असे. कृत्रिम बुद्धिमत्ता अल्गोरिदम आता मशीन लर्निंगचा वापर करून हालचालींचा मागोवा घेऊन, वास्तववादी चित्र निर्माण करून किंवा विलक्षण अचूकतेने प्रकाशाच्या स्थितीचे अनुकरण करून या प्रक्रियेचे महत्त्वपूर्ण भाग स्वयंचलित करू शकतात. याशिवाय कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे आता प्रत्यक्ष माणसांची गरज न लागता गर्दीचे चित्रण करता येते. तसेच डिजिटल पद्धतीने अभिनेत्यांचे वय वाढवणे किंवा कमी करणे आणि संगणक-निर्मित प्रतिमा आणि लाईव्ह ॲक्शन फुटेजचे मिश्रण सहजपणे करता येते. यामुळे अधिक अनुरूप वातावरण निर्माण होते आणि पौराणिक जग, काल्पनिक प्राणी आणि लार्जर-दॅन-लाइफ ॲक्शन सीक्वेन्स जिवंत करते.

व्हर्च्युअल प्रॉडक्शनच्या स्वरूपात आणखी एक प्रगती झाली आहे- हे एक असे तंत्र आहे, ज्यामुळे चित्रीकरण सुरू होण्यापूर्वीच्या प्रत्यक्ष वातावरणाचा अभ्यास करून रिअल-टाइम रेंडरिंग इंजिन आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांची सांगड घातली जाते. निमिर्तीपूर्व काळात वेळ आणि पैशांचे गणित जुळवण्यासाठी चित्रपट निर्माते या तंत्राचा वापर मोठ्या प्रमाणात करत आहेत. उदाहरणार्थ, चित्रपट निर्माते आणि सिनेमॅटोग्राफर म्हणजेच छायाचित्रकार यांना एकाच फ्रेमचे चित्रीकरण करण्यापूर्वी आवश्यक दृश्ये ब्लॉक करण्यात, कॅमेऱ्याच्या हालचालींचे नियोजन करण्यात आणि दृश्यांच्या जटिल अनुक्रमांची जुळणी करण्यात कृत्रिम बुद्धिमत्तेने युक्त प्री-व्हिज्युअलायझेशन उपकरणे मदत करतात.




चित्रपट निर्मितीतील पारंपरिकपणे सर्वात कष्टप्रद टप्प्यांपैकी एक असलेली निमिर्तीपूर्व कामे कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने लक्षणीयरीत्या सोपी झाली आहेत. यामुळे रंगाचे श्रेणीकरण, दृश्यांमधील सुसंगती जुळवणे आणि प्रतिमेतील नको असलेले घटक काढून टाकण्याची प्रक्रिया जलद झाली आहे- पूर्वी याच कामांसाठी कित्येक तास स्वतः हाताने काम करावे लागत असे. ध्वनी तंत्रज्ञानात, व्हॉइस क्लोनिंग, लिप-सिंक सुधारणा आणि अनेक भाषांमध्ये डबिंग अशा क्षेत्रांमध्येही कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभाव दिसून येत आहे. भारताच्या बहुभाषिक परिसंस्थेत याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

भारतीय चित्रपटसृष्टी अद्याप कृत्रिम बुद्धिमत्तेचे पैलू शोधून पाहण्याच्या आरंभीच्या टप्प्यात असली, तरी पटकथालेखक मात्र याबाबत आधीच उत्सुक आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता साधने हजारो स्क्रिप्ट्स, शैली आणि प्रेक्षकांच्या पसंतीचे विश्लेषण करून कथानकातील मुद्दे, पात्रांचा कथेनुसार होणारा अंतर्गत प्रवास आणि संवादातील विविधता सुचवू शकतात. यामुळे एखाद्या सर्जनशील मनाची जागा घेतली जाऊ शकत नसली, तरी त्यांच्या सर्जनशीलतेत वाढ मात्र नक्कीच होते. यामुळे प्रतिभेला अंतर्दृष्टी प्राप्त होऊन कथा अधिक आकर्षक होऊ शकते तसेच त्यात सांस्कृतिक छटा उमटतात. उदाहरणार्थ, एखादा क्लिष्ट ऐतिहासिक महाकाव्य तयार करणारा चित्रपट निर्माता कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून त्या त्या काळाचे तपशील आणि त्यावेळी अस्तित्वात असलेली बोलीभाषा यांचा शोध घेऊ शकतो आणि तेही केवळ काही सेकंदात.

कृत्रिम बुद्धिमत्ता आणि इमर्सिव्ह तंत्रज्ञानाचा सर्वात खोल परिणाम म्हणजे लोकशाहीकरण. मोठे बजेट नसलेले स्वतंत्र चित्रपट निर्माते आता अनेकदा उच्च-गुणवत्तेची सामग्री तयार करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तायुक्त उपकरणांचा वापर करू शकतात. ओपन-सोर्स सॉफ्टवेअर आणि क्लाउड-आधारित एडिटिंग सूट वापरणाऱ्यांना आता महागड्या हार्डवेअरशिवाय मजकूर, ॲनिमेशन आणि ध्वनी डिझाईनसाठी वैविध्यपूर्ण प्रयोग करता येणे शक्य झाले आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता छायाचित्रकारांना प्रत्येक दृश्यात इच्छित परिणाम साध्य करण्यासाठी सर्वात कार्यक्षम कॅमेरा अँगल आणि प्रकाश परिस्थितीचा अंदाज घेण्यास मदत करू शकते. याशिवाय संकलकांना देखील तासन्तास फुटेज स्कॅन करण्यात आणि उत्पादक विश्लेषण आणि नोट्स तयार करण्यात मदत करू शकते. यामुळे एडिटर्स अंतिम कटमध्ये घेण्यासाठी उत्तम

Mrgabharti_75000

दृश्याची निवड करू शकतो. ज्यामुळे वेळेची बचत तर होतेच, शिवाय कार्यक्षमता वाढते.

जुन्या भारतीय चित्रपटांचे सध्या पुनर्संचयन करावे लागत आहे आणि खराब झालेल्या मूळ फिल्म रिल्सचे डिजिटल पुनर्संचयित करणे, खराब झालेल्या फोटोकेमिकल फिल्म्सची नक्कल करणे, फिल्म्स जीर्ण झाल्याने पडलेले ओरखडे आणि फ्लिकर कमी करणे; तसेच फुटेजच्या मूळ स्वरूपाच्या अनुषंगाने चित्राची गुणवत्ता वाढवणे यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता महत्त्वाची भूमिका बजावते. चित्रपटांच्या भाषेच्या बाबतीतही कृत्रिम बुद्धिमत्ता मदत करू शकते. कॅप्शनिंग सुधारणे, योग्य प्रकारे डबिंग करणे आणि चित्रपटातील मूळ भाषेचा अनुवाद करून तो चित्रपट अधिकाधिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्यात त्याची मदत होऊ शकते.



कृत्रिम बुद्धिमत्तेचे लाभ असे अफाट असले, तरी याच्या वापरामुळे चित्रपटांमधील नैतिकतेचा मुद्दा ऐरणीवर येतो. जर याचा गैरवापर झाला, तर डीपफेक तंत्रज्ञानामुळे चुकीची माहिती मिळू शकते आणि संमतीविषयक नियमांचे उल्लंघन होऊ शकते. याशिवाय या टप्प्यावर कलात्मक प्रामाणिकपणाचा प्रश्नदेखील आहेच.

मानवी सर्जनशीलता आणि यंत्राची मदत यात आपण सुवर्णमध्य कसा काढू शकतो?

चित्रपट निर्मितीमध्ये एआय तंत्रज्ञान विकसित करणे आणि अमलात आणणे देखील महाग असू शकते आणि अनेक चित्रपट निर्माते आणि निर्मात्यांकडे अशा प्रकारची गुंतवणूक करण्यासाठी निधीची कमतरता असते. तसेच कोणत्याही तंत्रज्ञानाच्या बाबतीत अवलंबित्वाचा धोका हा असतोच. जे चित्रपट निर्माते त्यांच्या निर्मितीसाठी एआयचा वापर करतात ते तंत्रज्ञानावर पूर्णपणे अवलंबून राहण्याचा धोका संभवतो. ज्यामुळे कलात्मक दृष्टिकोन, अस्सलता आणि सर्जनशील क्षमतेचा ऱ्हास होऊ शकतो.

कृत्रिम बुद्धिमत्तेसाठी डेटा आवश्यक आहे हे अपरिहार्य असून तो डेटा संकलित करणेही तितकेच आवश्यक आहे. अशा वेळी डेटा गोपनीयतेबाबतची चिंता इतर उद्योगांमध्ये आधीच एक मोठी समस्या बनली असताना आता चेहऱ्याची ओळख प्रणाली आणि बायोमेट्रिक्सचा वापर ही चिंता आणखीनच वाढवत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणालीचा वापर विविध क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर होत असताना हॅकर्स आणि सायबर गुन्हेगारांचे ते आकर्षणाचे केंद्र बनत चालले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणालीत वापरले जाणारे अल्गोरिदम पक्षपाती असू शकतात, ज्यामुळे स्टिरियोटाइप्स अर्थात एकाच प्रकारच्या विचारधारेचा प्रभाव वाढू शकतो आणि लोकांच्या विविध गटांच्या प्रतिनिधित्वाला मर्यादा येऊ शकतात. पूर्वनिर्धारित परिमाणे किंवा नियमांमध्ये नवीन आणि नावीन्यपूर्ण कल्पना निर्माण करण्यासाठी या प्रणाली उत्कृष्ट आहेत. मात्र, त्यांच्यात मानवी सर्जनशीलतेशी संबंधित तरलता आणि उत्स्फूर्ततेचा अभाव आहे. सध्याच्या एआय सिस्टिम, पॅटर्न ओळखण्यात उत्कृष्ट आहेत आणि मोठ्या प्रमाणात जलद प्रक्रिया करतात हे मान्य असले, तरी त्यांच्यात मानवी समज, अंतर्ज्ञान आणि सहानुभूतीची कमतरता आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ताचलित इमर्सिव्ह उपकरणांद्वारे समर्थित तांत्रिक परिवर्तनाच्या उंबरठ्यावर उभे असताना भारतीय चित्रपट निर्माते आणि तंत्रज्ञ यांच्यासमोर तंत्रज्ञानाच्या चमत्काराच्या मोहात पडायचे की नाही - हा पेच कायम आहे. एकीकडे अमर्यादित सर्जनशीलता, कार्यक्षमता आणि प्रेक्षकांशी नाळ जोडली जाण्याचे आश्वासक चित्र आहे, तर दुसरीकडे कलात्मक नियंत्रण गमावण्याची, शिकण्याच्या खडतर वळणांना पार करून जाण्याची आणि नैतिक अधःपतन होण्याची भीती आहे. तरीही इतिहास सांगतो की, भारतीय चित्रपटसृष्टी स्वतःला पुन्हा सिद्ध करण्यापासून कधीही मागे हटलेली नाही - सायलेंट रिल्सपासून ते संगणक निर्मित प्रतिमा वापरून केलेल्या महाकाव्यांपर्यंत. चित्रपटसृष्टी जसजशी अल्गोरिदम आणि ग्राफिकल अवतारांसह प्रयोग करेल, त्यावेळी असे आढळून येईल की, जेव्हा तंत्रज्ञान सर्जनशीलतेची जागा न घेता उलट या प्रतिभेला अधिक उत्कृष्ट बनवत आहे, तेव्हा कथाकथनाचा अंतरात्मा अधिक सुंदररीत्या प्रकट होईल किंवा एका दिग्दर्शकाने त्याच्या पहिल्या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या प्रयोगाविषयी म्हटल्याप्रमाणे हे आश्चर्यकारक आहे - जोपर्यंत कृत्रिम बुद्धिमत्ता आपल्याला सह-दिग्दर्शक म्हणून श्रेय मागू लागत नाही तोपर्यंत!

(लेखक राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार विजेते आणि चित्रपट दिग्दर्शक आहेत.)

Mrgabharti 75000


**भारत सरकारच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळ – राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय (NFDC-NFAI) आणि इमेजनेशन स्ट्रीट आर्ट या संस्थांच्या सहकार्याने जागतिक दृक्श्राव्य मनोरंजन शिखर परिषदेच्या विविध उपक्रमांतर्गत वेव्हज् (WAVES - World Audio Visual & Entertainment Summit) आंतरराष्ट्रीय चित्रपट पोस्टर्स निर्मिती स्पर्धा या आव्हानात्मक स्पर्धेचे आयोजन केले असल्याची घोषणा करताना मला खरोखरच आनंद झाला आहे.**

# स्मरणरंजन घडवणारी चित्रपटांची पोस्टर्स!

**डॉ. मिलिंद दामले**

युवा प्रेक्षकवर्गाला चित्रपट पोस्टर्सच्या समृद्ध वारशाशी जोडण्याच्या उद्देशानेच या स्पर्धात्मक उपक्रमाचे आयोजन केले गेले आहे. खरे तर सुरुवातीच्या काळात चित्रपटाची पोस्टर्स हाताने तयार केलेल्या कलाकृतीच असायच्या. तिथून झालेली ही सुरुवात १९९० नंतर डिजिटल स्वरूपात रूपांतरित झाली. याच पार्श्वभूमीवर या स्पर्धात्मक उपक्रमाच्या माध्यमातील हा प्रयत्न जागतिक व्यासपीठावर भारताच्या अतिशय समृद्ध चित्रपट वारशाचा अत्यंत नावीन्यपूर्ण पद्धतीने प्रचार, प्रसार तर करेलच, सोबतच या वारशाला उत्सव स्वरूपातही साजरा करेल.

खरे तर गेल्या अनेक दशकांपासून, चित्रपटांचे पोस्टर्स हेच आपल्याला मिळणाऱ्या सिनेमॅटिक अनुभवाचा आधारस्तंभ राहिले असल्याचे आपल्याला नाकारता येणार नाही. या पोस्टर्सनी कायमच चित्रपटांच्या प्रसिद्धीमध्ये अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. महत्त्वाचे म्हणजे पोस्टर्स नेहमीच चित्रपट उद्योग आणि उत्सुकतेने भारलेल्या प्रेक्षकांमधील दुवा म्हणून काम करत आली आहेत आणि म्हणूनच गेल्या अनेक दशकांपासून चित्रपटांच्या प्रसिद्धीसाठी हाताने बनवलेल्या पोस्टर्सचा उपयोग केला जात आहे. चित्रपट रसिकांमध्येही कायम अशा पोस्टर्सबद्दलची उत्सुकता दिसून येते, अशा पोस्टर्सवरची रचना आणि स्वरूप पाहूनच ते अनेकदा चित्रपटांची कथा आणि बाज कसा असेल, याचेही आखाडे बांधतात. दुसरीकडे चित्रपट दिग्दर्शक आणि निर्मातेदेखील आपल्या चित्रपटाच्या विपणन धोरणाचा अविभाज्य भाग म्हणून पोस्टर्सवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असत. कारण ही पोस्टर्स प्रेक्षकांमध्ये चित्रपटाबद्दलची उत्सुकता निर्माण करतात आणि प्रेक्षकांना आपल्याकडे खेचून आणतात. खरे तर त्या त्या पोस्टर्समधून केवळ चित्रपटाच्या कथानकाची झलक मांडली जात नाही, तर ही पोस्टर्स पडद्यामागे काय घडले असू शकेल, याचीही कथा सांगत असतात हेही आपण समजून घ्यायला हवे.




या स्पर्धेच्या आयोजनाच्या निमित्ताने विचार करताना प्रामुख्याने राज कपूर यांचे कामाबद्दलचे विचार सातत्याने मनात घोळत होते, अर्थात त्यांचे जन्मशताब्दी वर्ष साजरे होत असल्याने हे विचार सहजपणे मनात येत होते. 'बरसात' या त्यांच्या अत्यंत गाजलेल्या चित्रपटाचा ७५ वा वर्धापनदिन गेल्या वर्षी साजरा केला गेला. खरे तर या चित्रपटाशी संबंधित पडद्यावरच्या आणि पडद्यामागच्याही अनेक रंजक कथा आहेत. या चित्रपटाच्या निमित्ताने अनेक गोष्टी पहिल्यांदाच घडल्या होत्या. त्यातील महत्त्वाची घडामोड म्हणजे शंकर - जयकिशन या संगीतकार जोडीने पहिल्यांदाच दिलेले संगीत. 'बरसात' (१९४९) हा चित्रपट आरके फिल्म्सची दुसरी निर्मिती होती आणि या सिनेमातूनच शंकर-जयकिशन यांनी संगीत-दिग्दर्शक म्हणून पदार्पण केले. पृथ्वी थिएटरसोबत काम करत असताना राज कपूर आणि या संगीतकार जोडीमधील बंध अधिक दृढ झाले. एक रंजक गोष्ट अशी की, या चित्रपटाच्या सुरुवातीला प्रकाशित केलेल्या पोस्टर्समधल्या श्रेय नामावलीत संगीत दिग्दर्शक म्हणून राम गांगुली यांचे नाव नमूद केले गेले होते. त्यांनीच आरके फिल्म्सची पहिली निर्मिती असलेल्या आग (१९४८) या चित्रपटाला संगीत दिले होते. मात्र एका विशिष्ट चालीवरून त्यांच्यात मतभेद झाले आणि आरके फिल्म्सने राम गांगुली यांच्याऐवजी शंकर-जयकिशन यांना संगीत दिग्दर्शनाची जबाबदारी दिली. अर्थात या घडामोडीमागे वेगळी कारणे असल्याच्या अनेक

Mrgabharti_75000

कहाण्याही चर्चेत आहेत. पण मथितार्थ हाच की, संगीत दिग्दर्शकांच्या नावातील बदलाची ही गोष्ट या सुरुवातीच्या पोस्टर्समधून प्रतिबिंबित झाली आहेत. एका अर्थाने हे पोस्टर म्हणजे या घडामोडीच्या दृश्य इतिहासाचेच एक पान आहे.

'बरसात'च्या पोस्टरमधील आणखी एक दखल घेण्याजोगा तपशील म्हणजे, या चित्रपटाच्या सुरुवातीच्या पोस्टरमध्ये श्रेय नामावलीत लेखक म्हणून इंदर राज यांना दिलेले श्रेय आणि त्याचवेळी अभिनेत्री निम्मी यांच्या पदार्पणाचा नसलेला उल्लेख. अशा तऱ्हेने नावाचा उल्लेख केलेला नसणे म्हणजे हे पोस्टर निर्मितीपूर्व प्रसिद्धीचा भाग होते हे आपल्या लक्षात येऊ शकेल. सुरुवातीचे हे विशिष्ट पोस्टर १९३८ ते १९५९ या काळात फिल्म इंडिया या सुप्रसिद्ध मासिकाचे मुखपृष्ठ साकारण्यासाठी प्रसिद्ध असलेले कलाकार एस. एम. पंडित यांनी साकारले होते. मात्र जेव्हा नोव्हेंबर १९४८ चा फिल्म इंडियाचा दिवाळी अंक प्रकाशित झाला, त्या अंकात मात्र या पोस्टरसाठी त्यांच्या श्रेयाचा उल्लेख केलेला नसण्यासारखी अनाकलनीय घटना घडली होती. त्या अंकात 'बरसात'चे पोस्टर साकारण्याचे श्रेय बारस्कर नावाच्या एका दुसऱ्या कलाकाराला दिल्याचे दिसते. खरे तर पंडित हे कायमच आपल्या मुळगावकर, बारस्कर किंवा पद्मराज यांच्यासारख्या सहकाऱ्यांना श्रेय देत आले होते. जर का त्यांच्या या सहकाऱ्यांपैकी कोणीही पोस्टर साकारण्यात स्वतःचे योगदान दिलेले असेल, तर त्या पोस्टरचे सादरकर्ते म्हणून स्टुडिओ एस. एम. पंडित या नावाचा उल्लेख त्यावर असायचा. मात्र त्या दिवाळी अंकात तसाही उल्लेख नव्हता. प्रसिद्ध कला दिग्दर्शक आणि हाताने पोस्टर साकारण्याच्या कलेतील तज्ज्ञ सुबोध गुरूजी यांनी या गोष्टीची पुष्टी केली आहे की, त्या संबंधित पोस्टरसाठी वापरलेले तंत्र आणि रंगांचा वापर पाहता ते पोस्टर बारस्कर यांनीच साकारले होते. पंडित यांच्या अधिकाधिक बारकाईने तपशील असलेल्या पोस्टरच्या तुलनेत बारस्कर यांनी साकारलेल्या पोस्टरमधील वेगळेपण म्हणजे त्यात पावसाचे संकेत देण्यासाठी केलेला साध्या स्ट्रोकचा वापर, त्यातून ते चित्रपटाविषयी अधिक तपशील उघड न करता, चित्रपटाच्या कथानकाबद्दलची अगदी हलकीशी कल्पना देत असत. थोडक्यात चित्रपटाच्या सुरुवातीच्या श्रेय नामावलीतील उल्लेख लक्षात घेतले, तर ही पोस्टर्स चित्रपटाच्या पूर्व-प्रसिद्धी मोहिमेचा एक भाग असल्याचे सहजपणे समजून घेता येते. माहितीसाठी म्हणून सांगायचे तर 'बरसात' हा चित्रपट २१ एप्रिल १९४९ रोजी प्रदर्शित झाला होता.




'बरसात' या चित्रपटाच्या निमित्ताने आरके फिल्म्सने अनेक दीर्घकालीन सहकार्यपूर्ण भागीदारींची मुहूर्तमेढही रोवली होती. उदाहरण म्हणून पाहायचे झाले, तर बरसातच्या निमित्तानेच शैलेंद्र यांनी प्रथमच संपूर्ण चित्रपटाची गाणी लिहिली. त्यासाठी त्यांनी हसरत जयपुरी यांच्यासोबत भागीदारी केली. महत्त्वाचे म्हणजे हसरत जयपुरी यांनीही तोपर्यंत 'आग' या चित्रपटासाठी केवळ एकच गाणे लिहिले होते. दुसरीकडे बरसातच्या दरम्यानच स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या आरके फिल्म्ससोबतच्या दीर्घकालीन नात्यालाही सुरुवात झाली. त्यांनी ज्या-ज्या गाण्यांना आवाज दिला ते गाणे अजरामर झाले. या व्यतिरिक्त छायाचित्रणकार अर्थात सिनेमॅटोग्राफर जल मिस्त्री यांनीदेखील या चित्रपटातूनच पदार्पण केले आणि आपल्या अप्रतिम कलाकारीने त्यांनी काश्मीरमधील नयनरम्य निसर्गाचे पहिल्यांदाच मोठ्या पडद्यावरून दर्शन घडवले. त्यावेळचे काश्मीरमधील युवा नाटककार रामानंद सागर यांनी आपल्या लेखन कारकिर्दीची सुरुवातही बरसात चित्रपटातूनच केली होती आणि त्यानंतर ते भारतीय चित्रपटसृष्टीतील एक महान व्यक्तिमत्त्व म्हणून उदयाला आले. त्यांनीच पृथ्वी थिएटरसाठी कलाकार या नाटकाचेही लेखन केले होते. एका अर्थाने बरसात या चित्रपटाला केवळ त्याच्या कथनासाठीच नव्हे, तर या चित्रपटाच्या निमित्ताने भारतीय चित्रपट उद्योगक्षेत्रावर मोठी छाप सोडणाऱ्या प्रतिभावान व्यक्तिमत्त्वांचा एक समूहच ज्या रितीने एकत्र आला, त्यामुळेही या चित्रपटाला भारतीय चित्रपटाच्या इतिहासात एक विशेष स्थान आहे.

या दुसऱ्या पोस्टरमध्ये आपण इंदर राज यांच्याऐवजी रामानंद सागर आणि राम गांगुली यांच्याऐवजी शंकर-जयकिशन यांना श्रेयनामावलीत स्थान दिल्याचे पाहू शकतो. इतकेच नाही, तर नवोदित अभिनेत्री निम्मी यांच्या नावाचा केलेला उल्लेखही या पोस्टरमध्ये आपल्याला पाहायला मिळतो.

बरसातच्या पोस्टरमधील सर्वात वैशिष्ट्यपूर्ण प्रतिमांपैकी एक प्रतिमा म्हणजे राज कपूर यांनी त्यांच्या डाव्या हातात

Mrigabharti_75000

व्हायोलिन धरलेले आहे आणि त्याचवेळी नरगिस यांनी त्यांच्या उजव्या हातावर आपली पाठ टेकवून स्वतःला पूर्णतः झोकून दिले असल्याची प्रतिमा. ही प्रतिमा म्हणजे या चित्रपटात या दोन्ही कलाकारांनी साकारलेल्या प्राण आणि रेश्मा या दोन्ही व्यक्तिरेखांमधील गहिऱ्या प्रेमकहाणीचे एक दमदार प्रतिनिधित्वच आहे. ही प्रतिमा केवळ चित्रपटाच्या कथानकाच्या केंद्रस्थानी असलेल्या प्रणयाबद्दलच व्यक्त होते असेही नाही, तर त्यातून या कथनातील संगीतिक अभिव्यक्तीच्या महत्त्वावरही त्यातून भर दिला गेला आहे. कारण या चित्रपटाचा नायक प्राण हा संगीतकार आहे. या पोस्टवरचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे आरके फिल्म्स या संस्थेच्या प्रसिद्धीच्या प्रचार साहित्यात सर्वाधिक महत्त्वाचा घटक असलेले त्यांचे बोधचिन्हच या पोस्टरवर दिसत नाही आणि ही बाब निश्चितच दखल घ्यायला लावणारी आहे. हे बोधचिन्ह त्या पोस्टरवर नसण्याचे कारण म्हणजे त्याचे अनावरण 'बरसात' या चित्रपटाच्या प्रदर्शनानंतरच केले गेले होते आणि त्यानंतर ते पहिल्यांदा 'आवारा' (१९५१) या चित्रपटाच्या पोस्टरवर दिसले होते.

एक लोकप्रिय धारणा अशी आहे की, आरके फिल्म्सचे बोधचिन्ह हे बरसात चित्रपटातील दृश्यापासून प्रेरित होऊन साकारले होते. खरे तर प्रत्यक्षात असे काही घडले नव्हते, तर या उलट हे बोधचिन्ह या चित्रपटाच्या प्रसिद्धीच्या निमित्ताने केलेल्या छायाचित्रणांच्या सत्रांमधून साकारले गेले होते.

बरसात या चित्रपटाला लाभलेला वारसा आणि या चित्रपटाचे पोस्टर आपल्याला चित्रपटसृष्टीच्या जगाचे अंतरंग अगदी मनोरंजक पद्धतीने उलगडून दाखवतात. या पोस्टरवरच्या प्रतिमा आणि त्याची संरचना केवळ चित्रपटांची जाहिरात करत नाहीत. हे पोस्टर्स या चित्रपटासाठीचे परस्पर सहकार्य, अभिनवता आणि सर्जनशीलता या विषयीच्या तपशीलवार कथाही आपल्यासमोर उलगडून दाखवतात. जर का आपण चित्रपटांच्या पोस्टर्सच्या इतिहासाकडे मागे वळून पाहिले, तर त्या त्या पोस्टर्सनी संबंधित चित्रपटांच्या बाबतीत लोकांच्या धारणांना आकार देण्यात आणि चित्रपटांबद्दलची उत्सुकता निर्माण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली असल्याचे आपल्याला सहजपणे लक्षात येऊ शकते. खरे तर ही पोस्टर्स म्हणजे काही केवळ जाहिरातीची साधने नव्हती, तर त्याही पलीकडे म्हणजे चित्रपट दिग्दर्शक-निर्माते आणि प्रेक्षकांमधील एक दुवा म्हणून ही पोस्टर्स काम करत होती, ती प्रेक्षकांच्या मनात चित्रपटाबद्दलच्या विविध कल्पना आणि उत्सुकता जागृत करत होती.




या लेखाच्या निमित्ताने आपण चित्रपटांच्या पोस्टर्सच्या भूमिकेचे जे महत्त्व समजून घेतले आहे ते लक्षात घेतले, तर वेव्हज् परिषदेच्या निमित्ताने आयोजित केलेली आंतरराष्ट्रीय चित्रपट पोस्टर्स निर्मिती स्पर्धा, चित्रपट क्षेत्राचे शिक्षण घेत असलेले युवा विद्यार्थी आणि कलाकारांसाठी, या समृद्ध इतिहासाचा नव्याने शोध घेण्यासाठी आणि अजरामर चित्रपटांचे नवे अर्थ उलगडून दाखवण्याची एक अनोखी संधी असल्याचे निश्चितच म्हणावे लागेल. या स्पर्धेत सहभागी झालेल्या स्पर्धकांना निवडलेल्या २० निवडक चित्रपटांच्या संग्रहातील पोस्टर्सना नव्या कल्पनांची जोड देऊन ते पुन्हा साकारण्याची, त्याला आपल्या सर्जनशीलतेची जोड देण्याची संधी मिळणार आहे. यामुळे या स्पर्धकांना आपल्या कलात्मक कौशल्यांचा चित्रपटाच्या गहिऱ्या अर्थासोबत मिलाफ घडवून आणण्याची संधीही मिळणार आहे. खरेतर ही स्पर्धा म्हणजे काही केवळ भारतीय चित्रपटसृष्टीच्या वारशाचा सन्मान करणारी नाही, तर त्याही पलीकडे कलाकारांच्या भावी पिढ्यांना भारतीय चित्रपट जगताच्या सध्याच्या कथात्मक मांडणीतही स्वतःचे योगदान देण्याकरिता प्रोत्साहन देणारी स्पर्धा आहे.

ही स्पर्धा तीन वर्गवारीमध्ये होत आहे. पहिली वर्गवारी म्हणजे डिजिटल पोस्टर स्पर्धा (Digital Poster competition). ही स्पर्धा सर्व भारतीय नागरिकांसाठी खुली असणार आहे. दुसरी म्हणजे चित्रपट पोस्टर हाताने रंगवून साकारण्याची स्पर्धा (Hand-Painted Film Poster competition). ही स्पर्धा केवळ शैक्षणिक संस्थांसाठी असणार आहे. यानंतर तिसरी आणि अखेरची वर्गवारी म्हणजे आंतरराष्ट्रीय पोस्टर स्पर्धा (International Poster competition). ही वर्गवारी परदेशी नागरिकांसाठीही खुली असणार आहे. या स्पर्धेच्या निमित्ताने युवा कलाकारांना प्रतिमांच्या माध्यमातून कथात्मक मांडणी करण्याची चित्रपट जगताच्या केंद्रस्थानी असलेली ही शतकानुशतकांची परंपरा जिवंत राखत, चित्रपट पोस्टर कलेच्या या समृद्ध वारशाचा नव्याने शोध घेण्याची, या कलेला नवसंजीवनी देण्याची आणि या कलेची अभिव्यक्ती जगासोबत सामायिक करण्याची अनोखी संधी मिळणार आहे.

या स्पर्धेविषयी अधिक माहिती व स्पर्धेत कसे सहभागी होता येईल, हे जाणून घेण्यासाठी या संकेतस्थळाला भेट द्या : https://www.nfdcindia.com/waves-poster-challenge-2025/.

**(लेखक हे भारतीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्था, पुणे [ Film and Television Institute of India, Pune] येथे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.)**

Mrgabharti 75000

**सिनेजगत म्हणा वा चित्रपटसृष्टी म्हणा त्यात केवळ चित्रपटांचा अंतर्भाव होत नाही, तर त्या चित्रपटांभोवतीच्या, त्यांच्या आसपासच्या दृश्यमान कलात्मक वातावरणाचाही त्यात समावेश होतो. अशा दृश्य कलांच्या सगळ्यात मोहक रूपांपैकी एक असलेली कला म्हणजे ‘पोस्टर कला.’ ही पोस्टर्स चित्रपटांची कहाणी सांगतात, भावनांना स्पर्श करतात आणि या पोस्टर्सवरून एक नजर जरी टाकली, तरी आपल्या चित्रपटाबद्दलच्या अपेक्षा उंचावतात.**

# भारतीय चित्रपटसृष्टीची एक दृश्यात्मक वाटचाल

**सुबोध गुरुजी**

गेल्या अनेक वर्षांपासून चित्रपटांची जाहिरात करण्याबरोबरच चित्रपटांना एक ओळख मिळवून देण्यात या पोस्टर्सचा सिंहाचा वाटा आहे.

साध्या हाताने रंगवलेल्या सुरुवातीच्या काळातल्या पोस्टर्सपासून ते आताच्या डिजिटल स्वरूपाच्या पोस्टर्सपर्यंतच्या कलेची प्रगती भारतीय चित्रपटांच्या विकासाबरोबर हातात हात घालून झाली आहे. या समृद्ध अशा टप्प्या-टप्प्याने घडलेल्या इतिहासाकडे कायम दुर्लक्ष होत आले आहे.


चला तर मग भारतीय सिनेपोस्टर्सच्या वाटचालीचा सखोल अभ्यास करू या, पोस्टर्सची कलात्मक उत्क्रांती, सांस्कृतिक महत्त्व आणि चित्रपटसृष्टीवर त्यांनी उमटवलेला कायमचा ठसा याविषयी जाणून घेऊ या.

## फिल्म पोस्टर कलेचा प्रवास

अगदी लहान असल्यापासून मी या पोस्टर्सकडे आकर्षित झालो. माझ्या कलाकार वडिलांनी माझ्या हातात ब्रश आणि रंग दिला तो क्षण मला अजूनही स्पष्टपणे आठवतो. ब्रश आणि रंग हातात आल्यावर मी एका फिल्म पोस्टरवरच्या मोठ्या अक्षरांमध्ये रंग भरून हात साफ केला होता. त्यामुळे अगदी लहान वयातच रंग आणि आकारांच्या जगात मी शिरलो. बोलक्या पोस्टर्समधून संवाद साधणाऱ्या कलात्मक भाषेची गोडीही मला बालवयातच लागली. भारतीय चित्रपट पोस्टर्सचा विशाल इतिहास आणि सांस्कृतिक महत्त्व खोलवर जाणून घेण्याच्या दिशेने मी टाकलेले हे पहिले पाऊल होते. त्या मार्गावरची माझी वाटचाल अशा पद्धतीने सुरू झाली.

भारतातील ही फिल्म पोस्टर्स केवळ जाहिरातीसाठीची साधने नाहीत, तर त्यापेक्षा कितीतरी अधिक आहेत. ही पोस्टर्स स्वतंत्र कलाकृती तर आहेतच, शिवाय ती देशाच्या सांस्कृतिक धाग्याने खोलवर गुंफलेली आहेत. त्यातून सामाजिक-राजकीय परिप्रेक्ष्याचे प्रतिबिंब उमटते. त्याचबरोबर या पोस्टर्समध्ये जनतेच्या आशा-आकांक्षा प्रतिबिंबित होतात. आजच्या काळातही त्यांचे महत्त्व ट्रेंड सेंटर म्हणून टिकून आहे.

‘कल्याण खजिना’ या चित्रपटासाठी १९२४ मध्ये तयार केलेले पोस्टर हे भारतातील पहिले सिनेपोस्टर ठरले. मूकपटांच्या माध्यमातून कलेचा नवीन प्रकार, नवा आविष्कार उदयाला आल्यानंतर तब्बल १२ वर्षांनी ही पोस्टरकला अवतरली. त्या काळात पोस्टर्स हाताने रंगवलेली असत. ते तयार करणारे कलाकार हे खऱ्या अर्थाने कारागीर होते. त्यांच्याकडे मर्यादित साधने असायची; पण त्यांच्या कल्पकतेला कोणतीही सीमा नव्हती, ती कोणत्याही बंधनात जखडलेली नव्हती.



Mrgabharti_75000

### हाताने रंगवलेल्या पोस्टर्सची उत्क्रांती

हाताने रंगवलेल्या पोस्टर्सचे सुवर्णयुग सुरू झाले ते १९३० च्या दशकात. १९८० च्या दशकापर्यंत हा सुवर्णकाळ अबाधित राहिला. बाबूराव पेंटर आणि जे. बी. दीक्षित यांच्यासारख्या पोस्टर कारागिरांच्या विलक्षण कलाकृतींनी केवळ चित्रपटाची जाहिरात करण्यापलीकडे आणखी बरेच काही केले. त्यांनी या कलेला नवे आयाम दिले. त्यांच्या पोस्टर्सवरची चित्रे चित्रपटांच्या कथा सांगायची, भावनांचा अचूक वेध घ्यायची, कथेतील नेमके नाट्य पकडायची आणि भारतीय चित्रपटसृष्टीच्या भव्यतेचे दर्शन घडवायची. या कलाकारांनी कायम अज्ञात राहून काम करणे पसंत केले. त्यांची नावे कोणाला फारशी परिचित नसत. मात्र त्यांच्या कामामुळे भारतीय चित्रपटसृष्टीचा वारसा पुढे नेला गेला. त्यामुळे त्यांचे काम अजरामर झाले.

या पोस्टर्समधील हस्तकारागिरी लक्षवेधी आणि उल्लेखनीय होती. कलाकारांच्या हाताने काढलेल्या हुबेहूब प्रतिमा बहुतेकदा नाट्यमय पोझमध्ये असायच्या. एकसमानता राहावी यासाठी अत्यंत काळजीपूर्वक या प्रतिमा रंगवलेल्या असत. ठळक रंग आणि अद्वितीय टायपोग्राफीमुळे पोस्टर्सच्या सौंदर्यात भर पडायची.

एखाद्या अभिनेत्याला चित्रपटात किती महत्त्वाची भूमिका आहे त्यावरून त्या पोस्टरवरच्या प्रतिमेचा आकार आणि ठसठशीतपणा ठरायचा. त्यामुळे सिनेमा पाहायला जाण्यापूर्वीच प्रेक्षकांना पात्रांची नेमकी भूमिका आणि त्यांच्या भूमिकेतल्या महत्त्वाप्रमाणे असलेली उतरंड समजलेली असायची.

१९२० पर्यंत फिल्म पोस्टर्स निर्मितीत लिथोग्राफी अर्थात शिळाछापाच्या कलेचा शिरकाव झाला होता. त्यामुळे काही मोजक्या रंगांमध्ये कलाकारांना पोस्टर्स छापता यायला लागली होती. काही मर्यादा होत्या, तरी लाखमोलाची सर्जनशीलता असेल, तर तुटपुंज्या साधनांनिशीही किती उत्तम दर्जाची पोस्टर्स तयार करता येऊ शकतात याचे जबरदस्त उदाहरण 'सती सावित्री' (१९२७) चित्रपटाच्या पोस्टरने घालून दिले होते. देशभरात पोस्टर्सच्या प्रसारात तंत्रज्ञानाने लक्षणीय भूमिका बजावली. तंत्रज्ञानाने कितीही प्रगती केली, तरी हाताने तयार केलेल्या पोस्टर्सची जादू कायम राहिली. कारागिरांची शिगेला पोहोचलेली निखळ सर्जनशीलता ही यातील जमेची बाजू. मुक्त हस्ताने ते पोस्टर्सवर रंगांची उधळण करत. एकत्रित आकृतिबंध आणि संतुलित रचनेमुळे ही पोस्टर्स उठावदार दिसत.

### पोस्टर कलेचा बदलता तोंडावळा

जसजशी भारतीय चित्रपटांची प्रगती होत गेली, तशी पोस्टर्स तयार करण्याच्या शैलीत आणि वापरल्या जाणाऱ्या तंत्रांतही हळूहळू बदल होत गेले. १९५० आणि १९६० च्या दशकात भारतीय चित्रपट उद्योगाच्या सुवर्णकाळाची सुरुवात झाली, तेव्हा अनेकरंगी पोस्टर्सचे पेव फुटले. 'मुघल-ए-आझम' आणि 'मदर इंडिया' यांसारख्या चित्रपटांची भव्यता आणि व्याप्ती या चित्रपटांच्या पोस्टर्समध्ये दिसून आली. त्यामुळे ही पोस्टर्स या सिनेमांची लोकप्रियता शिगेला पोहोचवण्यासाठी पूरक ठरली. या पोस्टर्समध्ये चित्रपट कलाकारांच्या भव्य प्रतिमा वापरण्यात आल्या होत्या. कलाकारांना लार्जर दॅन लाईफ दाखवले गेले होते.

या काळात पोस्टर्समध्ये वास्तववाद आणि पोर्टेटचा भर असलेल्या 'क्लासिकल' कला प्रकारांचे वर्चस्व होते. सिनेमा क्षेत्रात उत्क्रांतीमुळे होत असलेले परिवर्तन पोस्टर तयार करण्याच्या कलेतही होत गेले.

सिनेमा जसजसा विकसित होत गेला तसतशी पोस्टर्सही विकसित होत गेली. १९७० आणि १९८० च्या दशकात त्यात अमूर्तता (abstraction), अति यथार्थवाद (surrealism) आणि कल्पनारम्यता (fantasy) अशा घटकांचा अंतर्भाव झाला. चित्रपट कलाकार चित्रपटांमध्ये अधिकाधिक नाट्यमय भूमिका साकारायला लागण्याचा तो काळ होता. ॲक्शन हिरो आणि खलनायक एकमेकांच्या विरोधात उभे ठाकायचे. या दोघांच्याही भव्य प्रतिमा असलेली पोस्टर्स लक्ष वेधून घ्यायला लागली.





'शोले' आणि 'दीवार'सारख्या सिनेमांची पोस्टर्स त्यामुळे आयकॉनिक ठरली. त्यात नायकांना आणि खलनायकांना 'लार्जर दॅन लाईफ' दाखवण्यात आले होते. चित्रपटातील नाट्यमयता आणि ॲक्शन या पोस्टर्सवर चपखल उतरलेली असते. याच कालावधीत पोस्टर्स अधिक शैलीदार झाली. पोस्टर्समध्ये बोल्ड, ब्लॉक लेटर्ड टाईल्सचा वापर वाढला. त्यासाठी अमूर्त पार्श्वभूमी असायची. त्यामुळे पोस्टर्समध्ये ज्या चित्रपटांची जाहिरात केलेली असे त्या चित्रपटांबद्दलचा प्रेक्षकांचा उत्साह वाढला. जाहिरातींमध्ये गतिमानता आली. पोस्टर्स अजूनही हाताने रंगवली जात असली, तरी या काळात अधिक अत्याधुनिक कलातंत्रांचा अवलंब केला गेला.

Mrgabharti 75000

त्यात कलर पॅलेटस् आणि वेगळ्या रचनांचे प्रयोग व्हायला लागले.

## संक्रमण

१९९० चे दशक पोस्टर्सच्या दुनियेला मोठी कलाटणी देणारे ठरले. डिजिटल तंत्रज्ञानाचे आगमन झाले आणि हाताने पोस्टर्स रंगवण्याची कला अस्तंगत व्हायला लागली. या पोस्टर्सची जागा डिजिटल पोस्टर्सने घेतली. ही पोस्टर्स अधिक झपाट्याने तयार होत आणि त्यात अधिक




अचूकता होती. डिजिटल डिझाइनमुळे पोस्टर्सची निर्मिती जलद गतीने होत असली आणि त्यांची व्याप्ती, पोहोच जागतिक पातळीपर्यंत वाढवणे शक्य झाले असले तरी या संक्रमणात, परिवर्तनात काहीतरी अपरिहार्यपणे हरवले, निसटून गेले.

हाताने काम करताना येणारा मानवी भावनिक स्पर्श, मानवी अपूर्णतेतही असलेले आगळे सौंदर्य, वेगवेगळ्या मानवी स्वभावामुळे पोस्टर्समध्ये नैसर्गिकरीत्या उतरलेली विविधता या नव्या डिजिटल पोस्टर्समध्ये दिसेनाशी झाली.

डिजिटल पोस्टर्स अधिक सुव्यवस्थितपणे तयार होतात. ती तयार करताना सौंदर्यशास्त्राचे सगळे नियम पाळलेले असतात. त्यांच्या वापराचे काही फायदेही आहेत. डिझाइनर्स आता नव्या तंत्रांनी प्रयोग करू शकतात. या तंत्रांना आता फोटोग्राफीबरोबरच संगणकनिर्मित प्रतिमांची (सीजीआय) जोड मिळते.

डिजिटल माध्यमांतून या पोस्टर्सचा झपाट्याने प्रसार होत असल्यामुळे ही पोस्टर्स अधिकाधिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचतात. त्यात भारतातील आणि परदेशी प्रेक्षकांचा समावेश असतो.

डिजिटल पोस्टर्समुळे या कलेच्या कक्षा रुंदावल्या आहेत. या बदलानंतरही एका उत्तम चित्रपट पोस्टरचे सार आजही अबाधित आहे. एका प्रतिमेत चित्रपटाचा आत्मा टिपण्याची पोस्टरची क्षमता आजही कायम आहे.

## पोस्टर कलेचे अज्ञात नायक

भारतीय फिल्म पोस्टर्सच्या इतिहासात पोस्टर्स तयार करणारे कलाकार कायमच अज्ञात राहिले आहेत. त्यातील अनेकांनी प्रतिकूल परिस्थितीत अथक मेहनत घेतली आहे. असे असूनही त्यांची फार दखल घेतल्याचे दिसत नाही. इतकेच कशाला, त्यांना मिळणारे उत्पन्नही तुटपुंजे आहे. तरीही त्यांनी चित्रपटसृष्टीसाठी दिलेले योगदान अनमोल आहे. पोस्टर्स तयार करणाऱ्या या कलाकारांच्या कहाण्या जगासमोर आणणे हा ‘पाऊलखुणा’ हे पुस्तक लिहिण्यामागचा आणि त्यासाठी संशोधन करण्यामागचा प्रमुख हेतू होता.


बाबुराव पेंटर, दिवाकर करकरे आणि इतरांनी भारतीय चित्रपटांच्या पोस्टर कलेवर आपला अमीट ठसा उमटवला आहे. बाबुराव पेंटर हे खऱ्या अर्थाने द्रष्टे होते. त्यांनी तयार केलेल्या पोस्टरवर ते स्वाक्षरी करत नसत, तरी त्यांनी तयार केलेले पोस्टर आहे हे समजायचे, कारण त्यावर त्यांची छाप पडलेली दिसत असे. ही पोस्टर्स फक्त जाहिरातींची साधने नसायची, तर ती भारतीय चित्रपटसृष्टीतील नाट्य, भावना आणि भव्यता व्यक्त करणारी दृश्य कथानके असायची.

अनेक दशके हाताने रंगवलेली पोस्टर्स हे सिनेमांच्या जाहिरातींसाठीचे प्राथमिक आणि दर्जेदार माध्यम होते. प्रभात फिल्म कंपनीचे जे. बी. दीक्षित यांच्यासारखे कलाकार घराघरात लीलया प्रसिद्ध झाले, ते त्याचमुळे.

त्यांच्या कामाने नवे पोस्टर युग तयार झाले. या पोस्टर्सकडे प्रेक्षकांच्या अनेक पिढ्या आकर्षित झाल्या. भारतीय चित्रपटांच्या दृश्य प्रतिमांना या कलाकारांनी नेमका आकार दिला. या कलाकारांना अनेक आव्हानांचा सामना करायला लागला; पण त्यांची कलेप्रति असलेली समर्पण भावना कधी लयाला गेली नाही. आपल्या चित्रपटप्रेमामुळेच त्यांनी अशी पोस्टर्स तयार केली की, ती आताच्या काळात आपला सांस्कृतिक कलाकृती वारसा म्हणून ओळखली जातात. त्या पोस्टर्समध्ये फक्त त्या-त्या चित्रपटाची जाहिरात नव्हती, तर त्या-त्या काळाचे प्रतिबिंबही त्यात उमटलेले दिसते.

## लोप पावत चाललेल्या कलेला नवसंजीवनी

हाताने रंगवलेल्या पोस्टर्सचे युग आता इतिहासजमा झाले असले, तरी अलीकडच्या काही वर्षांत या पोस्टर्सचा आस्वाद घेऊन





कलाकारांची प्रशंसा होताना दिसत आहे. पोस्टर्स संग्राहक, चित्रपटप्रेमी आणि समकालीन कलाकार अशा सगळ्यांवरच

पोस्टर्सने मोहिनी घातली आहे. त्यामुळे पोस्टर्सविषयीच्या स्मृतींना उजाळा दिला जात आहे.

हे लक्षात घेऊन माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने या कलेला नवसंजीवनी देण्यासाठी प्रशंसनीय पाऊल उचलले आहे. जागतिक दृक्श्राव्य आणि मनोरंजन शिखर परिषदेमध्ये (वेव्हज्) पोस्टर मेकिंग चॅलेंज या स्पर्धेच्या माध्यमातून या कलेला ऊर्जितावस्था देण्यात येणार आहे.

या स्पर्धेमुळे हाताने रंगवलेल्या पोस्टर्स कलेच्या वारशाचा केवळ सन्मान होणार नाही, तर पारंपरिक आणि डिजिटल दोन्ही स्वरूपातील पोस्टर्स तयार करता यावीत, यासाठी युवक कलाकारांना एक व्यासपीठ मिळणार आहे. त्यामुळे युवकांच्या प्रतिभेबरोबर नावीन्यपूर्णतेला प्रोत्साहन मिळणार आहे.

नव्या कलाकारांना पूर्वाश्रमीच्या पोस्टर्सची कल्पना यावी, यासाठी ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. भूतकाळ आणि वर्तमानकाळांचा सांधा जोडला जाऊन नव्या जुन्या कलांमध्ये एक सेतू बांधला जाणे हा या स्पर्धेमागचा हेतू आहे. कालानुरूप या कलेत बदल होत असले तरी आजच्या काळातही या कलेचे महत्त्व टिकून राहिलेले आहे. या स्पर्धेत आंतरराष्ट्रीय कलाकारांना सहभागी होता येणार आहे. ही स्पर्धा फक्त भारतीय सिनेमांचा कलात्मक वारसा जतन करणार नाही, तर पोस्टर्सविषयीच्या जागतिक संवादाला या स्पर्धेच्या निमित्ताने चालना मिळणार आहे.




भारतीय सिनेमाच्या सांस्कृतिक वारशाचे संवर्धन करण्याबरोबरच भावी पिढ्यांना फिल्म पोस्टर्स कलेकडे वळण्याची प्रेरणा मिळावी, यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा आहे. हाताने पोस्टर रंगवण्याची, डिझाईन शिकण्याची इच्छा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी अलीकडेच झालेल्या एका कार्यशाळेत मी मार्गदर्शन केले. पुण्याच्या एफटीआयआय अर्थात फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाने आयोजित केलेल्या या कार्यशाळेला मोठा प्रतिसाद मिळाला. या कार्यशाळेत मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी झाले होते. हाताने रंगवलेल्या पोस्टर्सची संकल्पना साकारताना कोणते बारकावे टिपले पाहिजेत, हे समजून घेण्यास उत्सुक असलेल्या या विद्यार्थ्यांचा उत्साह ओसंडून वाहत होता.




कलाकारांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी; तसेच पोस्टर्सच्या कालातीत कलेला संजीवनी देण्यासाठी सरकार करत असलेले प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहेत. अशा उपक्रमांमुळे भारतीय चित्रपट पोस्टर्सची परंपरा जपता येते. त्यामुळे कलाकार, चित्रपट निर्माते आणि प्रेक्षकांना या कलेकडे आकर्षित करता येते आणि ही कला जोपासण्यासाठी प्रोत्साहनही मिळते.

भारतीय चित्रपट पोस्टर्स या फक्त दृश्य स्वरूपातल्या जाहिराती नसून देशाच्या चित्रपट आणि कला वारशाचा तो एक मोठा आणि महत्त्वाचा भाग आहे. हाताने रंगवलेल्या उत्कृष्ट पोस्टर कलाकृतींपासून ते आजच्या आधुनिक डिजिटल डिझाइनपर्यंत या पोस्टर्सनी भारतीय चित्रपटांना ओळख मिळवून देण्यात अविभाज्य भूमिका बजावली आहे.

वेव्हज् पोस्टर मेकिंग चॅलेंज ही स्पर्धा हा त्या समृद्ध वारशाचा सन्मान आहे. त्या निमित्ताने भारतातील फिल्म पोस्टर कलेच्या भविष्यातील वाटचालीचा मार्ग सुकर व्हावा, यासाठी एक उत्साहवर्धक संधी उपलब्ध झाली आहे.


**(लेखक हे भारतीय चित्रपटसृष्टीतील एक प्रसिद्ध लेखक आणि ज्येष्ठ कलाकार आहेत. हाताने रंगवलेली चित्रपट पोस्टर्स तयार करण्यात त्यांचा हातखंडा असून या कौशल्यासाठीच ते ओळखले जातात. त्यांनी भारतीय चित्रपटांच्या दृश्य संस्कृतीत महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. हाताने रंगवलेल्या पोस्टर्सचा इतिहास सांगणारे त्यांचे 'पाऊलखुणा' हे पुस्तक प्रकाशित झाले आहे.)**

Mrgabharti 75000

**महाराष्ट्रातील प्रशासकीय अधिकारी-कर्मचारी यांच्या कौशल्य विकासासाठी प्रशिक्षण संस्कृती निर्माण करण्याच्या उद्देशाने राज्य शासनातर्फे 'टेक वारी : महाराष्ट्र टेक लर्निंग विक' ५ ते ९ मे दरम्यान आयोजित केला आहे त्या निमित्ताने...**

# प्रशासनाची टेक वारी!

**संध्या गरवारे**

बदल हा निसर्गाचा नियम आहे. त्यामुळे कोणत्याही क्षेत्रात काळानुरूप बदल स्वीकारत काम करणे आवश्यक असते. प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी यांना आपल्या प्रशासकीय कामामध्ये कुशलता वाढवून आपल्या कामांची गुणवत्ता वाढवणे, समाजाप्रति आपले उत्तरदायित्व जोपासणे, कमी कालावधीत अधिक अचूक काम करणे व ते लोकाभिमुख असणे ही आजच्या काळाची गरज आहे.

काळानुरूप तंत्रज्ञानात आणि आपल्या सभोवतालच्या परिस्थितीत झपाट्याने बदल होत आहेत. तसेच काम करत असताना येणाऱ्या ताण-तणावाचे व्यवस्थापन या बाबींचे मार्गदर्शन मिळत राहणे गरजेचे आहे, यातून तणावरहित कार्यपद्धती आत्मसात करणे शक्य होते. त्यातून कामाप्रति असलेली बांधिलकी जपली जाते आणि लोकसेवेच्या व्यापक भावनेतून प्रशासकीय कामकाजात अधिक गुणवत्ता वाढवण्यासाठी शासन वेळोवेळी अनेक उपक्रम राबवत असते.

**अपर मुख्य सचिव, व्ही. राधा**

महाराष्ट्रातील प्रशासकीय अधिकारी-कर्मचारी यांच्या कौशल्यविकासाच्या अनुषंगाने प्रशिक्षण संस्कृती निर्माण करण्यासाठी राज्य शासनातर्फे 'टेक वारी : महाराष्ट्र टेक लर्निंग विक' ५ ते ९ मे दरम्यान आयोजित केला आहे. या पाच दिवसांच्या कार्यक्रमात प्रदर्शन तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), ब्लॉकचेन, इंटरनेट ऑफ थिंग्ज (IoT), सायबर सुरक्षा अशा तंत्रज्ञान विषयांवर तज्ज्ञांचे सत्र, कार्यशाळा व विचारमंथनाच्या माध्यमातून शासकीय कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचा उद्देश फक्त तंत्रज्ञानाचे ज्ञान




देणे नसून, मानसिक व शारीरिक आरोग्य संवर्धन, तणाव व्यवस्थापन आणि सकारात्मक दृष्टिकोन विकसित करणे हाही आहे. 'फूड दॅट हिल्स' या उपक्रमांतर्गत पौष्टिक व पारंपरिक पाककृतींचे दररोज मेनू तयार केले जातील. तसेच विविध क्षेत्रातील २४ स्टार्टअप्सचे सादरीकरण होणार असून निवड झालेल्या कल्पनांना १५ लाखांची मदत दिली जाईल.

## राज्य शासनाकडून 'टेक वारी'

'महाराष्ट्र टेक लर्निंग विक' हादेखील आयोजित केला आहे. टेक वारी म्हणजे काय तर (TECH-WARI) म्हणजे (Wisdom through wellness and Work-life Balance) निरोगीपणा आणि जीवनातील कामकाज संतुलन,(Awareness of Emerging technologies) उदयोन्मुख तंत्रज्ञानाची माहिती व जनजागृती, (Reform in Governance Practices) प्रशासनाच्या कामकाजात अधिक गतिमानता आणणे,(Informed and Inclusive Workforce) जाणकार आणि समावेशक कुशल अधिकारी व कर्मचारी यासाठी प्रयत्न करणे, या कार्यक्रमाला टेक वारी असे नाव देण्यात आले आहे.

केंद्र शासनाच्या iGOT (Integrated Government Online Training) प्रणालीवर विविध क्षेत्रांतील प्रशिक्षणे उपलब्ध आहेत. हे प्रशिक्षण मिशन कर्मयोगी अंतर्गत विकसित केलेले आहे, जे सरकारी कर्मचाऱ्यांच्या क्षमता वाढवण्यासाठी आहे.

iGOT मध्ये वेगवेगळ्या विषयांवर आधारित ऑनलाइन प्रशिक्षण मॉड्यूल्स उपलब्ध आहेत. iGOT चे प्रशिक्षण घेऊन सरकारी कर्मचारी त्यांच्या कामात सतत सुधारणा करू शकतात. iGOT मध्ये प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर प्रमाणपत्र दिले जाते, जे सरकारी कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकाला जोडले जाणार आहे. शासनाच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाच्या iGOT प्रणालीवर तीन महिन्यांत राज्यात नऊ हजारांवरून पाच लाख कर्मचाऱ्यांची नोंदणी केली आहे. iGOT प्लॅटफॉर्मवर महाराष्ट्र देशात दुसऱ्या क्रमांकावर आहे.

टेक वारी असेल अथवा iGOT प्रणाली; शासनातील अधिकारी व कर्मचारी यांना आपल्या व्यस्त दिनचर्येतून स्वयंविकासासाठी असलेले हे व्यासपीठ शासनातील अधिकारी व कर्मचारी यांचा वैयक्तिक विकास करेलच, सोबतच त्यांच्याकडून देण्यात येणाऱ्या विविध नागरी सेवा अधिक लोकाभिमुख होतील. महाराष्ट्र शासनाच्या वेगवेगळ्या आस्थापनातील अधिकारी आणि कर्मचारी यांनी iGOT वर जरूर प्रशिक्षण घ्यावेच, सोबत टेक वारीतही सक्रिय सहभाग नोंदवून राज्याच्या गतिमान प्रशासनाला अधिक गतिमान करतील, अशी आशा नक्कीच व्यक्त करण्यास हरकत नाही.

**(विभागीय संपर्क अधिकारी)**

Mrgabharti 75000


**पृथ्वी ही शेषनागाच्या डोक्यावर नाही, तर ती कामगारांच्या तळहातावर आहे. राज्यातील कामगार जर आनंदी आणि सुखी राहिला, तर त्या देशाची प्रगती आणि विकास नक्की आहे. कामगार ज्यामध्ये संघटित आणि असंघटित अशी विभागणी आहे, हे दोन्ही घटक आपली खूप मोठी भूमिका बजावत आहेत. याच धर्तीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील कामगार हितासाठी महत्त्वाचे निर्णय घेण्यात येत आहेत. कामगारांच्या प्रश्नांकडे लक्ष देऊन त्यांच्या धोरणात्मक सुधारणांकडे जास्त लक्ष पुरविले जाणार आहे.**

# कामगार हिताचे संरक्षण

**ॲड. आकाश फुंडकर,** कामगार मंत्री

माथाडी, हमाल, असंघटित कामगार, बॉयलर क्षेत्र, डिजीलॉकर सुविधा, ऑनलाइन नोंदणी आणि आरोग्य सेवा असे कामगार हित जोपासण्याचे निर्णय घेऊन त्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी आमचा विभाग सदैव प्रयत्नशील असणार आहे.

## कामगारांना निवृत्तीवेतन



मागील अर्थसंकल्पीय अधिवेशनात कामगारांना निवृत्तीवेतन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाकडे नोंदणीकृत असलेल्या आणि वयाची ६० वर्षे पूर्ण केलेल्या बांधकाम कामगारांना दरवर्षी रुपये १२,०००/- इतके निवृत्तीवेतन देण्यात येणार आहे.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण अंतर्गत १८ ते ६० वर्षे वयोगटातील बांधकाम कामगार नोंदणी करू शकतात व कामगारविषयक विविध योजनांचा लाभ घेऊ शकतात. मात्र ६० वर्षांनंतर त्यांची नोंदणी होऊ शकत नाही व कोणत्याही योजनेचा लाभ मिळत नाही. म्हणून निवृत्तीवेतन योजनेची अंमलबजावणी करण्याचा निर्णय आपल्या शासनाने घेतला. यात १० वर्षे नोंदणी पूर्ण झालेल्या कामगारांना वार्षिक रुपये सहा हजार (५०%); १५ वर्षे नोंदणी पूर्ण झालेल्या कामगारांना वार्षिक रुपये नऊ हजार (७५%) आणि २० वर्षे किंवा अधिक नोंदणी पूर्ण झालेल्या कामगारांना वार्षिक रुपये १२,०००/- (१००%) असे लाभ देण्यात येणार आहे. हा लाभ ५८ लाख नोंदणीकृत बांधकाम कामगार आणि त्यांचे कुटुंबीय; तसेच भविष्यात नोंदणी होणारे बांधकाम कामगार लाभार्थींना होईल.

## माथाडी कामगार

राज्यात ३६ माथाडी मंडळ कार्यरत असून त्यांच्यामार्फत नोंदणीकृत



Mrgabharti_75000

कामगारांना विविध योजना व सुविधा दिल्या जात आहेत. आता या मंडळांची पुनर्रचना करण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्या मंडळाचा कार्यकाल ३ ऐवजी ५ वर्षे करण्यात आला आहे. यात काही आणखी सुधारणा करण्याचा मानस आहे.



राज्यातील कामगार हा राज्याच्या विकासाचा केंद्रबिंदू मानून त्यांच्या न्याय्य हक्कासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. देशात पहिल्यांदाच १९६५ मध्ये माथाडी, हमाल आणि श्रमजीवी कामगारांसाठी कायदा महाराष्ट्रात अस्तित्वात आला. या मागचा उद्देश असंघटित कामगारांना सामाजिक आणि आर्थिक सुरक्षा देण्याचा होता; पण आता माथाडी कामगारसंदर्भात बदल करण्याची आवश्यकता निर्माण झाली असून त्या दृष्टीने विभागाची वाटचाल सुरू आहे. माथाडी कामगार हा उद्योजक आणि व्यापारी वर्गासाठी एक महत्त्वाचा वर्ग असल्याने सर्व माथाडींचे ऑडिट करण्यात येणार आहे.

## ऑनलाइन नोंदणी

महाराष्ट्रातील बांधकाम कामगारांना त्यांची नोंदणी ऑनलाइन पद्धतीने कोठूनही करता येते. तथापि या नोंदणीसाठी त्यांची मूळ कागदपत्रे पडताळणी, फोटो आणि बायोमेट्रिककरिता प्रत्येक नोंदणीकृत बांधकाम कामगारांनी त्यांच्या सोईच्या तारखेला, जिल्हा किंवा तालुका सुविधा केंद्रावरच जाऊन करावी. यासाठी राज्यात ३६६ तालुका सुविधा केंद्रे निर्माण करण्यात आली आहे. ही सुविधा राज्यातील सर्व बांधकाम कामगारांना ५ फेब्रुवारी २०२५ पासून सुरू करण्यात आली आहे.

बांधकाम कामगारांच्या नोंदणी, नूतनीकरण आणि लाभ वाटपाकरिता एकात्मिक कल्याणकारी मंडळ संगणकीय प्रणाली (IWBMS) ही ऑनलाइन प्रणाली आहे. जिल्हा स्तरावर जिल्हा इमारत कामगार सुविधा केंद्राद्वारे यापूर्वी हे काम होत होते. केंद्र शासनाच्या अधिसूचनेद्वारे राज्य शासनाने आता ३६६ तालुका सुविधा केंद्रे निर्माण केली असून प्रत्येक तालुका सुविधा केंद्रावर प्रतिदिन १५० अर्ज हाताळण्यात येत आहेत.

## डिजिटल बॉयलर

राज्यातील बॉयलर उद्योग हा देशातील आघाडीचा उद्योग असून त्यासाठी स्वतंत्र पोर्टल तयार करण्यात आले आहे. या पोर्टलमुळे उत्पादकांना परवाने, परीक्षण आणि नोंदणीसाठी कार्यालयात जाण्याची आवश्यकता नाही. वेळ व श्रम वाचवण्याच्या दृष्टिकोनातून ही सुविधा उपयुक्त ठरली आहे. बॉयलर प्रशिक्षण कोर्समधून उत्तीर्ण होणाऱ्या अभियंत्यांना डिजीलॉकरद्वारे डिजिटल प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे नोकरीच्या संधी अधिक सुलभ होणार असून बनावट प्रमाणपत्रांना आळा बसणार आहे.

## कर्मचारी राज्य विमा योजना (ESIS)

इएसआयएस योजना ही कामगारांसाठी आरोग्यदायी ठरत आहेत. प्रधानमंत्री आरोग्य योजनेच्या माध्यमातून देशातील ३० हजार रुग्णालयांमध्ये कामगारांवर उपचार करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे कामगारांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळणार आहे.

## गिग कामगार

असंघटित कामगारांसाठी विविध योजना सध्या अस्तित्वात आहेत, मात्र गेल्या काही वर्षांपासून गिग कामगारांची संख्यादेखील लक्षणीय वाढत आहे. त्यामुळे अशा गिग कामगारांसाठी जिल्हाधिकारी कार्यालय व कामगार विभागाने पुढाकार घेतला आहे. गेल्या काही वर्षांत ओला, उबेर, झोमॅटो, स्विगी अशी प्लॅटफॉर्म इकोनॉमी भारतात आणि जागतिक स्तरावर रोजगारनिर्मितीचे एक साधन बनले असून यात मोठ्या संख्येने गिग कामगार आहेत. त्यांना शासकीय योजनांच्या माध्यमातून सुरक्षित भविष्याच्या दृष्टीने लाभ मिळण्यासाठी शासनाचे प्रयत्न सुरू आहेत. भारत सरकारच्या कामगार आणि रोजगार मंत्रालयाने अशा गिग आणि प्लॅटफॉर्म कामगारांसाठी ई-श्रम पोर्टलवर नोंदणीसाठी सुविधा उपलब्ध करून दिली आहे. ई-श्रम पोर्टलवर नोंदणी केल्यास नोंदणीधारकास विविध सामाजिक सुरक्षा आणि कल्याणकारी योजनांचा लाभ मिळू शकणार आहे.

कामगारांच्या हिताच्या दृष्टीने त्यांना सुविधा उपलब्ध करून देण्यासोबतच त्यांचे संरक्षण, सुलभ प्रशासन आणि न्याय देण्यासाठी अनेक सकारात्मक निर्णय या शासनामार्फत घेण्यात येत आहेत. माथाडी कामगारांचा सन्मान, डिजीलॉकरद्वारे सुलभता, आरोग्य क्षेत्रातील सुधारणा आणि औद्योगिक वातावरणात कामगार हित साधणे आवश्यक आहे. अशा निर्णयांमुळे राज्यातील कामगार क्षेत्र अधिक सक्षम, पारदर्शक आणि न्यायपूर्ण होण्याची दिशा निश्चितच निर्माण होईल, असा विश्वास आहे.

**शब्दांकन : संजय डी. ओरके,**
विभागीय संपर्क अधिकारी

Mrgabharti 75000

**द्रोनच्या वापरावर सध्या देशात अनेक निर्बंध आहेत. त्या सर्वांचा विचार ड्रोन गस्तीच्या धोरणामध्ये करण्यात आला. यासाठी लागणाऱ्या आवश्यक परवानग्या घेण्यात आल्या आणि राज्याच्या ७२० किलोमीटर सागरी किनारपट्टीपैकी मुंबई वगळता सर्व सागरी किनारपट्टीवर ड्रोनच्या सहाय्याने गस्त घालण्यास सुरुवात करण्यात आली.**

# सागर किनाऱ्याच्या सुरक्षेसाठी चौथा डोळा!

**हेमंतकुमार चव्हाण**

सागरी सुरक्षा हा प्राचीन काळापासून राज्यकर्त्यांसाठी महत्त्वाचा विषय आहे. अगदी प्राचीन काळी सम्राट अशोकाच्या काळातही सागरी सुरक्षेसाठी उपाययोजना करण्यात आल्याचे दाखले सापडतात. आपल्या स्वराज्याला लाभलेल्या अथांग सागराच्या सुरक्षेचे महत्त्व लक्षात घेऊन स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांनी आरमाराची स्थापना केली. फक्त आरमाराची स्थापना करून छत्रपती थांबले नाहीत, तर या आरमारासाठी सुरक्षित स्थानांची उभारणीही करण्यात आली. मुख्य दुर्ग व त्याला जोडणारा कोट, पडकोट अशा प्रकारची रचना करून सागरी सुरक्षा वाढविण्यावर छत्रपती शिवाजी महाराजांनी भर दिला होता.



यानंतरच्या काळात सागरी सुरक्षेकडे म्हणावे तितके लक्ष दिले गेले नाही हे ही खरे.; पण स्वातंत्र्यानंतर सागरी सुरक्षेचे महत्त्व लक्षात घेऊन अनेक उपाययोजना करण्यात आल्या. त्यासाठी सागरी पोलीस दलाची निर्मिती करण्यात आली. तसेच नौदलाच्या मदतीने सागरी गस्ती नौकांच्या माध्यमातून सागर किनाऱ्यांवर पहारा ठेवण्यात येतो. याशिवाय अनेक उपाय शासनाकडून करण्यात येतात. देशात झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर सागरी सुरक्षेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला. त्यामुळे सागर किनारे अधिक सुरक्षित करण्याची मोहीम शासनाकडून राबवण्यात आली. त्यातच सागरी मार्गाने होणारी घुसखोरी रोखणे, अवैध मासेमारी रोखणे यासाठी सागरी किनाऱ्यांच्या सुरक्षेसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर सुरू करण्यात आला. जेटी, सागरी धक्के याठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले; पण या सीसीटीव्ही कॅमेरा म्हणजेच तिसऱ्या डोळ्याची नजर ही मर्यादित होती. त्यामुळे सागरी सुरक्षेसाठी ठोस उपाय करण्याचे नियोजन मत्स्य व्यवसाय मंत्री नितेश राणे यांच्या प्रयत्नातून सुरू झाले. या प्रयत्नांना यश येऊन सागरी किनाऱ्यांवर गस्तीसाठी ड्रोनच्या मदतीचा निर्णय घेण्यात आला.

सुरक्षेसाठी आज नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येतो. त्याचाच एक भाग म्हणून राज्याच्या सागरी सुरक्षेसाठी ड्रोनचा वापर करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे सागरी सुरक्षेच्या क्षेत्रात आमूलाग्र बदल होण्यास मदत होणार आहे. ड्रोनच्या वापरावर सध्या देशात अनेक निर्बंध आहेत. त्या सर्वांचा विचार ड्रोन गस्तीच्या धोरणामध्ये करण्यात आला. यासाठी लागणाऱ्या आवश्यक परवानग्या घेण्यात आल्या आणि राज्याच्या ७२० किलोमीटर सागरी किनारपट्टीपैकी मुंबई वगळता सर्व सागरी किनारपट्टीवर ड्रोनच्या साहाय्याने गस्त घालण्यास सुरुवात करण्यात आली.

अवैध मासेमारी रोखणे, एलईडी मासेमारीवर नियंत्रण, परराज्यातील मच्छीमारांची राज्याच्या मस्त्यक्षेत्रातील घुसखोरी रोखणे, यासह सागरी मार्गाने होणारी घुसखोरी रोखणे यासाठी ड्रोनच्या साहाय्याने गस्त घालण्याचा निर्णय

Mrgabharti_75000

मत्स्यव्यवसाय विभागाने घेतला. सागरी मासेमारी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे.

ड्रोनच्या वापरामुळे समुद्रामध्ये दूर अंतरापर्यंत गस्त घालणे आता शक्य झाले आहे. तसेच ड्रोनची गस्त प्रभावी करण्यासाठी बोटींवर त्यांचे क्रमांक ठळकपणे दिसतील अशा प्रकारे लावणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे परराज्यातील बोटींनी राज्याच्या मत्स्यक्षेत्रामध्ये घुसखोरी केल्यास त्यांना लक्ष्य करून ताब्यात घेण्याची प्रक्रिया तातडीने करणे शक्य झाले आहे. रात्रीच्या वेळीही ड्रोनची गस्त सुरू असल्यामुळे एलईडी मासेमारी करणाऱ्या नौकांवर कारवाई करणे शक्य होणार आहे. त्याशिवाय एखादी अनोळखी बोट राज्याच्या जलधीक्षेत्रात दिसल्यास त्याची माहिती तातडीने नियंत्रण कक्षास पोहचण्यास मदत होणार आहे.

यापूर्वी गस्ती नौकांच्या माध्यमातून समुद्रामध्ये गस्त घातली जात होती; पण गस्ती नौकांद्वारे गस्त घालत असताना प्रत्येक नौकेची तपासणी करण्यासाठी मर्यादा येत असत. तसेच अनधिकृत नौकांचा पाठलाग करताना अडचणी येत. अशावेळी गस्ती नौकेसह ड्रोनचा वापर केल्यास योग्य नियंत्रण राखता येते. तसेच महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन (सुधारणा) अधिनियम १९८१ (सुधारित २०२१) कायद्याची कठोर अंमलबजावणी शक्य होते. ड्रोनचा वेग जास्त असल्यामुळे एकाच वेळी मोठ्या सागरी क्षेत्रावर देखरेख ठेवणे सहज शक्य झाले आहे. ड्रोनच्या साहाय्याने मच्छीमारी नौकांचे मॅपिंग करून अनधिकृत मासेमारी नौकांची माहिती सुलभरीत्या विभागास प्राप्त होते. ड्रोनचा वापर हा सागरी पोलीस विभागाशी समन्वयाने वापरण्यात येत असल्यामुळे सागरी सुरक्षा बळकट होण्यास मदत होत आहे.

राज्याच्या सागरी क्षेत्रात प्रभावीपणे गस्त घालण्यासाठी १० वर्षांच्या कालावधीसाठी एकूण ९ ड्रोनची सेवा भाडेतत्त्वावर घेण्यात आली आहे. तसेच ड्रोन गस्तीच्या माध्यमातून घडलेल्या



गुन्ह्यांबाबत कार्यवाही करण्यासाठी मत्स्यव्यवसाय आयुक्तालय मुंबई येथे नियंत्रण कक्षाची स्थापनाही करण्यात आली आहे. या नियंत्रण कक्षाच्या माध्यमातून राज्यातील सात जिल्ह्यांमध्ये होणाऱ्या ड्रोन गस्तीवर देखरेख ठेवली जात आहे.



राज्यात सध्या ड्रोन आधारित देखरेख व डेटा मेन्टेनन्स यंत्र प्रणाली डहाणू व शिरगाव, (पालघर), उत्तन (ठाणे), रेवदंडा व श्रीवर्धन (रायगड), हर्णे बंदर, भाटे व साखरीनाटे (रत्नागिरी), देवगड (सिंधुदुर्ग) या नऊ ठिकाणांवरून वापरण्यात येत आहे.

ड्रोनद्वारे आतापर्यंत राज्यात एकूण १,१०४ कारवाईची प्रकरणे झाली आहेत. यामध्ये एकूण २ कोटी ८२ लाख ६ हजार इतका दंड वसूल करण्यात आला आहे. यामध्ये सर्वाधिक कारवाई उथळ पाण्यात मासेमारी करणाऱ्या ८०१ ट्रॉलर्सवर करण्यात आली आहे. त्यानंतर गिलनेट -१९८, पर्ससीन - ७७, आणि एलईडी २७ याप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे. त्यातही सर्वाधिक कारवाईची प्रकरणे रत्नागिरी जिल्हा ५९६ त्यानंतर रायगड जिल्ह्यात ३३०, पालघर - ९१, सिंधुदुर्ग - ६४, ठाणे - २३ या प्रमाणे करण्यात आली आहे.

आतापर्यंत सीसीटीव्हीच्या माध्यमातून जेटी व परिसरावर नियंत्रण ठेवण्यात येत होते; पण आता अगदी खोल समुद्रातही ड्रोनच्या साहाय्याने गस्त सुरू केल्यामुळे संपूर्ण सागरी क्षेत्र सुरक्षित होण्यास मदत होत आहे. याच्या जोडीला स्पीड बोटींचा वापर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अशा ३५ स्पीड बोट्स लवकरच सागरी सुरक्षा मंडळाच्या ताफ्यात दाखल होणार आहेत. सागरी सुरक्षेच्या दृष्टीने आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराने राज्याचा समुद्रकिनारा सुरक्षित करण्यासाठी मत्स्यव्यवसाय आणि बंदरे विभाग उत्कृष्ट कामगिरी करत असल्याचे दिसून येते.

**(विभागीय संपर्क अधिकारी)**

Mrgabharti 75000

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुढाकार घेतल्याने धानोरा तालुक्यातील मुरूमगाव, पेंढरी आणि रांगी या अतिदुर्गम गावांमध्ये राज्य परिवहन महामंडळाच्या बससेवा सुरू झाल्या. याचा सकारात्मक परिणाम नागरिकांच्या दैनंदिन जीवनमानावर होत असून ती त्यांच्यासाठी सौख्यदायी परिवर्तनाची बस ठरली आहे.**

# सकारात्मक परिवर्तनाची बस!

**गजानन जाधव**

गडचिरोली महाराष्ट्राचा एक दुर्गम, नक्षलग्रस्त आणि अनेक वर्षे विकासापासून दूर राहिलेला जिल्हा. सार्वजनिक परिवहन सेवेची कमतरता ही येथील प्रमुख अडचण होती. त्याचा परिणाम शिक्षण-सुविधा व आरोग्यसेवेवरही होत होता. याची दखल घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने धानोरा तालुक्यातील मुरूमगाव, पेंढरी आणि रांगी या अतिदुर्गम गावांमध्ये राज्य परिवहन महामंडळाच्या बससेवा सुरू झाल्या. याचा थेट परिणाम नागरिकांच्या दैनंदिन जीवनमानावर होत असून ती त्यांच्यासाठी सौख्यदायी परिवर्तन घडवणारी बस ठरली आहे.

## विकासाची बस, आनंदाचा प्रवास...

धानोरा तालुक्यातील ही गावे खऱ्या अर्थाने दुर्गम भागात मोडतात. या गावांत यापूर्वी नियमित सार्वजनिक परिवहन सेवेच्या अभावामुळे नागरिकांना तालुक्याच्या ठिकाणी पोहोचण्यासाठी खासगी वाहने, अथवा कधी-कधी पायी प्रवास करावा लागत असे. याचा परिणाम आरोग्य, शिक्षण आणि रोजगाराच्या संधींवर मोठ्या प्रमाणावर होत होता. मात्र या बससेवेमुळे येथील दुर्गम भागात आरोग्य सुविधा सुलभ झाल्या. पूर्वी रुग्णांना दवाखान्यात पोहोचण्यासाठी खूप वेळ लागायचा. आता बससेवेमुळे वेळेत उपचार घेणे शक्य झाले आहे. महिला व वृद्ध रुग्णांना यामुळे चांगली सुविधा मिळाली आहे. अनेक विद्यार्थ्यांना शाळा व कॉलेजसाठी कठीण जाणारे अंतर नियमित बससेवेमुळे पार करणे सोपे झाले आहे. याचा परिणाम मुलांची शाळेत उपस्थिती वाढली असून, येथील विद्यार्थ्यांच्या शिक्षणात सातत्य निर्माण झाले आहे.

स्थानिक शेतकरी, हातमजूर व लघु उद्योजक यांना आता जवळच्या बाजारात आपल्या वस्तू विक्रीसाठी सहज नेणे शक्य झाले असून स्वयंरोजगाराच्या संधी वाढल्या आहेत. बससेवेमुळे नागरिकांची शासकीय योजना, सेवा व कार्यालयांपर्यंत पोहोच



Mrgabharti_75000




सहज होऊन त्यांची प्रशासकीय यंत्रणेशी जोडणी झाली आहे. गावातील महिला, वयोवृद्ध आणि आदिवासी नागरिकांना सुरक्षित व परवडणारी वाहतूक उपलब्ध झाली आहे.

## दुर्गमतेपासून मुख्य प्रवाहात

गडचिरोली जिल्ह्याच्या धानोरा तालुक्यातील मुरूमगाव, पेंढरी आणि रांगी ही गावे छत्तीसगड सीमेलगत आहेत आणि अनेक वर्षे मुख्य प्रवाहापासून दूर होती. मात्र आता, राज्य परिवहन महामंडळाच्या या बससेवा केवळ दळणवळणाचे साधन नाहीत, तर त्या या भागांना मुख्य प्रवाहाशी जोडणारी एक महत्त्वाचा दुवा बनली आहे. या दुर्गम भागांना मुख्य प्रवाहाशी जोडल्याने येथील नागरिकांचा सामाजिक सुसंवाद वाढला आहे.

## मुख्यमंत्र्यांचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व

नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते जिल्ह्यात अहेरी-गर्देवाडा ही बससेवा सुरू करण्यात आली होती. नक्षलप्रभावित या भागात स्वातंत्र्यानंतरच्या इतक्या वर्षांत पहिल्यांदाच बस धावली. मुख्यमंत्री यांनी केवळ यंत्रणात्मक निर्णय न घेता, स्वतः बसने प्रवास करून या भागातील परिस्थितीचा आढावा घेतला. त्यानंतर आता पुन्हा तातडीने निर्णय घेत जिल्ह्यातील दुर्गम भागात बसफेऱ्या सुरू केल्या. गडचिरोली जिल्ह्यातील त्यांच्या विकासकामांमुळे त्यांच्या या संवेदनशीलतेची पावती म्हणून, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीदेखील त्यांच्या कामाचे कौतुक केले आहे.

येथील नागरिकांसाठी ही बस केवळ एक वाहतूक सेवा नाही, तर दुर्गम भागातील जनतेच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवणारे माध्यम ठरले आहे. ही बससेवा विकासाचा प्रवास, संवेदनशील प्रशासनाचा सहभाग आणि सामाजिक न्यायाचा नवा मार्ग ठरत आहे.

**(जिल्हा माहिती अधिकारी, गडचिरोली)**



Mrgabharti 75000

**मंत्रभूमी, तपोभूमी, देवभूमी, यंत्रभूमी अशी ओळख असणारा नाशिक जिल्हा आध्यात्मिक आणि सांस्कृतिक पर्यटनाचे केंद्र बनला आहे. प्रभू रामचंद्रांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या भूमीत दर १२ वर्षांनी होणारा सिंहस्थ कुंभमेळा हा अध्यात्माचा भव्य दिव्य सोहळा असतो. या सोहळ्याची पर्वणी साधण्यासाठी देशभरातून लाखो भाविक नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे येतात. येणाऱ्या भाविकांच्या प्रमाणात आवश्यक सुविधांचा विकास करणे हे शासन-प्रशासनासमोर मोठे आव्हान असते.**

# सिंहस्थ कुंभमेळा विकासाची पर्वणी!

**गोपाळ साळुंखे**

नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे २०१५ मध्ये आयोजित सिंहस्थ कुंभमेळा साधू-संतांचे सहकार्य, तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे समर्थ नेतृत्व, प्रशासनाचे सुनियोजित प्रयत्न यामुळे यशस्वी ठरला. सुरक्षित, हरित आणि स्वच्छ-सुंदर सोहळा म्हणून हा कुंभमेळा स्मरणात राहिला.

यंदा २०२७ मध्ये नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे सिंहस्थ कुंभमेळा होणार आहे. प्रयागराज येथील कुंभमेळ्याला उपस्थित भाविकांची संख्या लक्षात घेता यंदाचा कुंभमेळा धार्मिक आणि सांस्कृतिक पर्वणीसोबत पर्यटनाची तसेच नाशिक -त्र्यंबकेश्वरच्या विकासाची पर्वणी ठरावा यासाठी शासन आणि प्रशासनाने तयारी सुरू केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा नुकताच झालेला त्र्यंबकेश्वर आणि नाशिकचा दौरा या पूर्वतयारीला गती देणारा ठरला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्री त्र्यंबकेश्वराचे दर्शन घेऊन दौऱ्याची सुरुवात केली. गौतमी ऋषींची तपोभूमी असलेल्या त्र्यंबकेश्वर येथून प्रवाहित होणारी गोदावरी नदी त्यांच्याच तपश्चर्येमुळे भूतलावर अवतरली अशी कथा आहे. या भूमीत साधू-संतांचा सतत वास असतो. त्र्यंबकेश्वर येथील कुशावर्तात सिंहस्थादरम्यान पर्वणीतील शाही स्नान होत असते. मुख्यमंत्र्यांनी कुशावर्त परिसराला भेट देऊन येथील परिसर विकासासंदर्भात लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांशी चर्चा केली. हा परिसर देशभरातील भाविकांसाठी प्रमुख आकर्षण ठरावा, यादृष्टीने परिसराचे सुशोभीकरण करण्याचा मनोदयही त्यांनी बोलून दाखवला.

सिंहस्थ कुंभमेळ्याचे संचालन साधू-महंत करत असतात. या धार्मिक सोहळ्याच्या आयोजनात त्यांच्या शासनाकडून असलेल्या अपेक्षा जाणून घेण्यासाठी आणि त्यांचे मार्गदर्शन घेण्यासाठी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी त्र्यंबकनगरीत साधू-महंतांशी संवाद साधला. कुंभमेळ्यातील पावित्र्य राखले जाईल आणि शासनातर्फे सर्व सुविधा पुरवण्यात येतील, याबाबत त्यांनी साधू-महंतांना आश्वस्त केले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी नाशिक येथे लोकप्रतिनिधी आणि वरिष्ठ अधिकारी यांच्यासमवेत श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर विकासाबाबत आढावा घेतला. श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर विकासाच्या १,१०० कोटी रुपयांच्या आराखड्यास उच्चाधिकार समिती आणि मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या माध्यमातून मंजुरी देण्यात येणार असल्याची घोषणा त्यांनी केली. त्र्यंबकेश्वरचे आध्यात्मिक व पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्व लक्षात घेऊन आराखड्यात विविध विकासकामे प्रस्तावित करण्यात आली असल्याने या तीर्थक्षेत्राच्या विकासाला खऱ्या अर्थाने चालना मिळणार आहे.

कुंभमेळ्यातील कामे कालबद्ध रितीने पूर्ण करणे, सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचे प्रभावी नियोजन आणि त्यासाठी विद्युत वाहनांचा उपयोग, स्थानिक नागरिकांना त्रास न होऊ देणे, घनकचरा व्यवस्थापन आणि स्वच्छतागृहाच्या व्यवस्थेबाबतही त्यांनी उपयुक्त सूचना केल्या. सर्वात महत्त्वाचे म्हणजे सुरक्षित आणि सुनियोजित कुंभमेळ्याच्या दृष्टीने प्रयागराज येथील कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर कुंभमेळा



Mrgabharti 75000

प्राधिकरणाचा कायदा लवकरच करण्याचे सूतोवाच त्यांनी केले. यामुळे कुंभामेळ्यासंबंधी कामांना कायदेशीर चौकट प्राप्त होऊन गर्दीचे योग्य व्यवस्थापन करणे शक्य होणार आहे.

नाशिकची वाटचाल उद्योगनगरीच्या दिशेने होत आहे. जिल्ह्याच्या आणि राज्याच्या अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी कुंभमेळा ही एक उत्तम संधी आहे. त्या अनुषंगाने उपाययोजना करण्याचे निर्देश मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिले. यासाठी आवश्यक पायाभूत सुविधांच्या विकासावरही दौऱ्यादरम्यान चर्चा करण्यात आली.

देशाच्या अर्थव्यवस्थेची वाटचाल पाच ट्रिलियन डॉलरकडे सुरू असताना यात महाराष्ट्राचा वाटा किमान एक ट्रिलियन डॉलर असावा, हे उद्दिष्ट समोर ठेवून मुख्यमंत्री श्री. फडणवीस हे सातत्याने प्रयत्न करत आहेत. त्यासाठी नवे तंत्रज्ञान, नव्या संकल्पना, कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग, नवोन्मेष, पर्यटन विकास आदी विविध महत्त्वाच्या क्षेत्रांविषयी त्यांच्या दूरदृष्टीची प्रचिती सीआयआय यंग इंडियन्सच्या नाशिक शाखेतर्फे आयोजित पश्चिम क्षेत्र परिषदेत समारोप सत्रात झालेल्या त्यांच्या मुलाखतीतून आली.

युवकांच्या सकारात्मक ऊर्जेचा आणि नवकल्पनांचा उपयोग सिंहस्थाच्या भव्य आयोजनात व्हावा आणि यात योगदान देण्यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळावे,




यादृष्टीने यंदाचा कुंभमेळा हा अध्यात्म आणि तंत्रज्ञानाचा संगम असणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. नावीन्यपूर्ण संकल्पना, उद्यमशीलता यांचा उपयोग कुंभमेळ्यात करण्यासाठी युवा वर्गाने प्रशासन आणि शासनाला सहकार्य करण्यासाठी पुढे येण्याचे आवाहन त्यांनी केले.

दौऱ्याच्या माध्यमातून मुख्यमंत्र्यांचे विकासाचे व्हीजनही प्रतिबिंबित झाले. नाशिकच्या कृषी आधारित उद्योगाची प्रगती, सेंटर ऑफ एक्सलन्स, दळणवळण सुविधांचा वेगाने विकास, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील क्रांती, नाशिक येथून वाढवणसाठी ग्रीनफिल्ड रोड, नाशिकमधील डिफेन्स इकोसिस्टिम, एआयचा विविध क्षेत्रांत उपयोग, पायाभूत सुविधांचा विकास आदी



विषयांच्या माध्यमातून त्यांनी भविष्यातील रोडमॅप सादर केला.

'महाराष्ट्र मॉडेल ऑफ गव्हर्नन्स' आहे हे श्री. फडणवीस यांच्या मुलाखतीतील वाक्य येणारा कुंभमेळा सुनियोजित आणि तेवढाच स्मरणीय होईल, हा विश्वास निर्माण करणारे आहे. याच 'गव्हर्नन्स'चे नेतृत्व तेवढ्याच समर्थपणे सांभाळताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोहळ्याच्या नियोजनाची केलेली सुरुवात नाशिक-त्र्यंबकेश्वरच्या नागरिकांसाठी आश्वासक आणि तेवढीच उत्साहवर्धक ठरली. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पूर्वतयारीला मिळालेली चालना आणि दिशा हे या दौऱ्याचे फलित आहे.

यंदाचा सिंहस्थ कुंभमेळा गतवेळेपेक्षा अधिक भव्य दिव्य आणि सुविधांनी युक्त असणार याचे संकेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नाशिक-त्र्यंबकेश्वर दौऱ्यातून मिळाले. या दौऱ्यात राज्याचे जलसंपदा (विदर्भ, तापी, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्यासह, लोकप्रतिनिधी, नाशिक विभागाचे आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी जलज शर्मा, महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी मुख्यमंत्री महोदयांसमवेत होते.

**(जिल्हा माहिती अधिकारी, नाशिक)**

Mrgabharti 75000

**शबरी नॅचरल्सने आदिवासी संस्कृतीचा समृद्ध वारसा आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने जतन करत ई-कॉमर्सच्या व्यासपीठावर आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. आदिवासी विकास विभागांतर्गत कार्यरत असलेल्या शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाने 'शबरी नॅचरल्स'च्या माध्यमातून आदिवासी बांधवांनी पारंपरिक पद्धतीने तयार केलेल्या उत्पादनांना नव्या बाजारपेठेचे प्रवेशद्वार खुले झाले आहे.**

# शबरी नॅचरल्सः आदिवासी संस्कृतीचा ई-प्रवास

**लीना बनसोड,** (भा.प्र.से.), आयुक्त, आदिवासी विकास विभाग, व्यवस्थापकीय संचालक, आदिवासी विकास महामंडळ

राज्याच्या एकूण लोकसंख्येपैकी ९.३५ टक्के लोकसंख्या आदिवासी आहे. या समुदायाला मुख्य प्रवाहात आणणे आणि त्यांचे जीवनमान उंचावणे, हे शबरी महामंडळाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. यासाठी महामंडळ नाममात्र व्याजदराने वित्तपुरवठा करते. केवळ आर्थिक साहाय्य पुरवण्यापलीकडे जाऊन आदिवासी बांधवांनी तयार केलेल्या उत्पादनांना जागतिक बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी महामंडळ प्रयत्नशील आहे. सध्या आदिवासी बांधवांच्या १७६ शेतकरी उत्पादक कंपन्या या उपक्रमाचा भाग असून, भविष्यात सर्व उत्पादने 'शबरी नॅचरल्स' या ब्रँडखाली आणण्याचा मानस आहे.



## आर्थिक व सामाजिक सक्षमीकरण

'शबरी नॅचरल्स' उपक्रमातून मोहाच्या फुलांपासून बनवलेली मोहाची - द हेरिटेज वाईन, सिरप, तेल, साबण, मॉइश्चरायझर, लाडू, मध, कुकीज यासह २१ दर्जेदार उत्पादने तयार करून आदिवासी समुदायाच्या आर्थिक आणि सामाजिक सक्षमीकरणासाठी क्रांतिकारी पाऊल उचलले आहे.

## शबरी नॅचरल्स : उत्पादनांची वैविध्यता

मोहाचे झाड आदिवासी बांधवांसाठी कल्पवृक्षासमान आहे. या झाडाच्या फुलांपासून आणि बियांपासून विविध उत्पादने तयार केली जातात. मोहाच्या झाडावर आधारित विविध उत्पादनांची खास श्रेणी शबरी नॅचरल्सने विकसित केली आहे.

**मोहाची - द हेरिटेज वाईन :** पारंपरिक पद्धतीने बनवलेली ही वाईन ग्राहकांमध्ये विशेष लोकप्रिय आहे.

**मोहाचे सिरप आणि तेल :** नैसर्गिक आणि आरोग्यदायी पर्याय म्हणून याला बाजारात मागणी आहे.

**सौंदर्य प्रसाधने :** मोहाच्या तेलापासून बनवलेले साबण आणि मॉइश्चरायझर यांना ग्राहकांची पसंती मिळत आहे.

**खाद्यपदार्थ :** मोहाच्या फुलांपासून बनवलेले लाडू, कुकीज आणि जंगली मध यांना विशेष चव आणि गुणवत्तेमुळे मागणी आहे. **इतर उत्पादने :** बांबूपासून बनवलेली प्रकाशमाळ, शेतातील तांदूळ, ज्वारी-नागलीपासून बनवलेले लाडू यांसारखी उत्पादने आदिवासी संस्कृतीची ओळख असलेली उत्पादने बाजारात येत आहेत.

## ई-कॉमर्स आणि जागतिक बाजारपेठ

शबरी महामंडळाने 'ई-कॉमर्स' संकल्पनेचा प्रभावी वापर करून ही उत्पादने ऑनलाइन विक्रीसाठी उपलब्ध केली आहेत. भारतीय पोस्ट सेवेच्या साहाय्याने देश-विदेशातील ग्राहकांपर्यंत ही उत्पादने पोहोचवली जातात. लवकरच ॲमेझॉन, फ्लिपकार्टसारख्या जागतिक व्यासपीठांवर 'शबरी ब्रँड' उपलब्ध होणार आहे. या हायटेक प्रवासामुळे आदिवासी उत्पादनांना जागतिक बाजारपेठेत मानाचे स्थान मिळेल आणि आदिवासी बांधवांचे आर्थिक सक्षमीकरण होईल.

Shabarinaturals.com या ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मचे उद्घाटन राज्याचे आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ. अशोक वुईके यांच्या



Mrgabharti_75000



हस्ते नुकतेच मुंबईत करण्यात आले. यावेळी आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे यांच्यासह सर्व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## प्रशिक्षण आणि सक्षमीकरण

महामंडळ केवळ उत्पादन आणि विक्रीपुरते मर्यादित नाही, तर आदिवासी शेतकरी आणि महिला उद्योजकांना प्रशिक्षण आणि वित्तीय साहाय्य प्रदान करते. विशेषतः अमरावती परिसरातील आदिवासी महिलांना जंगली मधनिर्मितीचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण देण्यात आले आहे. यामुळे त्यांच्या उत्पादनांना गुणवत्ता आणि बाजारात स्पर्धात्मकता प्राप्त झाली आहे. आकर्षक पॅकेजिंग आणि १७६ शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या सहभागामुळे 'शबरी नॅचरल्स' आंतरबाह्य स्तराने अधिक समृद्ध होत आहे.

## 'शबरी नॅचरल्स' ब्रँडची जनजागृती

शबरी ब्रँडची ओळख वाढवण्यासाठी महामंडळाने नुकतेच 'शबरी नॅचरल्स'च्या सर्व उत्पादनांचा समावेश असलेली बास्केट राज्याचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, देशातील सर्व राज्यांचे मुख्यमंत्री; तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यासह मंत्रिमंडळातील सर्व मंत्र्यांना भेट म्हणून दिली.



## ग्राहकांची पसंती

मोहाच्या फुलांपासून बनवलेली वाईन, सिरप, साबण आणि मॉइश्चरायझर यांना अल्पावधीतच ग्राहकांची विशेष पसंती मिळाली आहे. जिल्हास्तरीय प्रदर्शनांमध्ये या उत्पादनांना मोठी मागणी मिळाली आहे. याशिवाय, जंगली मध आणि मोहाच्या फुलांपासून बनवलेले लाडूंना ग्राहकांची प्रचंड पसंती मिळत आहे.

## भविष्यातील वाटचाल

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ आदिवासी बांधवांच्या पारंपरिक ज्ञानाला आधुनिक तंत्रज्ञान आणि मार्केटिंगच्या साहाय्याने जागतिक स्तरावर नेण्यासाठी कटिबद्ध आहे. 'शबरी नॅचरल्स'च्या माध्यमातून आदिवासी संस्कृती आणि उत्पादनांना जागतिक ओळख मिळवून देण्याचे महामंडळाचे उद्दिष्ट आहे. भविष्यात सर्व १७६ शेतकरी उत्पादक कंपन्यांची उत्पादने 'शबरी नॅचरल्स' अंतर्गत आणण्याचा मानस आहे, ज्यामुळे आदिवासी बांधवांचे आर्थिक स्थैर्य आणि सांस्कृतिक वारशाला जागतिक मान्यता मिळेल. 'शबरी नॅचरल्स' हा आदिवासी बांधवांच्या पारंपरिक कौशल्यांचा आणि संस्कृतीचा हायटेक उत्सव आहे. शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाने आदिम संस्कृतीला आधुनिक काळाशी जोडत आदिवासी समुदायाला आर्थिक स्थैर्य आणि जागतिक ओळख मिळवून दिली आहे. ई-कॉमर्सच्या माध्यमातून ही उत्पादने जगभरातील प्रत्येक घरापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न आहे. आदिवासी समुदायाच्या पारंपरिक ज्ञानाला आधुनिक काळाच्या व्यासपीठावर नेऊन, शबरी महामंडळाने या समुदायाच्या सशक्त भविष्यासाठी एक पायाभूत वाटचाल सुरू केली आहे.

**शब्दांकन : वैभव कातकाडे,**
सल्लागार (माध्यम आणि जनसंपर्क),
शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ.

Mrgabharti 75000

**सार्वजनिक परिवहन सेवेमध्ये 'लास्ट माईल कनेक्टिव्हिटी' महत्त्वाची आहे. यासाठी राज्यात 'बाईक टॅक्सी' सुरू करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. 'बाईक टॅक्सी' सुरू करण्यासाठी शासनाने धोरणास मान्यता दिली आहे. या धोरणानुसार राज्यात एक लाखावर लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये 'बाईक टॅक्सी' सुरू करण्यात येणार आहे.**

# 'बाईक टॅक्सी' धोरणातून परिवहन सेवेत सुलभता

**निलेश तायडे**

काळानुरूप नागरिकांच्या परिवहन सेवेच्या गरजा बदलत आहेत. लोकसंख्येतील वाढीमुळे या सेवांवर मर्यादाही येत आहेत. परिवहन सेवांचा विस्तार करीत नवनवीन संकल्पनांचा अवलंब करण्यासाठी शासनाने पुढाकार घेतला आहे. त्यानुसार सर्वांना स्वस्त, सुकर आणि सहज परिवहन सेवा उपलब्ध करून देण्यासाठी शासन काम करत आहे. शासन नागरिकांना कालसुसंगत परिवहन सेवा देण्यासाठी विविध धोरणात्मक निर्णय घेत आहे. परिवहन सेवेबाबत देशात जे जे चांगले काही सुरू आहे ते आपल्या राज्यात सुरू होण्याचा मानस परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला आहे. त्याकरिता परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी परिवहन सेवेत आमूलाग्र बदल करण्यासाठी कर्नाटक, गुजरात राज्यांचा दौरादेखील केला. त्यांच्या दूरदृष्टिकोनातून राज्यात 'बाईक टॅक्सी' धोरणाची मुहूर्तमेढ रोवण्यात आली आहे.

सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेमध्ये 'लास्ट माईल कनेक्टिव्हिटी' महत्त्वाची आहे. यासाठी राज्यात 'बाईक टॅक्सी' सुरू करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. या धोरणानुसार राज्यात एक लाखावर लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये 'बाईक टॅक्सी' सुरू करण्यात येणार आहे.

राज्यात नागरिकांना नवनवीन परिवहन सेवा-सुविधा देण्यासाठी राज्य शासन विविध उपक्रमांची अंमलबजावणी करत आहे. नागरिकांना सेवा मिळून त्यांची गैरसोय दूर करण्याच्या उद्देशाने बाईक टॅक्सीला राज्यात मंजुरी देण्यात आली आहे. 'बाईक टॅक्सी' धोरणावर राज्य मंत्रिमंडळाच्या १ एप्रिल रोजी झालेल्या बैठकीत मान्यताही दिली आहे. रस्त्यावरील वाहन संख्या कमी होण्याच्यादृष्टीने खासगी दुचाकी वाहनांसाठी बाईक पुलिंगच्या पर्यायालासुद्धा शासनाने मान्यता दिली आहे. अशा वाहनांना मोटार वाहन कायद्यांतर्गत योग्यता प्रमाणपत्र, विधिग्राह्य परवाना व विमा असणे बंधनकारक असणार आहे. बाईक टॅक्सीचे प्रवासी भाड्याचे दर हे संबंधित प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाद्वारे सुनिश्चित करण्यात येतील.




बाईक टॅक्सीमुळे कमी खर्चात प्रवासासाठी पर्याय उपलब्ध होणार आहे. यामध्ये प्रवाशांच्या सुरक्षेला प्राधान्य राहणार आहे. या धोरणांतर्गत केवळ परिवहन संवर्गातील इलेक्ट्रिक बाईक टॅक्सीच धावणार आहेत. या योजनेमुळे नागरिकांना स्वस्त प्रवासाच्या पर्यायासह 'लास्ट माईल कनेक्टिव्हिटी'चा पर्याय उपलब्ध होणार असून शहरातील प्रदूषण व वाहतूककोंडी कमी होऊन प्रवासाचा वेळ वाचण्यास मदत होणार आहे. या योजनेमुळे नवीन रोजगार निर्मितीस चालना मिळणार आहे. केवळ २० ते ५० वयोगटातील चालकांनाच बाईक टॅक्सी सेवा देता येणार आहे. तसेच यामध्ये महिला प्रवाशांना महिला चालकाचा पर्याय निवडण्याची सोय उपलब्ध असणार आहे.

### बाईक टॅक्सी ॲग्रीगेटरची आवश्यकता

मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, राज्यात बाईक टॅक्सी वाहनांसाठी समुच्चयक धोरण तयार करण्याच्या अनुषंगाने १२ जानेवारी २०२३ च्या शासन निर्णयान्वये रंगनाथ झा समिती गठित करण्यात आली आहे. या समितीने १४ मार्च २०२३ रोजी शासनास अहवाल सादर केला आहे. या समितीच्या अहवालानुसार, बाईक टॅक्सी धोरण लागू करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. देशात जवळपास १० राज्यांमध्ये बाईक टॅक्सी सुरू करण्यात आल्या आहेत. राज्यात बाईक टॅक्सीमुळे लास्ट माईल कनेक्टिव्हिटीसाठी पर्याय उपलब्ध होणार आहे. या टॅक्सीमुळे वाहतुकीचा किफायतशीर आणि सोईस्कर पर्याय मिळणार आहे. बाईक टॅक्सी चारचाकी

Mrgabharti_75000

वाहनांपेक्षा पर्यावरणपूरक असून यामुळे वाहतूक सुलभ होण्यास मदत होणार आहे. राज्याचे वाढते नागरीकरण लक्षात घेता बाईक टॅक्सी ग्रीगेटरची आवश्यकता आहे. त्यामुळे राज्यात बाईक टॅक्सी सुरू करणे गरजेचे आहे.

## धोरणाची ठळक वैशिष्ट्ये

बाईक टॅक्सीच्या परवानगीकरिता किमान ५० दुचाकी असणाऱ्या पात्र अर्जदारास / घटकास संपूर्ण राज्याकरिता राज्य परिवहन प्राधिकरण यांच्याकडून एकच परवाना देण्यात येणार आहे.



या परवान्याची वैधता ५ वर्ष राहणार आहे. मोटार वाहन नियम १९८९ अन्वये दुचाकीकरिता फिटनेस प्रमाणपत्र, वैध परवाना, वाहन विमा असणे बंधनकारक राहणार आहे. सर्व दुचाकी - टॅक्सी पिवळ्या रंगात रंगवण्यात येणार असून त्यावर बाईक टॅक्सी लिहिणे बंधनकारक असणार आहे. तसेच सेवा प्रदात्याचे नाव आणि संपर्क क्रमांक लिहिणेही आवश्यक राहील.

दुचाकी चालकाकडे मोटार वाहन अधिनियम १९८८ च्या कलम-३ मधील तरतुदीनुसार, विहित परवाना आणि महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम-४ मधील तरतुदीनुसार बॅज असावा. चालकाचे वय २० वर्षांपेक्षा कमी आणि ५० वर्षांपेक्षा जास्त नसावे. चालकास दरदिवशी दुचाकी चालविण्याकरिता ८ तासांची मर्यादा असावी. सेवा प्रदात्याकडून सर्व दुचाकी चालकांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. दुचाकी चालकाने मोटार वाहन नियमांतर्गत वेग मर्यादेचे पालन करणे आवश्यक राहणार आहे.

## रोजगार निर्मिती

या धोरणामुळे नवीन नोकऱ्या निर्माण होणार आहे. आपल्या दुचाकीला या व्यवसायामध्ये उतरून सुशिक्षित बेरोजगार तरुण-तरुणी नवीन रोजगाराचे साधन प्राप्त करू शकतात. मुंबईसारख्या शहरांमध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती या धोरणामुळे होणार आहे.

## प्रवाशांची सुरक्षितता

दुचाकी चालकाला केवळ एका प्रवाशाला घेऊन जाण्याची परवानगी असणार आहे. यामध्ये १२ वर्षांखालील मुलांना प्रवासाकरिता परवानगी नसेल. महिला प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सर्व बाईक टॅक्सींना प्रवाशी आणि चालक यांच्यामध्ये विभाजक बसवण्यात येणार आहे. पावसाळी हंगामामध्ये चालक आणि प्रवासी यांच्या सुरक्षिततेसाठी आच्छादन उभारण्यात यावे. जीपीएस ट्रॅकिंग, संकटकालीन संपर्क सुविधा, वेग पडताळणी, दुचाकी चालक व प्रवासी यांच्याकरिता शिरस्त्राण (हेल्मेट) बंधनकारक करण्यात आले आहे. दुचाकी चालक आणि प्रवाशी यांच्याकरिता अपघात, मृत्यू दोन्हीसाठी विमा संरक्षण सेवा प्रदात्याने उपलब्ध करून देणे बंधनकारक करण्यात आले आहे.

या धोरणामुळे प्रवासी, चालक आणि पर्यावरण यांना विविध लाभ मिळणार आहेत.

## परवडणारी आणि जलद वाहतूक

इलेक्ट्रिक बाईक टॅक्सी सेवा शहरांतर्गत प्रवासासाठी उपयुक्त असून, पारंपरिक टॅक्सी किंवा रिक्षांपेक्षा स्वस्त आणि जलद पर्याय प्रदान करते. या सेवेमुळे सार्वजनिक वाहतुकीच्या शेवटच्या टप्प्यातील प्रवास सुलभ होईल. ज्यामुळे प्रवाशांचा वेळ आणि खर्च वाचणार आहे. दुचाकी टॅक्सी ॲग्रीग्रेटरकडे सुरक्षा मानकांची पूर्तता करणारे ॲप किंवा संकेतस्थळ असणे आवश्यक राहील. तसेच दुचाकी-टॅक्सी सेवा या ॲप किंवा संकेतस्थळ याद्वारे चालवण्यात येईल.

वाहतूक मार्गाचे सुसूत्रीकरण करून सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेशी दुचाकी-टॅक्सी अंतर्भूत करण्यात येईल. शहरांमधील ज्या भागांमध्ये सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उपलब्ध नाही, अशा भागांमध्ये काही प्रमाणात दुचाकी-टॅक्सी सेवा उपलब्ध करून द्यावी लागेल. परिवहनेतर दुचाकींच्या बाईक पुलींगकरिता परवानगी देण्यासाठी पुलिंग करू इच्छिणाऱ्या परिवहनेतर दुचाकी चालकांना शहरांतर्गत प्रतिदिवशी आणि शहराबाहेर काही फेऱ्यांचे निर्धारण करण्यात यावे. याकरिता चालकास द्याव्या लागणाऱ्या प्रत्यक्ष रकमेची फक्त आकारणी करता येईल. बाईक पुलिंगदरम्यान समुच्चयकांना नफा कमावता येणार नाही, अशी तरतूद समाविष्ट करण्यात येईल. तसेच दुचाकी टॅक्सीबाबतच्या नियमावलीमध्ये अंशतः किंवा किरकोळ सुधारणा करण्याकरिता परिवहन आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येणार आहे.

परिवहन सेवेच्या या नवीन बदलाने निश्चितच प्रवाशांना लाभ होणार आहे. शेवटच्या ठिकाणची 'कनेक्टिव्हिटी' निर्माण झाल्यामुळे प्रवाशांची मेट्रो लोकलपासून त्यांच्या निवासापर्यंत असलेली कनेक्टिव्हिटीची गैरसोय दूर होणार आहे.

**(विभागीय संपर्क अधिकारी)**

Mrgabharti 75000

**‘महाराष्ट्र खासगी पदयोजन संस्था (विनियमन)’ या विधेयकामुळे खासगी रोजगार सेवा केंद्रांवर शासनाचा थेट अंकुश आणि नियंत्रण असणार आहे. शासनाच्या दप्तरी नोंदणी केल्याशिवाय कोणत्याही रोजगार सेवा केंद्राला काम करता येणार नाही. या विधेयकामुळे प्रत्येक रोजगार सेवा संस्था शासनाच्या नोंदणीकृत चौकटीत असेल. त्यामुळे पारदर्शकता येईल आणि युवकांचा विश्वासही वाढेल. तसेच तरुणांच्या हक्कांचे संरक्षण होण्यास मदत होईल.**

# पारदर्शक कारभार, युवकांना सुरक्षित रोजगार

**मंगल प्रभात लोढा,**
कौशल्य, रोजगार उद्योजकता व नावीन्यता मंत्री

जगभरात विविध क्षेत्रात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होत असल्याने आर्थिक, सेवा, व्यवस्थापन आणि औद्योगिक क्षेत्रातल्या रोजगारात ही त्याच वेगाने बदल होत आहेत. बदलत्या काळात रोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध होत असून त्या संधी मिळवून देण्याचे काम प्लेसमेंट सर्व्हिस एजन्सी अर्थात खासगी रोजगार सेवा केंद्राच्या माध्यमाने होत आहे. मात्र अनेकदा रोजगाराच्या नावाखाली युवकांची फसवणूक होते. त्यांना मानसिक त्रास सहन करावा लागतो. अशा घटनांमुळे युवकांचा आत्मविश्वास कमी होऊन त्यांना अनेकदा नैराश्य येते. ज्या खासगी रोजगार सेवा केंद्रामुळे युवकांना मनस्ताप सहन करावा लागतो, अशा खासगी रोजगार सेवा केंद्रांवर नियंत्रण आणि अंकुश ठेवणे ही काळाची गरज आहे. युवकांना विश्वासार्ह आणि गुणवत्तापूर्ण रोजगाराच्या संधी देशात आणि परदेशात उपलब्ध व्हाव्यात, रोजगाराच्या क्षेत्रात पारदर्शकता यावी, यासाठी रोजगार क्षेत्राला मार्गदर्शक आणि युवकांच्या भविष्याचा विचार करून ‘महाराष्ट्र खासगी पदयोजन संस्था (विनियमन)’ विधेयक आकाराला आले आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देश प्रगतिपथावर जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यात कौशल्य विकास विभागाचे महत्त्वपूर्ण निर्णय घेतले जात आहेत. राज्याचा कौशल्य विकास विभाग अधिक सक्षम करून कुशल व रोजगारक्षम युवा घडवण्यासाठी शासन प्रयत्न करत आहे.



‘महाराष्ट्र खासगी पदयोजन संस्था (विनियमन)’ या विधेयकामुळे खासगी रोजगार सेवा केंद्रांवर शासनाचा थेट अंकुश आणि नियंत्रण असणार आहे. शासनाच्या दप्तरी नोंदणी केल्याशिवाय कोणत्याही रोजगार सेवा केंद्राला काम करता येणार नाही. या विधेयकामुळे प्रत्येक रोजगार सेवा संस्था सरकारच्या नोंदणीकृत चौकटीत असल्याने पारदर्शकता येऊन युवकांचा विश्वास वाढेल, त्याचबरोबर तरुणांच्या हक्कांचे संरक्षणही होईल.

### युवकांना सुरक्षित, विश्वासार्ह रोजगार

रोजगार हा युवकांच्या आयुष्यातला अविभाज्य भाग असतो. परदेशात नोकरी मिळावी, हे कोट्यवधी तरुणांचे स्वप्न असते. खासगी रोजगार सेवा संस्था अशा गरजू युवकांच्या स्वप्नांशी खेळतात. त्यातून मोठी आर्थिक फसवणूक झाल्याचे अनेकदा निदर्शनाला आले आहे. अनेकदा युवकांना नोकरीसाठी परदेशी पाठवल्या नंतर संबंधित कंपनी आणि नियुक्तीपत्र ही खोटे असल्याचे उघड होते. परदेशात अशा पीडित युवकांना तातडीची मदत मिळणे ही अवघड होते. मात्र आता ‘महाराष्ट्र खासगी पदयोजन संस्था (विनियोजन) या विधेयकामुळे असे प्रकार सहज टाळता येणार आहेत. अनेकदा बनावट कंपन्यांमध्ये रोजगाराचे आमिष दाखवून युवकांना लुबाडले जाते, अशा घटनांनाही आळा बसणार आहे.

### विधेयकातील तरतुदी

खासगी रोजगार सेवा संस्थांना शासनाकडे नोंदणी करणे आवश्यक आहे. दर पाच वर्षानंतर या नोंदणीचे नूतनीकरण करणे आवश्यक असणार आहे. रोजगार मिळवून युवकांची शासनाला माहिती देणे अनिवार्य असणार आहे. प्रत्येक रोजगाराच्या पत्रव्यवहारात नोंदणी क्रमांक समाविष्ट करणे आवश्यक केले आहे. कोणत्या संस्थेत रोजगाराची संधी, रोजगाराचा प्रकार आणि किमान वयोमर्यादेचे पालन या बाबी अनिवार्य करण्यात आल्या आहेत. गरजू युवकांकडून रोजगारासंबंधी घेण्यात येणारे सेवा शुल्क याचीही माहिती शासनाला देणे खासगी रोजगार संस्थांना बंधनकारक करण्यात आले आहे. खासगी रोजगार सेवा संस्थांनी आपल्या कार्यालयाबाहेर नोंदणी प्रमाणपत्र दर्शनी ठिकाणी लावणे, प्रत्येक उमेदवाराची माहिती शासनाला देणे, त्याचे रजिस्टर ठेवणेही बंधनकारक करण्यात आले आहे. समान रोजगार; तसेच अवैध व्यवहार टाळणे, उमेदवारांच्या कागदपत्रांची गोपनीयता पाळणे प्लेसमेंट एजन्सीला बंधनकारक असणार आहे. केंद्राच्या रोजगार आणि प्रशिक्षण संचालनालयाच्या निर्देशानुसार कौशल्य, रोजगार व नावीन्यता विभागाने या विधेयकाचा मसुदा तयार केला आहे. आता कायद्यात त्याचे रूपांतर झाल्यानंतर खासगी रोजगार सेवा संस्थांवर शासनाचे नियंत्रण येणार आहे. त्यामुळे युवकांना विश्वासार्ह, खात्रीशीर, पारदर्शकपणे आणि सुसूत्र प्रक्रियेद्वारे

Mrigabharti_75000

रोजगार मिळवता येणार आहे. कायद्याचा भंग करून फसवणूक केल्याचे आढळून आल्यास या कायद्यात शिक्षेची तरतूदही करण्यात आली आहे.

### संस्थांना कडक शासन

गुमास्ता परवान्याच्या आधारे या आधी खासगी रोजगार सेवा संस्था सुरू करता येत होती, मात्र आता तसे करता येणार नाही. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या अथवा खोट्या माहितीच्या आधारे काम करणाऱ्या कंपन्यांवर या विधेयकामुळे कठोर कारवाई केली जाईल. महाराष्ट्रात नोकरी शोधणाऱ्या युवकांना अधिक संरक्षित आणि पारदर्शक रोजगार सेवा उपलब्ध होणार असून, खासगी संस्थांच्या अनियमित कारभारावर नियंत्रण येणार आहे. खासगी रोजगार सेवा संस्थेने नोंदणी न करता काम करणे, यासाठी एक लाख रुपयांचा दंड तसेच ३ वर्ष तुरुंगवासाच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. अवैधरीत्या व्यवहार, फसवणूक आणि इतर विपरित गोष्टी आढळल्यास ५० हजार ते ३ लाख रुपयांचा दंड तसेच संस्थेची मान्यता रद्द करण्याचा अधिकार शासनाला राहील.

'महाराष्ट्र खासगी पदयोजन संस्था' हे विधेयक भविष्यात दिशादर्शक ठरणार आहे. शासनाला या कायद्यामुळे खासगी क्षेत्रातील रोजगाराची नोंदणी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे शासकीय योजना राबवताना या माहितीचा प्रभावीपणे वापर होणे शक्य होणार आहे. उपलब्ध माहितीच्या आधारे नोंदणीकृत खासगी रोजगार संस्था आणि शासनाच्या संयुक्त विद्यमाने राज्यात विविध ठिकाणी रोजगार मेळावे घेऊन एकाच छताखाली एकसूत्रपणे युवकांना रोजगार उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट साध्य होणार आहे. त्याचबरोबर खासगी रोजगार सेवा संस्थांचे मूल्यमापन करून अधिक गुणवत्ता आणि सुदृढ व्यवस्था निर्माण करणे शक्य होणार आहे. कौशल्य विकास विभागाचा हा कायदा रोजगार क्षेत्रात ऐतिहासिक ठरणार आहे. या कायद्याने युवकांना केवळ रोजगारच मिळणार नाही, तर त्यांना एक सुरक्षित भविष्य मिळणार असून खऱ्या अर्थाने त्यांचे हित जोपासले जाणार आहे. 'पारदर्शक कारभार, युवकांना सुरक्षित रोजगार' अशीच या कायद्याची ओळख निर्माण होणार आहे. पुढच्या काळात हा कायदा खासगी क्षेत्रातल्या रोजगारासाठी दीपस्तंभ म्हणून गौरवला जाणार हे निश्चित...

**शब्दांकन : संध्या गरवारे,**
विभागीय संपर्क अधिकारी

# तृतीयपंथीयांच्या कल्याणासाठी मंडळाची पुनर्रचना

**शैलजा देशमुख**

राज्य शासन राज्यातील तृतीयपंथीयांच्या कल्याणासाठी विविध योजना राबवत आहेत. यासाठी कल्याणकारी मंडळाची स्थापना ही करण्यात आली आहे. तृतीयपंथी यांच्या हक्कांचे संरक्षण अधिक सक्षमतेने आणि प्रभावीपणे होण्यासाठी या मंडळाची पुनर्रचना करण्यात आली आहे. याबाबतचा शासन निर्णय ही नुकताच निर्गमित करण्यात आला आहे.

या मंडळाच्या माध्यमातून तृतीयपंथीय समुदायाच्या शिक्षण, रोजगार, आरोग्य या संदर्भातील विविध योजना राबवण्यात येणार आहेत. शासनाच्या या निर्णयामुळे तृतीयपंथीय समुदायाला अधिक सक्षम आणि न्याय्य प्रतिनिधित्व मिळेल; तसेच त्यांचे हक्क आणि कल्याण अधिक प्रभावीपणे सुनिश्चित करता येतील. सन २०१८ साली स्थापन करण्यात आलेल्या या



मंडळाच्या संरचनेत बदल करून सुधारित स्वरूपात नव्या सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ११ मार्च २०२४ रोजी तृतीयपंथीयांच्या कल्याणासाठीचे धोरण २०२४ जाहीर करण्यात आले आहे. या धोरणानुसार राज्यस्तरीय मंडळाच्या संरचनेत सुधारणा करणे आवश्यक होते.

या नव्या निर्णयानुसार महाराष्ट्र राज्य तृतीयपंथीय हक्क संरक्षण आणि कल्याण मंडळाचे अध्यक्ष सामाजिक न्याय मंत्री असणार आहेत, तर समाज कल्याण आयुक्त हे सदस्य सचिव असणार आहेत. तृतीयपंथीय प्रतिनिधी आणि स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी अशा अशासकीय सदस्यांचाही मंडळात समावेश करण्यात आला आहे.

**(विभागीय संपर्क अधिकारी)**

Mrgabharti 75000

**आजच्या गतिमान जीवनात प्रत्येक नागरिकाला सुरक्षित, पौष्टिक व गुणवत्तापूर्ण अन्न प्राप्त होणे अत्यावश्यक आहे. अन्न हे केवळ शारीरिक अस्तित्वासाठीच नव्हे, तर उत्तम आरोग्यासाठी आणि पर्यायाने, समाजाच्या प्रगतीसाठी मूलभूत घटक आहे. या महत्त्वपूर्ण गरजेची जाणीव ठेवून, भारत सरकारने 'अन्नसुरक्षा व मानके कायदा २००६' (Food Safety and Standards Act 2006) अधिनियमित केला आहे. याविषयी...**

# अन्नसुरक्षेसाठी जनजागृती!

**अजित मैत्रे**

स्वातंत्र्योत्तर भारतात अन्नाशी संबंधित अनेक कायदे अस्तित्वात होते; परंतु त्यांमध्ये एकसंघता आणि सुसूत्रता यांचा अभाव होता. अन्न व्यवसायात कार्यरत उद्योजक आणि ग्राहक यांना अनेक प्रकारच्या प्रशासकीय व कायदेशीर अडचणींना तोंड द्यावे लागत होते. या पार्श्वभूमीवर, एका सर्वसमावेशक आणि प्रभावी अन्नसुरक्षा कायद्याची निकड निर्माण झाली.

'अन्नसुरक्षा व मानके कायदा २००६' या समस्येचे निराकरण करण्यासाठी आणि राष्ट्रीय स्तरावर एक मजबूत अन्नसुरक्षा व्यवस्था स्थापित करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरला आहे. हा कायदा महाराष्ट्र राज्यासह संपूर्ण देशभरात ५ ऑगस्ट २०११ पासून लागू करण्यात आला आहे.

## कायद्याची कठोर अंमलबजावणी व उद्योगांचे प्रभावी नियमन

अन्नसुरक्षा व मानके प्राधिकरण आणि सर्व राज्यांचे अन्न व औषध प्रशासन विभाग अन्न सुरक्षा व मानके कायद्यातील तरतुदींची प्रभावीपणे अंमलबजावणी करून अन्न उद्योगाचे प्रभावी नियमन करतात. मोठ्या अन्न उत्पादन आस्थापनांपासून ते लहान अन्न विक्रेत्यांपर्यंत, सर्व अन्न व्यवसायांना अन्न परवाना / नोंदणी घेणे बंधनकारक आहे. अन्नसुरक्षा अधिकारी हे नियमितपणे अन्न व्यवसायांची तपासणी करून आवश्यक तेथे कायद्यातील उल्लंघनाच्या संशयावरून अन्न नमुने विश्लेषणासाठी घेतात. तपासणीदरम्यान अन्नपदार्थांची गुणवत्ता, उत्पादन प्रक्रिया आणि स्वच्छता मानके तपासली जातात. नियमांचे उल्लंघन झाल्यास तसेच अन्न नमुने कमी दर्जा, मिथ्याछाप, असुरक्षित आढळून आल्यास कठोर कारवाई केली जाते, ज्यात दंड आकारणे, परवाना निलंबित करणे किंवा व्यवसाय कायमस्वरूपी बंद करणे, मा. न्यायालयात फौजदारी स्वरूपाचा खटला दाखल करणे इत्यादींचा समावेश असू शकतो.

त्यामुळे सुरक्षित आणि पूर्ण (Safe Wholesome) अन्न मिळवण्याच्या ग्राहकांच्या मूलभूत अधिकाराचे संरक्षण होऊन त्यांचे आरोग्य अबाधित राहण्यास मदत होत आहे.




## अन्न भेसळ म्हणजे काय?

अन्न भेसळ म्हणजे निकृष्ट पदार्थ मिसळून किंवा बदलून अन्नाची गुणवत्ता जाणूनबुजून कमी करणे. हे पदार्थ हानिकारक रसायने, न खाण्यायोग्य साहित्य किंवा अगदी स्वस्त, कमी दर्जाचे अन्न असू शकतात. यामागचा उद्देश अनेकदा नफा वाढवणे असतो. परंतु आपल्या आरोग्यावर त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात. आजकाल, तंत्रज्ञानाच्या मदतीने भेसळ करणे अधिक सोपे झाले आहे. त्यामुळे आपण अधिक सतर्क राहणे गरजेचे आहे.

## अन्न भेसळीचे प्रकार आणि उदाहरणे

**१. नैसर्गिक भेसळ**

उदा. धान्यामध्ये मातीचे खडे किंवा किडे मिसळणे, मसाल्यांमध्ये माती मिसळणे.

**२. अपायकारक रसायनांची भेसळ**

उदा. दुधात युरिया मिसळणे किंवा फळांना रंग देण्यासाठी हानिकारक रसायने वापरणे.

**३. कमी दर्जाच्या पदार्थांची भेसळ**

उदा. तेलात स्वस्त दर्जाचे तेल मिसळणे किंवा चहा पावडरमध्ये लाकडी भुसा मिसळणे.

**४. जाणूनबुजून केलेली भेसळ**

उदा. दुधात पाणी मिसळणे, मिरची / हळद पावडर यांना रंग देणे.

**५. अनावधानाने झालेली भेसळ**

उदा. अन्न प्रक्रिया करताना किंवा साठवण करताना विषारी रसायनांचा संपर्क येणे.

Mrgabharti 75000

कशी ओळखावी अन्नपदार्थातील भेसळ...

| अ.क्र. | अन्नपदार्थाचे नाव | भेसळकारी पदार्थ | भेसळ ओळखण्यासाठीची पद्धत |
|---|---|---|---|
| १ | दूध | पाणी | दुधाचा थेंब गुळगुळीत उतरत्या पृष्ठभागावर टाकल्यास पाणी मिश्रित दुधाचा थेंब लवकर खाली ओघळतो, तर शुद्ध दुधाचा थेंब सावकाश खाली ओघळतो. (टीप:- सदर चाचणी स्किम मिल्क पावडर मिसळलेल्या दुधास लागू होत नाही.) |
| | | पिष्टमय पदार्थ (स्टार्च) | दुधामध्ये आयोडिनचे थेंब टाकल्यास दुधास निळा रंग येतो. |
| | | स्निग्ध पदार्थ काढून घेतलेले दूध. | या दुधात लॅक्टोमीटर टाकल्यास त्याचे रिडिंग २६च्या वर जाते. |
| २ | खवा/पनीर | पिष्टमय पदार्थ (स्टार्च) | प्रथम खवा व पाणी एकत्र उकळून घ्यावे. ते थंड झाल्यानंतर त्यात आयोडिनचे काही थेंब टाकल्यास निळा रंग येतो, यावरून खव्यात पिष्टमय पदार्थाची भेसळ असल्याचे सिद्ध होते. |
| ३ | तूप/लोणी | वनस्पती (उदा. डालडा) | एक चमचा वितळलेले तूप व एक चमचा तीव्र हायड्रोक्लोरिक ॲसिड एका परीक्षानळीत घ्यावे. त्यात थोडी साखर टाकून हे मिश्रण काही मिनिटे हलवल्यानंतर त्यास तांबडा रंग आल्यास या तुपामध्ये भेसळ असल्याचे सिद्ध होते. |
| ४ | लोणी/तूप | पिष्टमय पदार्थ ( उदा. बटाटे, रताळी इत्यादी) | लोण्यामध्ये काही थेंब आयोडिन टाकल्यास प्रथम करडा रंग येतो. तसेच काही वेळातच त्याचा रंग निळ्या रंगात बदलल्यास त्यात भेसळ असल्याचे सिद्ध होते. |
| ५ | खाद्यतेल | धोतरा | एका परीक्षानळीत एक चमचा खाद्यतेल व एक चमचा तीव्र नायट्रिक आम्ल घेऊन हलवल्यास परीक्षानळीच्या खालच्या थरात लाल किंवा लालसर करडा रंग आल्यास खाद्यतेलामध्ये आरजीमोन (धोतरा) तेलाची भेसळ असल्याचे सिद्ध होते. |
| | | मिनरल ऑईल | एका परीक्षानळीत २ मिली खाद्यतेल व २ मिली एन-१२ अल्कोहोलिक पोटॅश घ्यावे व परीक्षा नळी १५ मिनिटे उकळत्या पाण्यात ठेवावी. त्यानंतर परीक्षा नळीत १० मिली पाणी टाकल्यास मिश्रण गढूळ झाल्यास त्यात भेसळ असल्याचे सिद्ध होते. |
| ६ | पिठीसाखर | खडू पावडर | एका काचेच्या ग्लासमध्ये पाणी घेऊन त्यात अंदाजे १० ग्रॅम साखर विरघळवल्यास खडुची भुकटी ग्लासच्या तळाशी साचल्याचे दिसून येते. |
| ७ | पिठीसाखर | धुण्याचा सोडा | एका परीक्षानळीत पिठीसाखर घेऊन त्यात काही थेंब हायड्रोक्लोरिक आम्ल टाकल्यानंतर फेस व बुडबुडे आल्यास पिठीसाखरेत धुण्याचा सोडा असल्याचे सिद्ध होते. |
| ८ | मध | साखरेचे द्रावण | शुद्ध मधात कापूस बुडवून जाळल्यास तो लगेच जळतो; परंतु मधात साखरेचे द्रावण मिसळले असल्यास पाणी कापसाला जळू देत नाही आणि जरी कापूस जळला तरी तडतड आवाज येतो. |
| ९ | मिठाई, आईसक्रिम व शीतपेय | मेटॅनील यलो रंग | एका परीक्षानळीत संशयित अन्न पदार्थ व थोडे गरम पाणी टाकून मिश्रण ढवळून घ्यावे. रंग उतरलेल्या पाण्यास हळूच दुसऱ्या परीक्षा नळीत घेऊन त्यात हायड्रोक्लोरिक आम्लाचे काही थेंब टाकावेत. द्रावणाचा रंग लाल झाल्यास मेटॅनील यलो रंगाची भेसळ समजावी. |
| | | सॅक्रिन | सॅक्रिनमिश्रित अन्नपदार्थ जिभेवर ठेवल्यास सुरुवातीला बराच वेळ गोड चव जाणवते व शेवटी कडवटपणा जाणवतो. |
| १० | गहू, तांदूळ, ज्वारी, बाजरी, मका इत्यादी | धूळ, खडे, तण, बिया, पोखरलेले/किडके धान्य. | सदर बाबी आपणास उघड्या डोळ्याने दिसतात. |
| | | अरगट | २०% मिठाच्या द्रावणात धान्य टाकल्यास अरगटयुक्त धान्य पाण्याच्या पृष्ठभागावर तरंगतात. |

Mrgabharti_75000

| | | | |
|---|---|---|---|
| | | | धान्य जवळून पाहिल्यास धोतऱ्याच्या बिया चमकदार असल्याचे व त्यांची टोके करड्या रंगाची असल्याचे दिसते. |
| ११ | मोहरी | आरजीमोन बी (पिवळा धोतरा) | आरजीमोन बी हे दिसण्यास मोहरीसारखे आहे. आरजीमोन बियांचा पृष्ठभाग हा खडबडीत असतो, तर मोहरीचा गुळगुळीत असतो. ही बाब बारीक निरीक्षणानंतर दिसते. |
| १२ | डाळी | लाख डाळ | लाख डाळ ही दिसण्यास चपटी व अनियमित आकाराची असते. |
| | | मेटॅनील यलो रंग | एका परीक्षानळीत डाळीचे ४-५ तुकडे घ्यावेत. त्यात अंदाजे ५ मिली पाणी टाकून ढवळून घ्यावे. या मिश्रणात तीव्र हायड्रोक्लोरिक आम्ल टाकल्यानंतर गुलाबी रंग आल्यास त्यात मेटॅनील यलो रंग असल्याचे सिद्ध होते. |
| १३ | रवा, मैदा, आटा | लोहकण | या अन्नपदार्थात लोह चुंबक फिरवल्यास लोहकण त्यास चिटकून येतात. |
| १४ | बेसन | लाख डाळीचे पीठ | १० ग्रॅम बेसनात ५० मिली हायड्रोक्लोरिक आम्ल मिसळावे. हे मिश्रण १५ मिनिटे उकळत्या पाण्यावर ठेवल्यानंतर गुलाबी रंग आल्यास लाख डाळीच्या पिठाची भेसळ असल्याचे सिद्ध होते. |
| १५ | काळी मिरी | पपईच्या बिया | पपईच्या बिया या आकसलेल्या, निमुळत्या व फिकट रंगाच्या असतात. |
| | | मीनरल ऑईलचा थर | काळी मिरी जास्त चमकदार दिसते. |
| १६ | कुटलेले मसाले | पिष्टमय पदार्थ | आयोडिन टाकल्यास निळा रंग येतो. |
| १७ | हळद पावडर | रंगीत लाकडी भुसा | एका परीक्षानळीत एक चमचा हळद पावडर घेऊन त्यात तीव्र हायड्रोक्लोरिक आम्ल टाकल्यास तत्काळ गुलाबी रंग येतो. या मिश्रणात पाणी टाकल्यास व रंग नाहीसा झाल्यास शुद्ध हळद असल्याचे सिद्ध होते, परंतु रंग न गेल्यास त्यात भेसळ दिसून येते. |
| १८ | मिरची पावडर | विटांची भुकटी/मीठ/टाल्कम पावडर | एक ग्लास पाण्यात एक चमचा मिरची पावडर टाकल्यास ग्लासच्या तळाशी साचलेला थर चिकट लागल्यास विटाची भुकटी असल्याचे सिद्ध होते व साबणासारखा गुळगुळीत लागल्यास टाल्कम पावडर असल्याचे सिद्ध होते. |

### अन्न भेसळीचे दुष्परिणाम

भेसळयुक्त अन्नाचे सेवन केल्याने अपचन, मळमळ, पोटाचे विकार होऊ शकतात. काही रसायने, कृत्रिम रंग कर्करोगास कारणीभूत ठरू शकतात. भेसळयुक्त तेल आणि इतर चरबीयुक्त पदार्थ हृदयरोगाचा धोका वाढवतात. भेसळयुक्त अन्नपदार्थ खाल्ल्याने किडनीचे आजार, ॲलर्जी, रोगप्रतिकारक शक्ती कमी होणे इ. आजार होण्याची शक्यता असते.

### अन्नपदार्थांच्या खरेदीवेळी करताना घ्यावयाची काळजी

अन्नपदार्थ खरेदी करणे ही एक नियमित आणि आवश्यक बाब आहे. आपल्या आरोग्याची आणि कुटुंबाच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी दर्जेदार आणि सुरक्षित अन्नपदार्थ निवडणे अत्यंत महत्त्वाचे आहे. अन्नपदार्थ खरेदी करताना काही गोष्टी लक्षात घेतल्यास आपण संभाव्य धोके टाळू शकतो आणि उत्तम निवड करू शकतो.

### १. सर्वसाधारण बाबी

- अन्नपदार्थ खरेदी करताना अन्न परवाना/ नोंदणी प्रमाणपत्र असलेल्या अधिकृत व्यावसायिकाकडूनच खरेदी करावे.
- खरेदीसाठी निवडलेले दुकान स्वच्छ आणि व्यवस्थित असावे. विक्रेत्याने वैयक्तिक स्वच्छता जपलेली असावी. ओळखीचे आणि प्रतिष्ठित दुकान निवडणे श्रेयस्कर राहील. ज्या दुकानांची अन्नपदार्थांच्या गुणवत्तेबाबत चांगली प्रतिमा आहे, अशा ठिकाणांना प्राधान्य द्यावे.
- अन्नव्यावसायिकाने अन्न परवाना/ नोंदणी प्रमाणपत्र दर्शनी भागात लावले आहे किंवा कसे, याची खात्री करावी.
- अन्नपदार्थ शक्यतो सुट्या/खुल्या स्वरूपात खरेदी न करता पॅकबंद स्वरूपात खरेदी करावे.
- अन्नपदार्थाचे पॅकिंग सुरक्षित आणि अखंड असावे. फुगलेले, फाटलेले किंवा डेंट झालेले पॅकिंग असलेले पदार्थ खरेदी करू नये. अंतिम मुदत उलटलेले पदार्थ खरेदी करणे पूर्णपणे टाळावे.
- अन्नपदार्थ खरेदी केल्यानंतर खरेदी बिल

Mrgabhanti 75000

घ्यावे व त्यावर अन्न परवाना नमूद केला आहे किंवा नाही हे तपासावे.

- खुल्या स्वरूपातील खाद्यतेल व मसाले खरेदी करू नयेत.

## २. फळे आणि भाजीपाला निवडताना घ्यावयाची काळजी

फळे आणि भाजीपाला ताजे आणि टवटवीत असावेत. मुरगळलेले, सुकलेले किंवा शिळे दिसत असल्यास खरेदी करणे टाळावे. फळे आणि भाज्यांवर डाग, चट्टे किंवा मार नसावेत. त्वचा नितळ आणि रंगात एकसारखेपणा असावा. फळे आणि भाज्यांना नैसर्गिक आणि चांगला वास यायला हवा. कुजलेला किंवा दुर्गंध येत असल्यास खरेदी करू नये. शक्यतो मोसमी आणि स्थानिक फळे आणि भाजीपाला खरेदी करण्यास प्राधान्य द्यावे. मोसमी उत्पादने अधिक ताजी आणि नैसर्गिकरीत्या पिकलेली असतात.

## ३. मांस, चिकन आणि मासे खरेदी करताना घ्यावयाची खबरदारी

- हे अन्नपदार्थ खरेदी करताना ते पूर्णपणे थंड वातावरणात ठेवलेले असावेत.
- **मांस :** मांस लाल रंगाचे, चांगला वास असलेले आणि स्पर्शाला घट्ट असावे.
- **चिकन :** चिकन गुलाबी रंगाचे, वास चांगला आणि स्पर्शाला घट्ट असावे.
- **मासे :** माशांचे डोळे चमकदार, समुद्रासारखा वास आणि शरीर घट्ट असावे.
- शक्य असल्यास ताजे मांस, मासे खरेदी करून त्वरित वापरावेत.

## ४. दुग्धजन्य पदार्थ खरेदी करताना दक्षता

दूध, दही, पनीर इ. दुग्धजन्य पदार्थांची खरेदी करताना 'Expiry Date' (अंतिम तारीख) तपासावी आणि मुदत उलटलेले पदार्थ खरेदी करणे टाळावे. दुग्धजन्य पदार्थ रेफ्रिजरेटरमध्ये योग्य तापमानात साठवलेले असावेत. पॅकेजिंग फुगलेले किंवा खराब झालेले नसावे. दुग्ध उत्पादने उन्हाळ्यात लवकर खराब होतात. त्यामुळे याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे.

## ५. धान्य आणि कडधान्ये खरेदी करताना घ्यावयाची काळजी

धान्य आणि कडधान्ये ज्या ठिकाणी साठवलेली आहेत, ती जागा कोरडी आणि हवेशीर असावी. दुकानात धान्य जमिनीवर न ठेवता, फळ्यांवर किंवा उंच केलेल्या प्लॅटफॉर्मवर ठेवलेले असावे. त्यामुळे धान्ये सुरक्षित राहतात. ओलसर किंवा दमट धान्य खरेदी करू नका. बुरशी लागलेल्या धान्यांना कुबट वास येतो. कीड, अळ्या किंवा जाळे नसावे. धान्यांमध्ये लहान काळे किडे किंवा पांढऱ्या अळ्या दिसल्यास ते धान्य खरेदी करू नये.

## ६. तयार अन्नपदार्थांबाबत घ्यावयाची काळजी

शक्यतोवर रस्त्यावरचे तयार अन्नपदार्थ (street food) खाणे टाळावे. जर खायचेच झाले, तर स्वच्छता आणि आरोग्य मानके पाळणाऱ्या विक्रेत्यांकडूनच खरेदी करा. विक्रेत्याचे हात, कपडे आणि अन्न बनवण्याची जागा स्वच्छ आहे का ते पाहा. तयार अन्नपदार्थ ताजे आणि गरम आहेत का हे तपासा. शिळे अन्नपदार्थ खाणे धोकादायक ठरू शकते. अन्नपदार्थ बनवण्याची वेळ विचारा आणि शक्यतो ताजे बनवलेले अन्न खा. ताजेपणा का महत्त्वाचा? शिळे अन्नपदार्थ जीवाणूंच्या वाढीसाठी उत्तम वातावरण पुरवतात आणि ते खाल्ल्याने अन्नातून विषबाधा होऊ शकते. अन्नपदार्थ माशा आणि धूळ यांपासून सुरक्षित ठेवण्यासाठी झाकलेले आहेत का हे तपासा. उघड्यावरचे अन्नपदार्थ टाळा. पाणीपुरी किंवा तत्सम पदार्थ खाताना पाणी स्वच्छ आणि पिण्यायोग्य आहे का याची खात्री करा. शक्य असल्यास, पावसाळ्यात पाण्यामार्फत जंतुसंसर्ग होण्याची शक्यता वाढते. जंक फूड आणि तेलकट पदार्थ शक्यतो टाळावेत. हे पदार्थ पचनास जड आणि आरोग्यासाठी हानिकारक असू शकतात. त्याऐवजी, हलक्या आणि पौष्टिक अन्नपदार्थांची निवड करावी.

## ७. मिठाई खरेदी आणि साठवणूक करताना घ्यावयाची काळजी

मिठाई खरेदी करताना वापरायोग्य दिनांक (Use by date) पाहूनच मिठाई खरेदी करावी. मिठाई आकर्षक रंगाची आणि व्यवस्थित आकारलेली असावी. रंग फिकट किंवा जास्त गडद नसावा, जो जुनेपणा दर्शवू शकतो. मिठाईला नैसर्गिक आणि मोहक वास यायला हवा. वास नसेल किंवा खवट वास येत असेल, तर ती मिठाई ताजी नसते. प्रत्येक मिठाईच्या प्रकारानुसार पोत वेगळा असतो. बर्फी मऊ आणि दाणेदार असावी, लाडू घट्ट आणि गोलाकार असावा, तर जिलेबी कुरकुरीत असावी. मिठाईचा पोत योग्य नसेल तर ती जुनी किंवा व्यवस्थित बनवलेली नसते. मिठाई नेहमी स्वच्छता व ताजेपणा जपलेल्या दुकानातूनच खरेदी करावी. शक्य असल्यास नैसर्गिक घटकांनी बनलेल्या मिठाईला प्राधान्य द्या. कृत्रिम रंग (Artificial colors) आणि चवीसाठी वापरलेले पदार्थ (Artificial flavors) कमी असलेल्या मिठाईची निवड करा. काही ठिकाणी नैसर्गिक स्वीटनर्स (Natural sweeteners) जसे मध (Honey) किंवा खजूर (Dates) वापरले जातात, ते आरोग्यासाठी चांगले असतात.

### मिठाई साठवणूक करताना घ्यावयाची काळजी

- हवाबंद डब्बे (Airtight containers) वापरा. • मिठाई ठेवण्यापूर्वी डब्बा स्वच्छ आणि कोरडा असल्याची खात्री करा. • बहुतेक मिठाई खोलीच्या तापमानावर (Room temperature) चांगली राहते.
- दुधापासून बनवलेल्या मिठाई आणि पाक असलेल्या मिठाईला थंड ठिकाणी किंवा रेफ्रिजरेटरमध्ये (Refrigerator) ठेवावे.

### प्रकारानुसार साठवणूक

- **दुधाच्या मिठाई :** रेफ्रिजरेटरमध्ये २-३ दिवसांपेक्षा जास्त ठेवू नये.
- **सुक्या मिठाई :** हवाबंद डब्यात खोलीच्या तापमानावर १-२ आठवडे टिकू शकतात.
- **पाक असलेल्या मिठाई :** रेफ्रिजरेटरमध्ये ४-५ दिवस आणि खोलीच्या तापमानावर २-३ दिवस टिकू शकतात.

Mrgabharti_75000

**अन्न सुरक्षा व मानदे कायद्यातील तरतुदींच्या उल्लंघनाबाबत दंड/ शिक्षेचा तपशील**

| अ.क्र. | कायद्यातील तरतुदी | दंड/शिक्षा |
|---|---|---|
| १ | कलम ५०- ग्राहकाच्या मागणीनुसार योग्यस्वरूप, पदार्थ किंवा गुणवत्ता नसलेले अन्न पदार्थ विक्री. | रुपये पाच लाखांपर्यंत दंड. (छोट्या अन्न व्यावसायिकांसाठी जास्तीत जास्त २५ हजार रुपये दंड) |
| २ | कलम ५१- कमी दर्जा अन्नपदार्थ उत्पादन/विक्री. | रुपये पाच लाखांपर्यंत दंड. |
| ३ | कलम ५२- मिथ्याछाप अन्नपदार्थ उत्पादन/विक्री. | रुपये तीन लाखांपर्यंत दंड. |
| ४ | कलम ५३- फसव्या/दिशाभूल करणाऱ्या जाहिराती. | रुपये दहा लाखांपर्यंत दंड |
| ५ | कलम ५४- अन्नपदार्थामध्ये बाह्य (नको असलेले) घटक आढळून आलेले अन्नपदार्थ उत्पादन/विक्री. | रुपये एक लाखांपर्यंत दंड |
| ६ | कलम ५५- अन्नसुरक्षा अधिकारी यांच्या निर्देशांचे पालन न करणे. | रुपये दोन लाखांपर्यंत दंड |
| ७ | कलम ५६- अस्वच्छ किंवा अनारोग्यदायी पद्धतीने अन्नप्रक्रिया किंवा उत्पादन करणे. | रुपये एक लाखापर्यंत दंड |
| ८ | कलम ५७- अपमिश्रक (Adulterant) बाळगणे. | शरीरास अपायकारक नसल्यास रुपये दोन लाखांपर्यंत दंड, |
| | | शरीरास अपायकारक असल्यास रुपये दहा लाखांपर्यंत दंड. |
| ९ | कलम ५८- ज्या उल्लंघनासाठी विशिष्ट दंड नमूद नसणे. | रुपये दोन लाखांपर्यंत दंड |
| १० | कलम ५९- असुरक्षित अन्नपदार्थ उत्पादन/विक्री. | मा. न्यायालयात फौजदारी खटला. उल्लंघनाच्या स्वरूपानुसार ३ महिने ते ७ वर्ष शिक्षा व तीन लाख रुपये ते दहा लाख रुपये दंड. |
| ११ | कलम ६०- जप्त अन्नपदार्थाच्या साठ्यास छेडछाड करणे. | सहा महिन्यांपर्यंत शिक्षा व दोन लाखांपर्यंत दंड. |
| १२ | कलम ६१- चुकीची माहिती पुरविणे. | दोन लाखांपर्यंत दंड. |
| १३ | कलम ६२- अन्न सुरक्षा अधिकारी यांच्या कामात अडथळा आणणे किंवा त्यांची बतावणी करणे. | तीन महिन्यांपर्यंत शिक्षा व एक लाखापर्यंत दंड. |
| १४ | कलम ६३- विनापरवाना व्यवसाय करणे. | रुपये दहा लाखांपर्यंत दंड. |
| १५ | कलम-६९-छोटे अन्न व्यावसायिक यांनी नियमांचे उल्लंघन करणे. | रुपये एक लाखापर्यंत दंड. |

- मिठाईला थेट सूर्यप्रकाश आणि उष्णतेपासून दूर ठेवा. ओव्हन (Oven) किंवा गरम स्टोव्हजवळ (Hot stove) मिठाई ठेवणे टाळा.
- मिठाई साठवल्यानंतर नियमितपणे तपासा.
- रंग, वास किंवा पोत बदलल्यास ती खाणे टाळा.
- बुरशी (Mold) लागल्यास किंवा खवट वास येत असल्यास मिठाई टाकून द्या.

### अन्नपदार्थांच्या पॅकिंगवर तपशील छापणे बंधनकारक

- अन्नपदार्थाचे नाव.
- अन्नपदार्थातील घटकांची यादी. (List Of Ingredients)
- पौष्टिक माहिती. (Nutritional information)
- शाकाहारी/मांसाहारी चिन्ह.
- Food Additives बाबत माहिती.
- उत्पादकांचा तपशील (नाव आणि पत्ता).
- FSSAI परवाना क्रमांक आणि लोगो.
- उत्पादन/पॅकेजिंग दिनांक, कालबाह्य दिनांक (Expiry Date).
- निव्वळ वजन, किंमत, ग्राहकांसाठी संपर्क क्रमांक.
- अन्न उत्पादक मूळ देश.
- ॲलर्जीन माहिती.
- अन्नपदार्थ वापराबाबतच्या सूचना. (Instructions for use).
- सेंद्रिय (Organic) अन्नपदार्थांच्या बाबतीत जैविक भारत लोगो.
- फोर्टिफाईड अन्न पदार्थांच्या बाबतीत फोर्टिफाईड (+F) लोगो.

### अन्न परवाना / नोंदणी

- **कायदेशीर आवश्यकता :** भारतातील कोणत्याही अन्न व्यवसायासाठी FSSAI परवाना आवश्यक आहे.
- **ग्राहकांचा विश्वास :** FSSAI परवाना ग्राहकांना अन्न सुरक्षित असल्याची हमी देतो.
- **व्यवसाय वाढीस मदत :** परवानाधारकांना सरकारी योजना

Mrgabharti_75000

आणि कर्ज मिळण्यास मदत होते.

## अन्न परवान्याचे प्रकार

- **नोंदणी :** लहान अन्न व्यवसायांसाठी (वार्षिक उलाढाल १२ लाख रुपयांपेक्षा कमी). • **राज्य परवाना :** मध्यम आकाराच्या अन्न व्यवसायांसाठी (वार्षिक उलाढाल १२ लाख ते २० कोटी रुपये). • **केंद्रीय परवाना :** मोठ्या अन्न व्यवसायांसाठी (वार्षिक उलाढाल २० कोटी रुपयांपेक्षा जास्त).

## अन्न परवाना मिळवण्याची प्रक्रिया

- FSSAI च्या https://foscos.fssai.gov.in या संकेतस्थळावरून ऑनलाइन अर्ज करणे आवश्यक आहे. त्याकरिता लागणारी आवश्यक कागदपत्रे, परवाना शुल्क इ. बाबतची सर्व माहिती या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

## पालन करावयाच्या बाबी

- अन्न व्यावसायिकांनी अन्न परवाना/नोंदणी प्रमाणपत्र घेतल्याशिवाय व्यवसाय सुरू करू नये.
- अन्न परवाना/नोंदणी प्रमाणपत्र आस्थापनेच्या दर्शनी भागावर प्रदर्शित करावा.
- अन्नपदार्थ खरेदी/विक्रीचा तपशील जतन करून ठेवावा.
- ग्राहकांना विक्री बिले द्यावीत व विक्री बिलांवर अन्न परवाना/नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक नमुद करावा.
- अन्न व्यावसायिकांनी कमी दर्जा, मिथ्याछाप, असुरक्षित अन्न पदार्थांचे उत्पादन, साठा, विक्री, वाहतूक करू नये.
- अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ नियम २०११ व नियमनेमधील तरतुदींचे पालन करावे.

## महाराष्ट्र राज्याची प्रशासकीय यंत्रणा

अन्न व प्रशासन महाराष्ट्र राज्याचे मुख्यालय मुंबई येथे असून मा. अन्न सुरक्षा आयुक्त हे प्रशासनाचे प्रमुख आहेत. विभागीय स्तरावर सह आयुक्त (अन्न) तथा न्याय निर्णय अधिकारी हे कार्यरत असून त्यांना मोठ्या अन्न व्यावसायिकांना दंड ठोठावण्याचे अधिकार आहेत. जिल्हास्तरावर सहायक आयुक्त (अन्न) तथा पदनिर्देशित अधिकारी हे कार्यरत असून ते नोंदणी प्राधिकारी, परवाना प्राधिकारी म्हणून काम पाहतात. त्यांना छोट्या अन्न व्यावसायिकांना दंड करण्याचे अधिकार आहेत. अन्नसुरक्षा अधिकारी हे क्षेत्रीय अधिकारी असून त्यांना कार्यक्षेत्र नेमून देण्यात येते. अन्न आस्थापना तपासणी करणे व अन्न नमुने घेण्याचे अधिकार अन्न सुरक्षा अधिकारी यांना आहे.

## ग्राहकांचे अधिकार

जागरूक ग्राहक म्हणून अन्न सुरक्षा कायद्याचा प्रभावीपणे उपयोग करण्यासाठी, खालील अधिकार काळजीपूर्वक समजून घेणे आवश्यक आहे:

**१) सुरक्षित अन्न मिळवण्याचा वैधानिक अधिकार :** प्रत्येक ग्राहकाला सुरक्षित अन्न मिळवण्याचा कायदेशीर हक्क आहे. अन्न सुरक्षा कायदा आपल्याला कमी दर्जा, मिथ्याछाप, असुरक्षित अन्नाच्या विरोधात आवाज उठवण्याचा आणि न्याय मिळवण्याचा अधिकार देतो. या अधिकाराचा उपयोग करणे म्हणजे केवळ स्वतःचेच नव्हे, तर इतर ग्राहकांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यास मदत करणे आहे.

**२) जागरूकता आणि तक्रार :** अन्न भेसळ (food adulteration) आणि दिशाभूल करणाऱ्या जाहिराती (misleading advertisements) ग्राहकांसाठी गंभीर धोके आहेत. अन्न सुरक्षा कायदा या दोन्ही गोष्टींना सक्त मनाई करतो. दिशाभूल करणाऱ्या जाहिराती म्हणजे अन्नपदार्थांविषयी असत्य माहिती देणे किंवा exaggerated claims करणे. उदाहरणार्थ, 'हा पदार्थ खाल्ल्याने एका आठवड्यात वजन घटते' किंवा 'या तेलामुळे हृदयविकार कधीच होणार नाही' अशा जाहिराती दिशाभूल करणाऱ्या असू शकतात. जर आपल्याला भेसळयुक्त अन्न किंवा दिशाभूल करणारी जाहिरात निदर्शनास आल्यास, आपण त्वरित तक्रार नोंदवणे आवश्यक आहे.

**३) अन्नपदार्थ विश्लेषण करून घेण्याचा अधिकार :** अन्न सुरक्षा मानके कायद्यातील कलम ४० नुसार खरेदीदारास खरेदी केलेल्या अन्नपदार्थांचे अधिकृत प्रयोगशाळेत विश्लेषण करून घेण्याचा कायदेशीर हक्क आहे. यात अन्नपदार्थांमधील संभाव्य हानिकारक घटक, भेसळ किंवा चुकीचे लेबलिंग यांसारख्या बाबींचे मूल्यांकन केले जाते. विश्लेषण अहवालाच्या आधारे, खरेदीदारास विक्रेत्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याचा अधिकार आहे.

**४) भरपाई मिळण्याचा अधिकार :** अन्न सुरक्षा मानके कायद्यातील कलम ६५ नुसार कोणत्याही व्यावसायिकाने उत्पादन किंवा विक्री केलेल्या अन्न पदार्थांमुळे ग्राहकाला इजा किंवा मृत्यू झाला, तर न्याय निर्णय अधिकाऱ्याला किंवा, प्रकरणपरत्वे मा. न्यायालयाला पीडित किंवा पीडिताच्या कायदेशीर प्रतिनिधीला खालीलप्रमाणे भरपाई देण्याचे निर्देश देण्याचा कायदेशीर अधिकार आहे.

- मृत्यू झाल्यास पाच लाख रुपयांपेक्षा कमी नाही.
- गंभीर दुखापत झाल्यास तीन लाख रुपयांपेक्षा जास्त नाही आणि
- इतर सर्व प्रकारच्या दुखापतींमध्ये एक लाख रुपयांपेक्षा जास्त नाही.

## प्रशासनाकडे तक्रार करण्याचे माध्यम

ग्राहकांना अन्न पदार्थाविषयी अथवा अन्न आस्थापनेविरुद्ध तक्रार करायची असल्यास ते खालीलप्रमाणे तक्रार करू शकतात.

- प्रत्यक्ष कार्यालयात संबंधित अधिकारी यांना भेटून.
- लेखी स्वरूपात हस्ते अथवा पत्राद्वारे.
- संबंधित कार्यालयीन दूरध्वनीद्वारे.
- टोल फ्री क्रमांक - १८००२२२३६५.
- संबंधित कार्यालयाच्या ई-मेलद्वारे.
- https://foscos.fssai.gov.in या संकेतस्थळाद्वारे (Food Consumer Grievance).

(लेखक हे छत्रपती संभाजीनगर येथे एम.टेक. (अन्न अभियांत्रिकी व तंत्रज्ञान) सहायक आयुक्त (अन्न) तथा पदनिर्देशित अधिकारी, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य या पदावर कार्यरत आहेत. )

Mrgabharti 75000

**पाणी हे जीवनाचे मूलभूत घटक आहे. कोणत्याही सजीवाच्या अस्तित्वासाठी पाणी आवश्यक आहे. मात्र, वाढती लोकसंख्या, औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि हवामान बदलामुळे पाण्याचा साठा कमी होत चालला आहे. अशा परिस्थितीत जल व्यवस्थापनाला अनन्यसाधारण महत्त्व असून यामध्ये प्रत्येक घटकाने आपले योगदान दिले पाहिजे. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाच्या जलसंपदा विभागाने गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ (जलसंपदा) मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील व विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ (जलसंपदा) तथा आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यात १५ ते ३० एप्रिल २०२५ या कालावधीत 'जल व्यवस्थापन कृती पंधरवडा-२०२५' या नावीन्यपूर्ण उपक्रमाचे आयोजन केले.**

# जलसाक्षरतेतून जलव्यवस्थापनाकडे!

**एकनाथ पोवार**

गेल्या काही दशकात पाण्याचा वापर लक्षणीयरीत्या वाढला आहे. शेतीसाठी सिंचन, घरगुती गरजा, उद्योगधंदे आणि उष्णतेच्या वाढीमुळे होणारा अतिरिक्त वापर यामुळे जलस्रोतांवर मोठा ताण पडत आहे. अनेक ठिकाणी भूजल पातळी झपाट्याने खाली जात आहे, जी भविष्याच्या दृष्टीने गंभीर बाब आहे. हवामान बदलामुळे पावसाचे स्वरूपही बदलले आहे. काही भागांत अतिवृष्टी, तर काही भागांत तीव्र दुष्काळाचे चित्र निर्माण झालेले दिसते.

घराघरांतून, शेतांमधून आणि पाइपलाईनमधून होणारा पाण्याचा अपव्यय आणि गळती ही अतिशय गंभीर समस्या आहे. अनेकदा नागरिक जाणीवपूर्वक किंवा अज्ञानामुळे पाण्याचा अपव्यय करतात. तसेच पायाभूत सुविधांकडे दुर्लक्ष झाल्यामुळे लाखो लिटर पाणी दररोज वाया जाते. यासाठी पाण्याचे शाश्वत व्यवस्थापन होणे काळाजी गरज आहे. वर्तमान आणि भविष्यकालीन गरजेनुसार पाण्याचा वापर करण्यावर भर दिला पाहिजे, यासाठी पुनर्वापर, गळती टाळणे, सूक्ष्म सिंचन प्रणालीचा अवलंब करणे या गोष्टींना प्राधान्य देऊन नागरिकांना पाण्याचे महत्त्व पटवून देण्याची भूमिका घ्यावी लागेल. तसेच शाळांमधून, स्थानिक पातळीवरून, सामाजिक संस्थांतून 'जलसाक्षरता' वाढवण्यासाठी. जल हीच खरी संपत्ती ही भावना रुजवल्यास यातूनच जल व्यवस्थापनाचा पाया अधिक मजबूत होईल.



## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उपक्रमाचा शुभारंभ

'जल व्यवस्थापन कृती पंधरवडा' या नावीन्यपूर्ण उपक्रमाचा शुभारंभ राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाला. मंत्रालयात झालेल्या या शुभारंभ प्रसंगी मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, 'जल व्यवस्थापन कृती पंधरवडा' हा उपक्रम पाण्याच्या संकटाकडे गांभीर्याने पाहण्याची दिशा देणारा आहे. हा उपक्रम केवळ जलसंपदा विभागापुरता मर्यादित न राहता, त्याला लोकचळवळीचे स्वरूप मिळावे. पाणी म्हणजे भविष्यातील संपत्ती आहे आणि ती जपण्यासाठी शासन, प्रशासन, समाज आणि प्रत्येक नागरिकाने पुढाकार घेणे ही काळाची गरज आहे.

**राधाकृष्ण विखे-पाटील :**

जलसंपदा विभाग हा महत्त्वाचा विभाग आहे. कृषी सिंचन, औद्योगिक विकास, नागरीकरण यासह अनेक घटकांशी जोडलेला विभाग आहे. या विभागाने जलव्यवस्थापनाला नेहमीच प्राधान्य दिले असून जलव्यवस्थापन कृती पंधरवड्यात राबवण्यात येणाऱ्या उपक्रमाच्या माध्यमातून जलसंपदा विभाग अधिक लोकाभिमुख होणार आहे. या बरोबरच महामंडळाच्या सक्षमीकरणासाठी विभाग मिशन मोडवर काम करत आहे. ज्या राज्यांमध्ये शाश्वत जलसाठे मोठ्या प्रमाणात वाढवले जातील, अशा राज्यांचा सर्व क्षेत्रात विकासाचा दर उंचावेल. त्यामुळे जल व्यवस्थापन व जल संवर्धनासाठी प्रत्येक घटक महत्त्वाचा असल्याने हा उपक्रम केवळ पंधरवड्यापुरता मर्यादित न

Mrgabharti_75000

राहता या पुढेही तो नियमित राबवण्यासाठी व यामध्ये लोकांचा सहभाग वाढवण्यासाठी जलसंपदा विभागाने भर द्यावा.

**गिरीश महाजन :**

शाश्वत जलसाठे ही भविष्यातील मोठी संपत्ती असून या जलसाठ्यांचे सुयोग्य व्यवस्थापन करणे काळाची गरज आहे. यासाठी जल व्यवस्थापनात नागरिकांचा सहभाग वाढवून जल व्यवस्थापनाला लोक चळवळीचे स्वरूप प्राप्त व्हावे. कोणत्याही योजनेला, उपक्रमाला लोकसहभागाची साथ मिळाल्यास ती लोकचळवळ होते.

त्यामुळे 'जल व्यवस्थापन कृती पंधरवडा २०२५' या नावीन्यपूर्ण उपक्रमात सर्वांचा सहभाग वाढला पाहिजे.



## पंधरवडा कालावधीतील महत्त्वाचे उपक्रम

- जलसंपदा अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण
- ई-ऑफिस प्रणाली कार्यान्वित करून प्रशासनिक प्रक्रियांमध्ये पारदर्शकता व कार्यक्षमता वाढवण्याचा प्रयत्न.
- 'स्वच्छ व सुंदर माझे कार्यालय' या उपक्रमातून शासकीय कार्यालयांमधील पाण्याचा वापर आणि स्वच्छतेचा संदेश देणे. जल पुनर्भरणाचे महत्त्व अधोरेखित करत जलस्रोतांचे संवर्धन करण्यावर भर.
- शेतकरी आणि पाणी वापर संस्थांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी समजावून घेणे.
- भूसंपादन, पुनर्वसन, कालव्यांची पाहणी आदी बाबींवरही भर.
- राज्यभरात कालवा स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेत स्वयंसेवी संस्था, स्थानिक नागरिकांचा सहभाग. गळती टाळून शेवटच्या घटकापर्यंत पाणी पोहोचवण्याचे उद्दिष्ट.
- उपसा सिंचनाचे पाणी परवानगी देण्यासाठी तक्रारींचे निरसन करणे.
- वाणिज्य व औद्योगिक क्षेत्रात अनधिकृतपणे पाणी उपसा करणाऱ्यांविरुद्ध कारवाई. पाणी हा सार्वभौम स्रोत असून त्याचा अपव्यय किंवा गैरवापर थांबवणे.
- सिंचन ई-प्रणाली, पाणी दर, पाणीपट्टी आकारणी व वसुली, थकीत पाणीपट्टी प्रकरणांचा आढावा.
- शाळा, महाविद्यालये, कृषी विज्ञान केंद्र, स्वयंसेवी संस्था यांच्यासोबत जनजागृती मोहिमा राबवून विद्यार्थ्यांचा जल व्यवस्थापन प्रक्रियेत सहभाग वाढवण्यावर भर.
- जलसंपदा व कृषी विभागामार्फत संयुक्तपणे पीक पद्धती बदल, उत्पादकता वाढ, पाण्याचे नियोजन याबाबत बैठक व कार्यशाळा.
- शहरांमध्ये पाणी पुनर्वापराचे प्रमाण अत्यल्प आहे. महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रात सांडपाण्याच्या पुनर्वापरासाठी उपाययोजना राबवणे.
- पूर व इतर नैसर्गिक आपत्तीदरम्यान जलसंपदा मालमत्तांचे संरक्षण कसे करावे यावर मार्गदर्शन.
- जलसंपदा विभाग मालकीच्या जागांची मोजणी, डिजिटल नोंदी व अतिक्रमण निष्कासनासाठी महसूल विभागासोबत समन्वयाने काम.

## पाणी वापर संस्था सक्षमीकरण चर्चासत्र व कार्यशाळा

- ३० एप्रिल २०२५ रोजी जिल्हा मुख्यालय स्तरावर पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत महिला मेळावा व कार्यशाळांचे आयोजन. जल व्यवस्थापनात महिलांचा सहभाग महत्त्वाचा असल्याने त्यांच्या सक्षमीकरणावर विशेष भर.
- जल व्यवस्थापनाकडे केवळ उपक्रम म्हणून पाहून चालणार नाही, तर जलव्यवस्थापन ही प्रत्येकाची जीवनशैली बनायला हवी. आपले भविष्य सुकर व सुरक्षित करायचे असेल, तर पाण्याची बचत, योग्य वापर आणि त्याचे संवर्धन ही आपली जबाबदारी आहे.

## प्रमुख उपस्थिती

मंत्रालयात झालेल्या 'जल व्यवस्थापन कृती पंधरवडा' या नावीन्यपूर्ण उपक्रमाच्या शुभारंभास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील व गिरीश महाजन यांच्यासह अन्य मंत्रिगण उपस्थित होते.

(विभागीय संपर्क अधिकारी)

Mrgabharti 75000

**छत्रपती शिवाजी महाराज म्हणजे दृढनिश्चय, समर्पण, त्याग... छत्रपती शिवाजी महाराज म्हणजे शौर्य, स्वाभिमान आणि स्वातंत्र्याची शाश्वत इच्छा... हिंदवी स्वराज्याचे सुवर्ण सिंहासन जिथे स्थापन झाले होते, त्या ऐतिहासिक रायगड किल्ल्याला भेट देणे ही खूप भाग्याची गोष्ट असून त्या भावना शब्दांत वर्णन करता येऊ शकत नाही. छत्रपती शिवाजी महाराज यांचे व्यक्तिमत्त्व हे देश आणि जगाला प्रेरणा देणारे आहे, अशा शब्दांत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. निमित्त होते दुर्गराज किल्ले रायगडावर आयोजित छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुण्यतिथी सोहळ्याचे...**

# रयतेच्या राजाला ऐतिहासिक मानवंदना!

**मनीषा पिंगळे**

अखंड हिंदुस्थानाचे आराध्यदैवत, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३४५व्या पुण्यतिथीनिमित्त आणि समाधीस्थळाच्या जीर्णोद्धाराला १०० वर्ष पूर्ण झाल्याबद्दल किल्ले रायगडावर श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळाच्या स्थानिक उत्सव समिती, महाड यांच्या वतीने विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची प्रमुख उपस्थिती कार्यक्रमाला लाभली. दरवर्षी हा पुण्यतिथी सोहळा होतो; पण यावेळी मराठा इतिहासाचे अभ्यासक आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचा आदर्श प्रमाण मानून त्यावर आपली कार्यपद्धती ठरविणारे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या मंत्रिमंडळातील गृह तथा सहकारमंत्री अमित शाह यांची उपस्थिती ही वैशिष्ट्यपूर्ण होती.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी या दौऱ्याच्या प्रारंभी रायगडाच्या पायथ्याशी असलेल्या पाचाड येथे स्वराज्यजननी राजमाता जिजाऊ यांच्या समाधीचे दर्शन घेत पुष्पांजली अर्पण केली.

## किल्ले रायगड प्रदक्षिणा

रोप-वे ने रायगडवर आगमन झाल्यानंतर अमित शाह यांनी किल्ले रायगडची प्रदक्षिणा केली. यावेळी शिवकालीन इतिहासाच्या पाऊलखुणा, निसर्गरम्य दृश्ये आणि इतिहासाचे अवशेष पाहिले. ऐतिहासिक वस्तूंची पाहणी केली. यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांनी येथील आपत्कालीन सोयी-सुविधांचीदेखील माहिती दिली. यावेळी किल्ला चढण्याचा त्यांचा उत्साह हा वाखाणण्याजोगा होता. राजसदरेवर आल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पालखीचे दर्शन घेत महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

पालखी सोहळ्यात सहभागी होत



Mrgabharti_75000



अमित शाह यांनी शिवरायांच्या पालखीला खांद्यावर घेत पायी वारी करून होळीचा माळ, टकमक टोकची पाहणी केली. छत्रपती शिवाजी महाराज यांची निस्सीम श्रद्धा असलेल्या श्री जगदीश्वराचे दर्शन घेतले.

## विविध पुरस्कार प्रदान

किल्ले रायगड येथे दरवर्षी श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळाच्या स्थानिक उत्सव समिती महाड यांच्या वतीने आयोजित छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुण्यतिथी कार्यक्रमात, स्वराज्याचे साम्राज्यात रूपांतर होत असताना योगदान देणाऱ्या सरदार घराण्याचा सन्मान करण्यात येतो. यंदा होळकर घराण्याचा सन्मान करण्यात आला. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते उदयसिंहराजे होळकर आणि सैन्य दल अधिकारी परम विशिष्ट सेवा पदक, अतिविशिष्ट सेवा पदक, शौर्यचक्र विजेते लेफ्टनंट जनरल संजय कुलकर्णी यांचा सन्मान करण्यात आला. तसेच 'श्री शिवपुण्यस्मृती रायगड पुरस्कार' दुर्ग अभ्यासक निलकंठ रामदास पाटील यांना प्रदान करण्यात आला. यावेळी अशोक बांगर लिखित 'शिवरायमुद्रा' या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले.

## मराठा इतिहास अभ्यासक अमित शाह

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, अमित शाह केवळ गृहमंत्री म्हणून नाही, तर छत्रपती शिवाजी महाराज यांचे सेवक आणि मराठा इतिहासाचे संशोधक म्हणून या ठिकाणी आले आहेत. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या इतिहासाचा आणि संपूर्ण मराठा साम्राज्याच्या इतिहासाचा गाढा अभ्यास करणारे, जगभरातून मराठ्यांच्या इतिहासाचे पुरावे मिळवून इतिहास समजून घेणारे आहेत.

## रायगडला भेट ही भाग्याची गोष्ट

शिंदेशाही पगडी, कवड्यांची माळ अन् जय भवानीचा गजर करत कार्यक्रमाला संबोधित करताना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा म्हणाले की, जिथे हिंदवी स्वराज्याचे सुवर्ण सिंहासन स्थापित झाले होते, त्या ऐतिहासिक रायगड किल्ल्याला भेट देणे ही अतिशय भाग्याची गोष्ट आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी भारताच्या कानाकोपऱ्यात स्वधर्म, स्वभाषा आणि स्वराज्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देण्याची दुर्दम्य इच्छाशक्ती जागृत केली आणि पाहता-पाहता आदिलशाही, मुघल आणि निजामशाही साम्राज्याने वेढलेल्या महाराष्ट्राचे हिंदवी स्वराज्यात रूपांतर झाले. पुढे काही वर्षांतच, अटकेपासून कटकपर्यंत आणि दक्षिणेकडील बंगालपासून तामिळनाडूपर्यंत देशभर स्वराज्याचे स्वप्न साकार होऊ लागले.

## रायगड एक चिरंतन प्रेरणास्थळ!

छत्रपती शिवाजी महाराज यांचा संपूर्ण इतिहास त्यांच्या जन्मापासून ते त्यांच्या शेवटच्या श्वासापर्यंत - रायगडाच्या या पवित्र भूमीशी जोडलेला आहे. या पवित्र स्थानाची कल्पना शिवस्मृती म्हणून करणारे महान स्वातंत्र्यसैनिक लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचेही स्मरण त्यांनी केले. शाह म्हणाले की, इंग्रजांनी जाणूनबुजून रायगड किल्ला नष्ट करण्याचा प्रयत्न केला, कारण तो स्वराज्याचे एक शक्तिशाली प्रतीक होता. टिळकांनी हे महत्त्व ओळखले आणि 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे,' या त्यांच्या प्रसिद्ध घोषणेद्वारे, शिवाजी महाराजांच्या स्वराज्याच्या दृष्टिकोनाशी असलेली बांधिलकी पुन्हा स्थापित केली. महाराष्ट्र सरकार आता टिळकांनी सुरू केलेल्या या वारशाचा सन्मान आणि जतन करण्याच्या उदात्त कार्याला पुढे नेत आहे. केंद्र आणि महाराष्ट्र सरकार रायगड स्मारकाला केवळ पर्यटन स्थळ बनवण्यासाठीच नव्हे, तर विविध आधुनिक सुविधा देऊन देशातील तरुणांचे प्रेरणास्थान बनवण्यासाठी वचनबद्ध आहे, असे केंद्रीय गृहमंत्र्यांनी सांगितले.

## समाधीस्थळाचे दर्शन

श्री. शहा यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या समाधीस्थळाचे दर्शन घेतले. याप्रसंगी राज्य पोलीस दलाने छत्रपती शिवरायांना शासकीय मानवंदनादेखील अर्पित केली. त्याप्रसंगी हेलिकॉप्टरमधून समाधीस्थळावर पुष्पवृष्टी करण्यात आली. त्यावेळी त्यांच्यासमवेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, छत्रपती शिवाजी महाराज यांचे १३वे वंशज तथा सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले, खा. उदयनराजे भोसले यांच्यासह मंत्रिगण उपस्थित होते.

Mrgabharti_75000

### छत्रपती शिवाजी महाराज आपले दैवत



संपूर्ण हिंदुस्थानात मोगलाई, कुतुबशाही, आदिलशाही राजवट होती. परकीय आक्रमकांचे राज्य कधीच संपणार नाही, हा अंधकार संपून कधीच पहाट होणार नाही, असे वाटत होते. त्यावेळी राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या आशीर्वादाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासारख्या तेजस्वी सुर्याचा उदय झाला आणि त्या सूर्याने आपल्याला स्वराज्याची पहाट दाखवली. छत्रपती शिवाजी महाराज नसते तर आपण कोणीही येथे दिसलो नसतो, म्हणून छत्रपती शिवाजी महाराज आपले दैवत आहेत.

महाराजांनी अठरापगड जातीच्या लोकांना एकत्र करून हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्यामुळेच संपूर्ण भारतावर भगव्याचा अंमल अस्तित्वात आला, असे सांगत मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, महापुरुषांचा, छत्रपती शिवाजी महाराज यांचा अपमान करणाऱ्यांना टकमक टोकावरून लोटले पाहिजे. आपण लोकशाही व्यवस्थेत असल्याने याबाबत लोकशाहीनुरूप नियम तयार करण्याचे काम निश्चितपणे करू, राज्य सरकारच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांचा प्रमाण इतिहास निर्माण करण्याचे काम निश्चितपणे हातात घेऊ. तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अरबी समुद्रातील स्मारकासाठी उच्च न्यायालयात लढून हे स्मारक उभारण्याचा प्रयत्न करू, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

भारताची राजधानी दिल्ली येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचे राष्ट्रीय स्मारक व्हावे, यासाठी केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांनी मदत करावी. तसेच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी युनेस्कोच्या जागतिक वारसास्थळासाठी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या १२ किल्ल्यांना नामनिर्देशन केले आहे. या अनुषंगाने फ्रान्समध्ये युनेस्कोसमोर सादरीकरण होणार आहे.

**– देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**



जेव्हा छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्म झाला, तेव्हा देशातील जनता अंधकारात बुडाली होती. असे वातावरण होते की, स्वराज्याची कल्पना करणेही अशक्य वाटत होते. देवगिरीच्या पतनानंतर अवघ्या १०० वर्षांतच महाराष्ट्र आणि संपूर्ण दक्षिणेकडील प्रदेशाचा ऱ्हास झाला आणि हळूहळू स्वतःच्या धर्माबद्दल आणि स्वराज्याबद्दल बोलणे हा गुन्हा मानले जाऊ लागले. मात्र अशा काळात, आपली आई राजमाता जिजाबाईंपासून प्रेरित होऊन, महाराजांनी बालवयातच सिंधू नदीपासून कन्याकुमारीपर्यंत पुन्हा एकदा भगवा ध्वज फडकवण्याची प्रतिज्ञा केल्याचे केंद्रीय गृहमंत्र्यांनी सांगितले.

### अदम्य साहस, अकल्पनीय रणनीती

शाह म्हणाले की, त्यांनी जगभरातील अनेक महान नेत्यांची चरित्रे वाचली आहेत. परंतु अशी अढळ इच्छाशक्ती, अदम्य साहस, अकल्पनीय रणनीती आणि समाजाच्या प्रत्येक घटकाला सोबत घेऊन अजेय सैन्य उभारण्याची क्षमता, अशी वैशिष्ट्ये - छत्रपती शिवाजी महाराज यांच्याशिवाय अन्य कोणाच्याही अंगी आढळली नाहीत. अगदी लहान वयात त्यांनी आपल्या अतुलनीय धैर्य आणि दृढ संकल्पाने संपूर्ण देशाला स्वराज्याच्या मंत्राने प्रेरित केले. २०० वर्षांपेक्षा जास्त काळ राज्य करणाऱ्या मुघल साम्राज्याला काही काळातच उद्‌ध्वस्त करण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. स्वधर्म, स्वराज्य आणि स्वभाषा या बाबी मानवी जीवनातील स्वाभिमानाशी खोलवर जोडलेल्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वाभिमानाची ही तीन मूलभूत मूल्ये जगासमोर आणली. त्यांनी हे अशा वेळी केले, जेव्हा आक्रमकांनी आपल्याला चिरडून टाकले होते आणि पराभूत केले होते.

समाजात गुलामगिरीची मानसिकता रुजली गेली होती; परंतु महाराजांनी ही पराधीनतेची मानसिकता मोडून काढली आणि हिंदवी साम्राज्याची पुनर्स्थापना केली. लोकांमध्ये अभिमान, प्रतिकार आणि स्वातंत्र्याची भावना पुन्हा जागृत केली.

Mrgabharti_75000



छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिकवणीला पूर्णतः मूर्तरूप मिळवून देण्यासाठी उर्वरित कामे पूर्ण करण्याकरिता संपूर्ण देश वचनबद्ध आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे दृढनिश्चय, निष्ठा, त्याग, शौर्य, स्वाभिमान आणि स्वराज्याच्या अमर भावनेचे प्रतीक आहेत. त्यांचा वारसा प्रत्येक घरापर्यंत पोहोचवण्यासाठी महाराष्ट्र शासन विशेष मोहीम राबवत असल्याचे केंद्रीय गृहमंत्री श्री. शहा यांनी सांगितले.

## जागतिक वारसा यादीत स्थान

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि महाराष्ट्र सरकार १२ ऐतिहासिक किल्ल्यांचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश व्हावा, यासाठी प्रयत्न करत असल्याचे सांगत, छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजमुद्रेला भारतीय नौदलाचे प्रतीक बनवले आणि या कृतीतून आपला देश आणि आपले स्वराज्य पूर्णपणे सुरक्षित असल्याचा संदेश जगाला दिला आहे, असे ते म्हणाले.

## मुख्यमंत्र्यांना आवाहन

केंद्रीय मंत्री अमित शाह यांनी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना आवाहन केले की, राज्यातील इयत्ता सातवी ते बारावीपर्यंतच्या प्रत्येक विद्यार्थ्याला किमान एकदा तरी या पवित्र स्थळाला भेट घेऊ द्यावी, जेणेकरून ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या वारसा आणि आदर्शांशी जोडले जाऊ शकतील.

## गडकिल्ले स्वराज्याचे प्रतीक

महाराज ही केवळ व्यक्ती नाही तर विचारसरणी आहे. गडकिल्ले हे स्वराज्याचे प्रतीक आहेत. गडकोट किल्ल्यांचे संरक्षण आणि अतिक्रमणमुक्त झाले पाहिजे, यासाठी सरकार पुढाकार घेत असून केंद्रीय पुरातत्व विभागाने सहकार्य करावे, अशी मागणी करत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महाराजांचा आदर्श घेऊन हे सरकार काम करत असल्याचे यावेळी सांगितले.

## जागतिक स्तरावर प्रथम क्रमांकाचे स्थान

प्रत्येक क्षेत्रात भारताला जगात सर्वोत्कृष्ट बनवण्याची संकल्पना सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराजांनी मांडली, असे केंद्रीय गृहमंत्री म्हणाले. भारतीय स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतर आम्ही जगासमोर अभिमानाने उभे आहोत आणि जेव्हा भारत स्वातंत्र्याची १०० वर्षे पूर्ण करेल, तेव्हा देश प्रत्येक क्षेत्रात जागतिक स्तरावर प्रथम क्रमांकाचे स्थान प्राप्त करेल, असा आम्ही संकल्प करतो.

भारतातील प्रत्येक बालकाला छत्रपती शिवाजी महाराज यांचे जीवन आणि वारसा याविषयी माहिती करून देणे हे आपले कर्तव्य आहे, यावर शाह यांनी भर दिला.

## सुशासनाचा सर्वोत्तम मापदंड!

छत्रपती शिवाजी महाराज यांनी प्रशासनाच्या क्षेत्रात असंख्य तत्त्वे आखून दिली होती, असे अमित शहा यांनी सांगितले. त्यांच्या अष्टप्रधान मंडळाच्या संकल्पनेचा आजच्या काळात मंत्रिमंडळाच्या स्वरूपात अवलंब केला गेला आहे आणि हे मंत्रिमंडळ म्हणजे अष्टप्रधान मंडळाचेच विस्तारित स्वरूप आहे, असे ते म्हणाले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी न्यायासाठी अनेक तत्त्वांची मांडणी केली आणि सत्ताधाऱ्यांनी त्या तत्त्वांची अंमलबजावणी केली. आपल्या कर्तृत्वातून महाराजांनी सुशासनाचा सर्वोत्तम मापदंड स्थापित केला आहे.

स्वराज्यासाठी संघर्ष, स्वधर्माचा सन्मान आणि स्वभाषेचे अमरत्व हीच शिवाजी महाराजांनी दिलेली अंतिम शिकवण आहे. त्या दिशेने वाटचाल कधीही थांबता कामा नये. तसेच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली संघर्षाचा हाच वारसा अभिमानाने पुढे नेला जात असून प्रधानमंत्री यांनी भारताला जागतिक पातळीवर सन्मानाचे स्थान मिळवून देण्याचे काम केले आहे असे त्यांनी नमूद केले.

काशी विश्वनाथ मंदिराचा जीर्णोद्धार, सर्व ज्योतिर्लिंगांपर्यंतचा सुलभ प्रवास, आणि रामजन्मभूमीचे सन्मान असाच छत्रपती शिवाजी महाराजांचाही दृष्टिकोन होता. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात ही सर्व कामे पूर्णत्वाला नेण्यात आली. औरंगजेबाने उद्ध्वस्त केलेल्या काशी विश्वनाथ मंदिराला नवचैतन्य दिले गेले आणि काशी विश्वनाथ कॉरिडॉरच्या माध्यमातून त्याचे पुनरुत्थान करण्यात आले, असे अमित शहा यांनी सांगितले.

(जिल्हा माहिती अधिकारी, रायगड)

Mrgabharti_75000

सत्यमेव जयते
Government of India

Government of Maharashtra

# A SEA OF NEW IDEAS BY THE SHORES OF MUMBAI

## A HISTORIC SUMMIT RESHAPING THE GLOBAL ENTERTAINMENT INDUSTRY

**waves**
**WORLD AUDIO VISUAL & ENTERTAINMENT SUMMIT**

**Mumbai hosts the global stage of creativity and innovation.** WAVES 2025, where imagination meets impact and the future of entertainment begins.

**This is India's grandest creative convergence, a platform that connects creators, countries, cultures, and content like never before.**

**#CreateInIndia**

**1ST-4TH MAY 2025**
**JIO WORLD CENTRE, MUMBAI**

### Here's what awaits you:

**Creatosphere**
A dynamic creator network where emerging voices rise, artists meet collaborators, and innovation flows freely. It's where storytellers, musicians, designers, and visionaries find their tribe.

**WAVES Xelerator**
A launchpad where path-breaking ideas meet global investors. Watch the brightest sparks of creativity get the fuel they need to become tomorrow's success stories.

**WAVES Bazaar**
A buzzing global marketplace for content, designed to foster a vibrant media dialogue between countries. From industry roundtables to cross-border co-productions, it's where deals are inked and ideas go global.

**Bharat Pavilion**
A curated celebration of India's rich storytelling heritage, from ancient oral traditions to modern cinematic gems. Step into the soul of Bharat through the lens of its timeless narratives.

**This is more than a summit.** It's a platform that's changing the world's entertainment landscape.

**Over 100+ countries.**
**5000+ global participants.**
vision: To fuel the next wave of entertainment.





**NARENDRA MODI**
PRIME MINISTER

**DEVENDRA FADNAVIS**
CHIEF MINISTER OF MAHARASHTRA

For info and Registration visit: https://wavesindia.org

**EKNATH SHINDE**
DEPUTY CHIEF MINISTER OF MAHARASHTRA

**AJIT PAWAR**
DEPUTY CHIEF MINISTER OF MAHARASHTRA

**Directorate General of Information and Public Relations**

mahasamvad.in MaharashtraDGIPR MahaDGIPR

Mrgabharti_75000

R.N.I.No. 14140


आज़ादी का अमृत महोत्सव | महाराष्ट्र शासन | G20

# लोकराज्य

## अधिकृत-विश्वासार्ह-वस्तुनिष्ठ




### वाचकांच्या प्रतिक्रियांचे स्वागत!

- राज्याच्या जडणघडणीचा बोलका साक्षीदार ठरलेल्या लोकराज्य मासिकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य अधिक वाढविण्यासाठी वाचकांच्या प्रतिक्रिया अत्यंत मोलाच्या आहेत.
- वाचकांनी विधायक सूचना, लेखांवरील अभिप्राय lokrajya2011@gmail.com या ईमेलवर किंवा खालील पत्त्यावर पाठवावेत.

**अंक ऑनलाइन मोफत उपलब्ध**

संकेतस्थळ : https://dgipr.maharashtra.gov.in आणि https://mahasamvad.in

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

**पत्ता :** उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नवीन प्रशासन भवन, १७ वा मजला, मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई ४०००३२.

Visit: www.mahasamvad.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR



O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

**केशव करंदीकर**
उपसंचालक (प्रकाशने),
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.


प्रति / TO


लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक केशव करंदीकर, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी मे. प्रिंटरेड इश्युज (इंडिया) प्रा. लि., १७, प्रगती इंडस्ट्रियल इस्टेट, एन. एम. जोशी मार्ग, मुंबई - ४०० ०११ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.

मुख्य संपादक : ब्रिजेश सिंह